अध्याय बाविसावा.

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ ॐ नमो सद्‌गुरु खांबसूत्री । चौऱ्यायशीं लक्ष पुतळ्या यंत्रीं । नाचविशी निजतंत्रीं । प्राचीनदोरी स्वभावें ॥ १ ॥ दोरी धरिली दिसों न देशी । परी पुतळ्या स्वयें नाचविशी । नवल लाघवी कैसा होशी । अलिप्ततेसीं सर्वदा ॥ २ ॥ जेथ जैशी ज्याची पूर्वगती । तें भूत नाचे तैशा रीतीं । ते नाचविती चेतनाशक्ती । तुझ्या हातींवीणहातें ॥ ३ ॥ जेवीं कां अचेतन लोहातें । चुंबक खेळवी निजसामर्थ्यें । तेवीं तूं सकळ भूतांतें । निजसत्तें नाचविशी ॥ ४ ॥ ऐशीं सदा नाचती परतंत्र । तरी अभिमानाचें बळ थोर । सत्य मानोनि देहाकार । आम्ही स्वतंत्र ह्मणविती ॥ ५ ॥ आम्ही सज्ञान अतिज्ञाते । आम्ही कर्मकुशल कर्मकर्ते । इतर मूर्ख समस्तें । ऐसा अभिमानातें वाढविती ॥ ६ ॥ एवं देहाभिमानाचे हातें । विसरोनि आपुल्या अकर्तृत्वातें । स्वयें पावले कर्मबंधातें । जेवीं स्वप्नावस्थेतें विषबाधा ॥ ७ ॥ स्वप्नीं अतिशय चढलें विख । आतां उतरलें निःशेख । तेवीं बंधमोक्ष देख । सत्यत्वें मूर्ख मानिती ॥ ८ ॥ हे तुझे खांबसूत्रींची कळा । मिथ्या सत्यत्वें दाविशी डोळां । हा अतिशयें अगाध सोहळा । तुझी अतर्क्य लीळा तर्केना ॥ ९ ॥ अचेतनीं चेतनधर्म । प्रत्यक्ष दाविशी तूं सुगम । हेंचि तुझे न कळे वर्म । करोनि कर्म अकर्ता ॥ १० ॥ अकर्ताचि तूं होशी कर्ता । कर्ता होत्साता अकर्ता । हे तुझी खांबसूत्रता । न कळे सर्वथा कोणातें ॥ ११ ॥ तुझी माया पाहों जातां । तोचि मायेनें ग्रासिला तत्त्वतां । असो तुजाचि पाहों म्हणतां । तेही सत्वावस्था मायेची ॥ १२ ॥ ऐसें तुझें खांबसूत्र । अकळ न कळे गा तुझें चरित्र । देखों नेदितां निजसूत्र । भूतें विचित्र नाचविशी ॥ १३ ॥ तुझेनि जग होये जाये । परी म्यां केलें हें ठावें नोहे । ऐसा तुझा खेळ पाहें । कोणें

कळसूत्री बाहुल्याचा खेळ करणाऱ्या सद्‌गुरूला नमस्कार असो. तूं चौऱ्यायशीं लक्ष बाहुल्यांना आपल्या इच्छेनुरूप कळसूत्रीयंत्रावर नाचवीत आहेस. १ तूं हातीं धरलेली दोरी न दिसूं देतां बाहुल्यांना स्वतः नाचवीत आहेस. हें तुझें सर्वदा अलिप्त राहून कार्य करण्याचें कौशल्य किती विलक्षण आहे पहा! २ जसें ज्याचें पूर्व कर्म असेल त्याप्रमाणें तूं प्रत्येक भूताला आपल्या चेतनाशक्तीनें नाचवीत आहेस. तुला हात नसतांहि भूतांना नाचविणारी चैतन्यशक्ति तुझ्या हातीं आहे. ३ जड लोहचुंबक जसा लोखंडाला आपल्या शक्तीनें खेळवीत असतो, तसा तूं सगळ्या प्राण्यांना आपल्या सत्तेनें नाचवीत आहेस. ४ अशाप्रकारें हे प्राणी परतंत्र होऊन जरी नाचत असतात, तरी अभिमानाच्या बळानें देहाचा आकार सत्य मानून ते 'आम्ही स्वतंत्र आहों' असें म्हणतात. ५ आम्ही अतिशय ज्ञानसंपन्न, हुषार, कर्म करण्यांत प्रवीण, विहित कर्म करणारे; इतर सगळे लोक मूर्ख, असा वृथा अभिमान वाढवीत असतात. ६ अशा प्रकारें स्वप्नांतील विषबाधेप्रमाणें ते देहाभिमानामुळें आपल्याकडे कर्माचें कर्तृत्व नाहीं, हें विसरून स्वतःच कर्मबंधांत पडतात. ७ स्वप्नांत विष अतिशय चढलें होतें; तें आतां उतरलें. या म्हणण्याप्रमाणेंच मूर्खलोक बंधमोक्षांना सत्य मानितात. ८ तुझा हा कळसूत्री खेळ मिथ्या असूनहि तूं आमच्या दृष्टीला तो सत्य असल्यासारखा भासवितोस, हें केवढें आश्चर्य! अशी तुझी अतर्क्य लीला आहे. ९ अचेतनांत तूं सहज प्रत्यक्ष चैतन्य दाखवितोस. हेंच तुझें रहस्य कोणाला कळत नाहीं. असा तूं करून अकर्ता आहेस. १० तूं अकर्ता असून कर्ता होतोस, आणि कर्ता होऊन पुनः अकर्ताच रहातोस. हा तुझा कळसूत्री खेळ कोणालाहि उलगडत नाहीं. ११ तुझ्या मायेला पहाण्याचा प्रयत्न करणारा त्या मायेंतच गुरफटला जातो. बरें, तुला पहावयास जावें तर तीहि मायेचीच सत्त्वावस्था होय. १२ असें तुझें हें कळसूत्र आहे. तुझें चरित्र समजणें अशक्य आहे. आपलें सूत्र दिसूं न देतां तूं या सर्व भूतांना नाचवितोस. १३ तुझ्यापासूनच हें जगत् उत्पन्न होतें व नाश पावतें. पण तें 'मीं केलें' असें तुला भान नसतें.

कायें लक्षावा ॥ १४ ॥ यापरी खेळ वाढविशी । सर्वेचि विकल्पोनि मोडिशी । विकार महत्तत्त्वीं सांठविशी । हेंही कर्तृत्व अंगासी न लगत गेलें ॥ १५ ॥ याचें मुख्यत्वें मूळ लक्षण । तुझे कृपेवीण न कळे जाण । तुझी कृपा झालिया पूर्ण । जनीं जनार्दन प्रकटे पैं ॥ १६ ॥ जनीं प्रकटल्या जनार्दन । तद्रूप होइजे आपण । हे मूळींची निजखूण । तेथ मीतूंपण रिगेना ॥१७॥ मीतूंपणेंवीण प्रसिद्ध । जनीं जनार्दन निजानंद । त्याचे कृपेस्तव विशद । श्रीभागवत शुद्ध वाखाणिलें ॥ १८ ॥ तेथ एकविसाव्याचे अंतीं । वेद त्रिकांड लक्ष्यार्थस्थिती । ब्रह्म एकचि निश्चितीं । अद्वयस्थिती अविनाशी ॥ १९ ॥ हें वेदार्थसारनिरूपण । ऐकतां उद्धवा पावली खूण । ब्रह्म एकाकी परिपूर्ण । दुजेनिवीण संचलें ॥ २० ॥ वेदवादें ब्रह्म एक । स्वानुभवें तैसेंचि देख । तरी ज्ञाते ऋषिजन लोक । केवीं तत्त्वें अनेक बोलती ॥ २१ ॥ येचि आशंकेलागीं जाण । उद्धवें स्वयें मांडिला प्रश्न । परी पोटांतील भिन्न खूण । उगा श्रीकृष्ण न रहावा ॥ २२ ॥ मी झालों जी ब्रह्मसंपन्न । हें ऐकतां माझें वचन । निजधामा निघेल श्रीकृष्ण । मग हें दर्शन मज कैंचें ॥ २३ ॥ ऐशिया काकुळतीं जाण । संशयेंवीण करी प्रश्न । तेंचि ऐकतां कृष्णवचन । सुखसमाधान भोगित ॥ २४ ॥ तंव कृष्णा वे मनीं आणिक । उद्धव मी दोघे एक । मिथ्या वियोगाचें दुःख । हें कळे तंव देख कृष्ण सांगे ॥ २५ ॥ बाविसावे अध्यायीं देख । तत्त्वसंख्या सांगेल आवश्यक । प्रकृतिपुरुषविवेक । जन्ममरणद्योतक प्रकारू ॥ २६ ॥ आत्मा एक कीं अनेक । आणि तत्त्वसंख्याविवेक । हें कळावया निष्टंक । उद्धव देख पूसत ॥ २७ ॥

असा तुझा हा खेळ आहे. त्याचें कोणी कसें वर्णन करावें ! १४ अशा प्रकारें तूं खेळ वाढवितोस आणि लगेच विकल्पानें मोडून टाकितोस. तूं महत्तत्त्वांत विकार सांठवून ठेवितोस; पण हेंहि कर्तृत्व तुला लागत नाहीं. तें जसें मिथ्या येतें तसेंच जातें. १५ याचें मूळ लक्षण मुख्यत्वेंकरून तुझ्या कृपेवांचून कळत नाहीं. तुझी पूर्ण कृपा झाली म्हणजे जनीं जनार्दन प्रकट होतो. १६ जनतेंत जनार्दन प्रकट झाला म्हणजे आपण तद्रूप होतों, हेंच त्यांतील मुख्य बीज आहे. तेथें 'मी तूं'पणा रहात नाहीं. १७ 'मी तूं' पणावांचूनच लोकांत आत्मानंदरूपी जनार्दन प्रसिद्ध आहे. त्याच्या कृपेमुळेंच मीं श्रीभागवताचें स्पष्ट वर्णन केलें. १८ एकविसाव्या अध्यायाच्या शेवटीं त्रिविध वेदांचा लक्ष्यार्थ सांगून अविनाशी अद्वय ब्रह्म एकच आहे, हें सांगितलें. १९ तें वेदार्थसारनिरूपण ऐकून उद्धवाला 'एकच अद्वितीय ब्रह्म परिपूर्णरूपानें स्थित आहे' ही खूण पटली. २० 'पण वेदवाणीवरून ब्रह्म एकच आहे आणि आपल्या अनुभवासहि तसेंच येतें, असें असतां विद्वान् ऋषि अनेक प्रकारचीं तत्वें कशीं सांगतात,' २१ अशी शंका मनांत आल्यामुळें बाहेरून उद्धवानें हा प्रश्न केला. परंतु 'श्रीकृष्णानें गप्प बसूं नये' ही त्याच्या मनांतील उत्कट इच्छा होती. २२ 'मी आतां ब्रह्मसंपन्न झालों,' असें म्हणतांच श्रीकृष्ण निजधामाला जाण्यास निघेल, मग मला त्याचें हें दर्शन कसें घडणार ! २३ अशा काकुळतीनें उद्धव खरी आशंका नसतांचे प्रश्न करीत होता आणि त्याचें श्रीकृष्णानें उत्तर दिलें म्हणजे त्याला खरें सुख-समाधान होत असे. २४ त्यावेळीं श्रीकृष्णाच्या मनांत निराळाच विचार आला. 'मी आणि उद्धव हे दोघे एक असतांना याला वियोगदुःखाचें मिथ्याच भय वाटत आहे;' पण ही गोष्ट उद्धवाला चांगली पटेपर्यंत श्रीकृष्ण पुढें सांगूं लागला [मनांत कांहीं संशय नसतां उद्धवानें प्रश्न केला आणि श्रीकृष्णानें आम्हीं दोघे एकरूपच आहोंत हें दृढ ठसविण्यासाठीं उत्तर दिलें. यावरून त्यानें जगत्कल्याणासाठीं किंवा द्वैतमिषानें स्वसुखानुभव द्विगुणित करण्यासाठीं हा संवाद पुढें चालविला आहे.] २५ या बाविसाव्या अध्यायांत तत्त्वांची एकंदर संख्या सांगून त्यांतच प्रकृति-पुरुषांचा विचार व जन्म-मरणांचा प्रकार यांचें स्पष्ट निरूपण करतील. २६ आत्मा एक आहे कीं अनेक आणि तत्त्वांची संख्या किती आहे, हें निश्चित कळण्यासाठीं उद्धव प्रश्न करीत आहे. २७

उ० उ०–कति तत्त्वानि विश्वेश संख्यातान्यृषिभिः प्रभो । नवैकादश पञ्चत्रीण्यात्थ त्वमिह शुश्रुम ॥ १ ॥
केचित्षड्विंशतिं प्राहुरपरे पंचविंशतिम् । सप्तैके नव षट् केचिच्चत्वार्येकादशापरे ॥ २ ॥
केचित्सप्तदश प्राहुः षोडशैके त्रयोदश । एतावत्त्वं हि संख्यानामृषयो यद्विवक्षया ॥ ३ ॥

विश्वात्मका विश्वेश्वरा । विश्वधारका विश्वंभरा । विश्वसाक्षी विश्वाकारा । विश्वैकसुंदरा श्रीकृष्णा ॥ २८ ॥ तुज विश्वात्मक म्हणतां । जड मलिन एकदेशिता । आली म्हणशी अज्ञानता । यालागीं प्रभुता उपपादी ॥ २९ ॥ जड मलिन अज्ञानता । हे मायेस्तव होती तत्त्वतां । ते मायेचा तूं नियंता । हे अगाध प्रभुता पैं तुझी ॥ ३० ॥ ऐशिया स्वप्रबोधनद्वारा । विनवूनि स्वामी शारंगधरा । तत्त्वसंख्येच्या विचारा । निजनिर्धारा पूसत ॥ ३१ ॥ जे तपःसामर्थ्यें समर्थ थोर । अनागतद्रष्टे ऋषीश्वर । त्यांची तत्त्वसंख्या विचित्र । पृथक्पृथगाकार बोलती ॥ ३२ ॥ तत्त्वसंख्या इत्थंभूत । एकुणिसाव्या अध्यायांत । तुम्हींच निरूपिला तत्त्वार्थ । तोचि वृत्तांत सांगत ॥ ३३ ॥ ॥ पूर्वश्लोकार्थ ॥ "नवैकादशपंचत्रीणि" ॥ चौदावे श्लोकींच्या निरूपणीं । हे अठ्ठावीस तत्त्वगणनीं । सांगितली शार्ङ्गपाणी । मजलागोनि निश्चित ॥ ३४ ॥ ये तत्त्वसंख्येचा विचार । प्रकृति पुरुष महदहंकार । पंच महाभूतें थोर । हा संख्याप्रकार नावांचा ॥ ३५ ॥ दाही इंद्रियें अकरावें मन । पंच विषय तीन्ही गुण । हे अठ्ठावीस संख्यागण ।

[या बाविसाव्या अध्यायांत तत्त्वांच्या संख्यांच्या अविरोधाचा प्रकार, पुरुष व प्रकृति यांचा विवेक व जन्म-मृत्यूचा प्रकार सांगितला आहे.]

—गेल्या अध्यायांत वर्णन केल्याप्रमाणें वेदादिकांच्या प्रवृत्तिपरत्वाचें निराकरण करून मोक्षपरत्वाचा निर्णय केला. वेदांना मोक्षपरत्व आहे, हें जरी निश्चित झालें, तरी त्याच्या अवांतर विषयांविषयीं विवाद आहे. कोणी तत्त्वांच्या संख्येविषयीं विवाद करितात. त्यांतहि बाह्य विषयांच्या अस्तित्वाविषयीं व नास्तित्वाविषयीं वाद करितात. आत्म्याच्या एकत्वाविषयीं व नानात्वाविषयींहि वाद आहे. तेव्हां त्यांतील खरें काय ! हें जाणण्याच्या इच्छेनें उद्धव प्रश्न करीत आहे—

उद्धवः उवाच–उद्धव म्हणाला- **विश्वेश प्रभो**–हे विश्वेश्वरा, स्वामिन्, **ऋषिभिः कति तत्त्वानि संख्यातानि**–ऋषींनीं किती तत्त्वांची संख्या निश्चित केली आहे ! (त्यांनीं शास्त्रांमध्यें तत्त्वांची संख्या निरनिराळी सांगितली आहे. त्यांतील युक्त कोणती असा याचा भावार्थ. उद्धव आतां अगोदर भगवन्मताचा अनुवाद करून बहुधा तत्त्वगणनेचाच पुढील तीन श्लोकांनीं विस्तार करितो) **त्वं इह नव एकादश-पंच-त्रीणि आत्थ**–तूं नऊ, अकरा, पांच व तीन मिळून अठ्ठावीस तत्त्वें सांगतोस. **वयं शुश्रुम**–आम्ही तीं ऐकिलीं आहेत. **केचित् षड्विंशतिं प्राहुः**–कोणी सव्वीस तत्त्वें सांगतात, **अपरे पंचविंशतिं**–दुसरे कोणी पंचवीस सांगतात. **एके सप्त**–कित्येक सात सांगतात. **केचित् नव षट्** कोणी नऊ व सहा सांगतात. **अपरे चत्वारि एकादश**–दुसरे कित्येक चार व अकरा सांगतात, **केचित् सप्तदश प्राहुः**–कोणी सतरा सांगतात, **एके षोडशं त्रयोदश**–कित्येक सोळा व तेरा सांगतात. **ऋषयः यद्विवक्षया संख्यानां एतावत्त्वं हि पृथक् गायंति**–ऋषि ज्या अभिप्रायानें संख्यांचें हें असें नानात्व पृथक् पृथक् सांगतात, **आयुष्मन्**–हे नित्यमूर्ति ईश्वरा, **इदं नः वक्तुं अर्हसि**–तो अभिप्राय सांगण्यास तूंच योग्य आहेस. १–३.

हे विश्वात्मका विश्वेश्वरा, विश्वाला धारण करणाऱ्या विश्वंभरा, विश्वसाक्षिन्, विश्वाकारा, विश्वैकसुंदरा, श्रीकृष्णा ! २८ तुला विश्वात्मक म्हणावें तर तुझ्याकडे जडत्व, मलिनत्व, एकदेशित्व आणि अज्ञानत्व येतें. म्हणून तुझें प्रभुत्व मी सांगतों. २९ जड, मलिन व अज्ञान हीं मायेमुळें होतात. त्या मायेचा तूं नियामक आहेस. हें तुझें केवढें अचाट सामर्थ्य ! ३० अशा प्रकारें स्वामी श्रीकृष्णाचा गौरव करून उद्धव त्याला तत्त्वांच्या संख्येचा निश्चय विचारीत आहे. ३१ जे तपाच्या सामर्थ्यानें अत्यंत समर्थ व भविष्य जाणणारे श्रेष्ठ ऋषीश्वर त्यांची तत्त्वसंख्या फार विलक्षण आहे. ते वेगवेगळ्या प्रकारांनीं सांगतात. ३२ एकोणिसाव्या अध्यायांत तूं जें तत्त्वसंख्येचें सविस्तर वर्णन केलें आहेस, तेंच पुनः सांग. ३३ चौदाव्या श्लोकाच्या निरूपणांत तत्त्वांची गणना करून तीं अठ्ठावीस आहेत, असा तूं निश्चय केलास. ३४ त्या तत्त्वसंख्येच्या विचारांत प्रकृति, पुरुष, महत्, अहंकार आणि सर्वांत श्रेष्ठ पंचमहाभूतें मिळून नऊ तत्त्वें, ३५ दहा इंद्रियें, अकरावें मन, रूप-रसादि पांच विषय, सत्त्व-रजादि तीन गुण मिळून एकंदर अठ्ठावीस

स्वमुखें आपण निरूपिलें ।। ३६ ।। यापरी गा लक्ष्मीपती । हे मुख्यत्वें तुझी तत्त्वोक्ती । आतां ऋषीश्वरांच्या युक्ती । ऐक तुजप्रती सांगेन ।। ३७ ।। ते तूं ऐक गा निश्चित । तुज सांगेन तयाचा अर्थ । म्हणोनियां निरूपित । स्वयें मनोगत उद्धव ।। ३८ ।। म्हणे तत्त्वतां अवधारीं । मी सांगेन एक कुसरी । प्रकृतिपुरुषांमाझारी । विचित्र परी सांगत ।। ३९ ।।

येथ तत्त्वसंख्या मतवाद । ऋषीश्वरांमाजीं विवाद । त्या विवादाचे शब्द । ऐक विशद सांगेन ।। ४० ।। एक म्हणे तत्त्वें सव्वीस । दुजा म्हणे उगा बैस । बहु बोलावया नाहीं पैस । तत्त्वें पंचवीस नेमस्त ।। ४१ ।। तिजा म्हणे तुम्हीं येथ । कैसेनि वाढविलें स्वमत । तत्त्वें नेमस्तचि सात । कैंची बहुत बोलतां ।। ४२ ।। एक म्हणे हें अभिनव । बोलतां न लाजती मानव । वृथा बोलाची लवलव । तत्त्वें नव नेमस्त ।। ४३ ।। तंव हांसोनि बोले एक । सांपे सज्ञान झाले लोक । मिथ्या बहु तत्त्वजल्पक । तत्त्वषट्क नेमस्त ।। ४४ ।। एक म्हणती परते सरा । नेणा तत्त्वसंख्याविचारा । तत्त्वें नेमिलीं अकरा । बडबड सैरा न करावी ।। ४५ ।। दुजा म्हणे तत्त्वविचारा । नेणोनि धरिसी अहंकारा । पुसोनियां थोरथोरां । तत्त्वें सतरा नेमस्त ।। ४६ ।। एक म्हणे व्युत्पत्तिबळा । कां व्यर्थ पिटाल कपाळा । न कळे भगवंताची लीळा । तत्त्वें सोळा नेमस्त ।। ४७ ।। एक म्हणे या गर्विता पोरां । कोण पुसे तत्त्वविचारा । तत्त्वें नेमस्तचि तेरा । निजनिर्धारा म्यां केलें ।। ४८ ।। एक म्हणे सांडा चातुरी । तत्त्वें नेमस्तचि चारी । दुजा म्हणे या कायशा कुसरी । तत्त्वें निर्धारीं दोनचि ।। ४९ ।। तिजा म्हणे वाचाट लोक । कोणें धरावें यांचें मुख । निजनिर्धारीं तत्त्व एक । एकाचे अनेक विस्तार ।। ५० ।। एवं मत-परंपरा नानामतीं । ऋषीश्वरीं वेंचितां युक्ती । तुझ्या तत्त्ववादाची निश्चिती । कोणें इत्थंभूतीं मानावी ।। ५१ ।।

संख्या सांगून त्यांचें तूं आपल्या मुखानें निरूपण केलेंस. ३६ अरे बाबा लक्ष्मीपते ! मुख्यत्वें करून हें तुझें सांगणें आहे. आतां श्रेष्ठ ऋषीश्वर काय म्हणतात, तेंहि सांगतों, ऐक. ३७ 'मी त्याचा अर्थ तुला सांगतों, तोहि लक्षपूर्वक ऐकून घे.' असें म्हणून उद्धव स्वतः त्यांचें म्हणणें सांगूं लागला. ३८ तो म्हणाला कीं, मी एक आश्चर्य सांगतों, तें तत्त्वतः ऐक. प्रकृति-पुरुषांमध्येंच एक चमत्कारिक प्रकार आहे तो सांगतों. ३९.

या तत्त्वांच्या संख्येविषयीं पुष्कळ मतभेद आहे. त्यासंबंधीं अनेक ऋषीश्वरांमध्यें मोठा वाद माजून राहिला आहे. त्या वादाचें तात्पर्य मी स्पष्टपणें सांगतों, तें ऐक. ४० एक म्हणतो 'हीं तत्त्वें सव्वीस आहेत' तर दुसरा म्हणतो 'गप्प बैस, जास्त बोलावयाचें कारण नाहीं. तत्त्वें नेमकीं पंचवीसच आहेत' ४१ तिसरा म्हणतो 'तुम्ही वाद कसला वाढवीत बसलां आहांत ! तत्त्वें तर सगळीं सातच आहेत. जास्त कोणतीं सांगतां !' ४२ तेव्हां आणखी कोणी म्हणतो कीं, काय आश्चर्य आहे पहा ! या लोकांना बोलावयास लाजहि वाटत नाहीं. व्यर्थ बडबड करीत आहेत. तत्त्वें तर खरोखर नऊच आहेत. ४३ यावर आणखी एकजण हंसून म्हणतो- 'अलिकडे लोक फार शहाणे झाले आहेत. ते मिथ्या वल्गना करीत असतात. वास्तविक पहातां तत्त्वें सहाच आहेत.' ४४ पुनः एक म्हणतो- 'तुम्ही सगळे बाजूला व्हा. तुम्हांला तत्त्वांची खरी संख्या मुळींच ठाऊक नाहीं. खरीं तत्त्वें अकरा आहेत. तेव्हां व्यर्थ वटवट करूं नका' ४५ दुसरा म्हणतो–' तत्त्व म्हणजे काय हें देखिल ठाऊक नसतां खोटाच अभिनान कसला धरितोस ! मोठमोठ्यांच्या विचारानें सतरा तत्त्वें ठरलीं आहेत.' ४६ कोणी म्हणतो–' विद्वत्तेच्या घमेंडींत व्यर्थ कपाळ फोडीत बसलां आहांत झालें ! तुम्हांला भगवंताची लीला काय ठाऊक आहे ! तत्त्वें सगळीं सोळा आहेत.' ४७ यावर दुसरा म्हणतो– 'या गर्विष्ठ पोरांच्या तत्त्वविचाराला कोण विचारतो ! मी आपल्या स्वतःच्या निर्णयानें तेरा तत्त्वें निश्चित ठरविलीं आहेत.' ४८ एक म्हणतो–'तुमचें पंडित्य पुरें करा, तत्त्वें सगळीं चारच आहेत.' दुसरा म्हणतो- 'यांत काय अर्थ आहे ! खरीं तत्त्वें दोनच आहेत.' ४९ तिसरा म्हणतो–' हे सगळे वाचाळ आहेत, यांचें तोंड कोणीं धरावें ! खरोखर सगळें एकच तत्त्व आहे. एकाचा विस्तार होऊन अनेक तत्त्वें झालीं आहेत.' ५० अशा प्रकारच्या नाना प्रकारच्या युक्तींनीं ऋषीश्वर आपापल्या परी अनेक मतें प्रतिपादन करितात. तेव्हां तुझा तत्त्वनिर्णय निश्चित कसा मानावा ! ५१.

गायन्ति पृथगायुष्मन्निदं नो वक्तुमर्हसि ॥३॥

तूं निजात्मा परमेश्वर । तुज जाणावया ऋषीश्वर । वेंचूनि युक्तीचे संभार । तत्त्वविचार बोलती ॥ ५२ ॥ स्वामीनें सांगीतलें तत्त्व एक । ऋषीश्वर बोलती अनेक । येचि विषयींचें निष्टंक । मज आवश्यक सांगावें ॥ ५३ ॥ एवं या तत्त्वनिश्चयासी । मज सांगावया योग्य होसी । ऐसा विनविला हृषीकेशी । तो उद्धवासी तुष्टला ॥ ५४ ॥ जीं जीं ऋषीश्वर बोलती । तीं तीं तत्त्वें सत्य होती । हें सर्वज्ञ ज्ञाते जाणती । तेंचि अर्थीं हरि बोले ॥ ५५ ॥

श्री० भ०–युक्तयः सन्ति सर्वत्र भाषन्ते ब्राह्मणा यथा । मायां मदियामुद्गृह्य वदतां किं नु दुर्घटम् ॥ ४ ॥

ज्याचेनि मतें जैसें ज्ञान । तो तैसें करी तत्त्वव्याख्यान । या हेतू बोलती ब्राह्मण । तें सत्य जाण उद्धवा ॥ ५६ ॥ जरी अवघीं मतें प्रमाण । तरी कां करावें मतखंडण । उद्धवा तूं ऐसें न म्हण । ते मी निजखूण सांगेन ॥ ५७ ॥ अघटित घडवी माझी माया । जे हरिहरां न ये आया । जे नाथिलें वाढवूनियां । लोकत्रया भुलवित ॥ ५८ ॥ ते माया धरोनियां हातें । ऋषीश्वर निजमतें । जो जो जें जें बोलेल जेथें । तें तें तेथें घडे सत्य ॥ ५९ ॥ केवळ दोराचा सर्पाकार । हा श्वेत कृष्ण कीं रक्तांबर । ज्यासी जैसा भ्रमाकार । त्यासी साचार तो तैसा ॥ ६० ॥ तेवीं आत्मतत्त्व एकचि जाण । अधिकारी निजनिर्गुण । तेथ नाना तत्त्वांचें व्याख्यान । बोलती ब्राह्मण मायायोगें ॥ ६१ ॥ ते मायेच्या मायिका व्युत्पत्ती । नाना वाग्वाद स्वमतीं । त्याच वादाची वादस्थिती । ऐक तुजप्रती सांगेन ॥ ६२ ॥ ऐसें

तूं जो सर्वांतर्यामी परमात्मा, त्या तुला जाणण्यासाठीं ऋषीश्वर नाना युक्ति योजून तत्त्वांचा विचार करितात. ५२ प्रभूनें एकच तत्त्व सांगितलें आहे; पण ऋषीश्वर त्याला अनेक समजतात. तरी याविषयींचा निश्चय मला अवश्य सांगावा. ५३ या तत्त्वांचा निश्चय सांगण्यास तूंच योग्य आहेस. उद्धवाच्या या विनंतीनें श्रीकृष्ण संतुष्ट झाला. ५४ ऋषीश्वरांनीं जीं तत्त्वें सांगितलीं, तीं सर्व खरीं आहेत, हें सर्व विद्वान् जाणतात. या विषयींच हरि आता सांगत आहे. ५५.

—भिन्नभिन्न अभिप्रायानें त्या सर्वहि संख्या युक्तच आहेत. मायेच्या योगानें काय अयुक्त असणार ! असें भगवान् सांगतात—

श्रीभगवान् उवाच–भगवान् म्हणाले,–यथा ब्राह्मणाः भाषन्ते–ब्राह्मण जें बोलतात तें युक्तच आहे. सर्वत्र युक्तयः संति–कारण सर्व तत्त्वें सर्वांमध्यें अंतर्भुत होतात. मदीयां मायां उद्गृह्य वदतां किं नु दुर्घटं–माझ्या मायेचा आश्रय करून बोलणाऱ्या त्यांना दुर्घट असें काय आहे ! मायेचा आश्रय केला असतां मिथ्या पदार्थहि सत्य असल्याप्रमाणें भासतात. मृगजलाच्या परिणामादिकांचा विचार करूं लागलें असतां अघटित असें कांहींच वाटत नाहीं. ४.

ज्याचें ज्ञान जसें असतें, तो त्या आपल्या मताप्रमाणें तत्त्वांचें व्याख्यान करीत असतो. यास्तव ब्राह्मण जें बोलतात तें खरेंच समजावें. ५६ उद्धवा ! यावर तूं कदाचित् असें म्हणशील कीं सगळीं मतें जर प्रमाण आहेत, तर मग त्यांच्या मतांचें खंडन करण्याची तरी काय गरज आहे ! तर उद्धवा ! तूं असें म्हणूं नकोस. कारण मी तुला त्यांतील गूढ अर्थ सांगतो, ऐक. ५७ माझी माया अघटित घटना करीत असते. हरि-हरांसहि तिचें आकलन करितां येत नाहीं. ती नसलेली मिथ्या सृष्टि निर्माण करून त्रिभुवनाला भुलवीत असते. ५८ त्या मायेला हातीं धरून श्रेष्ठ ऋषीश्वर आपलें जें मत प्रतिपादन करितात तसें खरोखर घडत असतें. ५९ केवळ दोरखंड पडलेलें असतांना तें सापासारखें भासतें. मग तो साप पांढरा, काळा कीं तांबडा आहे, हें प्रत्येकजण आपापल्या भ्रांतीप्रमाणें ठरवीत असतो. ६० त्याप्रमाणें निर्गुण, निर्विकार आत्मतत्त्व सगळें एकच आहे. परंतु ब्राह्मण मायेमुळें अनेक तत्त्वांचें प्रतिपादन करितात. त्यांचें तें मायात्मक भाषण मायामयच असतें. स्वमताच्या प्रतिपादनासाठीं ते नानाप्रकारें वाद करीत असतात. ते कसा वाद करितात, तें मी तुला सांगतों, ऐक. ६२ असें बोढून श्रीकृष्णनाथानें स्वतः उद्धवाला सांग

बोलोनि श्रीकृष्णनाथ । उद्धवाप्रति साङ्ग निरूपित । तत्त्वविचारणा यथार्थ । स्वयें सांगत आपण ॥ ६३ ॥ हें पांचवे श्लोकींचें निरूपण । श्रीकृष्णउद्धवविवरण । सांगीतलें तत्त्वव्याख्यान । उद्धवा जाण यथार्थ ॥ ६४ ॥

नैतदेवं यथात्थ त्वं यदहं वच्मि तत्तथा । एवं विवदतां हेतुं शक्तयो मे दुरत्ययाः ॥ ५ ॥

माझें मायेचें प्रबळ बळ । तेणें अभिमान अतिसबळ । वाढवूनि युक्तीचें वाग्जाळ । करिती कोल्हाळ वाग्वादी ॥ ६५ ॥ प्रबळ शास्त्रश्रवणाभिमान । तुझें वचन तें अप्रमाण । मी बोलतों हेंचि प्रमाण । पत्रावलंबन केलें असे ॥ ६६ ॥ सत्वरजादि गुणोत्पत्ती । माझे मायेच्या अनंत शक्ती । तेणें गुणक्षोभें विवादती । स्वमतव्याप्तीअभिमानें ॥ ६७ ॥

यासां व्यतिकरादासीद्विकल्पो वदतां पदम् । प्राप्ते शमदमेऽप्येति वादस्तमनुशाम्यति ॥ ६ ॥

कां गुणक्षोभें अभिमान । विकल्प उपजवी गहन । विकल्पें युक्तीचें छळण । करी आपण अतिवादें ॥६८॥ सांडितां गुणक्षोभविलास । रजतमांचा होय ऱ्हास । सत्वबृत्तीचा निजप्रकाश । अतिउल्हास शमदमांचा ॥ ६९ ॥ शमदमांचे निजवृत्ती । संकल्प विकल्पेंसीं जाती । बाद अतिवाद उपरमती । जेवीं सूर्याप्रती आंधारें ॥ ७० ॥ सर्वज्ञ ज्ञाते जे गा होती । ते नाना तत्त्वांच्या तत्त्वोक्ती । स्वयें विवंचूनि जाणती । ऐक तुजप्रती सांगेन ॥ ७१ ॥

तत्त्वविचार यथार्थ सांगितला. ६३ या पांचव्या श्लोकांत श्रीकृष्ण-उद्धवविवरण आहे. त्यांत श्रीकृष्णानें उद्धवाला तत्त्वांचें यथार्थ व्याख्यान करून सांगितलें आहे. ६४.

—जर सर्वच युक्त आहे तर वाद्यांचा हा विवाद कां ! मायाच जर याचें अवलंबन आहे तर जगत्कारणाविषयीं तरी मतभेद कां ? उत्तर—

यथा त्वं आत्थ एतत् एवं न यत् अहं वच्मि तत् तथा– तू जसें सांगतोस तसें नाहीं, तर मी म्हणतों तसेंच आहे. एवं हेतुं विवदतां मे दुरत्ययाः शक्तयः- याप्रमाणें कारणाविषयीं परस्पर वाद करणाऱ्या वाद्यांच्या वादाचें कारण माझ्या अनुल्लंघनीय, अंतःकरणवृत्तिविशेष—आकारानें परिणत झालेल्या सत्त्वादि शक्तीच आहेत. ५.

वितंडवाद करणारे पंडित मायेच्या योगानें प्रबल अभिमान धरितात आणि अनेक युक्ति-प्रयुक्तींनीं शब्दावडंबर माजवून वाद-विवाद वाढवितात. ६५ त्यांना शास्त्रश्रवणाचा भयंकर अभिमान असतो. त्यामुळें 'तुझें बोलणें अगदीं मिथ्या, अप्रमाण आहे. मी बोलतों तेंच प्रमाण आहे. याला माझ्याजवळ धर्मग्रंथांचा आधार आहे.' असें म्हणून ते स्वपक्षाचें समर्थन करीत असतात. ६६ सत्त्वरजादि गुणांच्या उद्भवामुळें माझ्या मायेच्या अनंत शक्ति संभवतात त्यामुळें गुण क्षुब्ध होतांच 'आपलेंच मत खरें' अशा अभिमानानें ते भांडत सुटतात. ६७.

—त्या दुरत्यय शक्तींच्या विवादहेतुत्वाचें उपपादन करितात—

यासां व्यतिकरात् वदतां पदं विकल्पः आसीत्–ज्या शक्तीच्या क्षोभामुळें वाद करणारांचा विषय भेद किंवा तन्मूलभूत अंतःकरणवृत्तिविकल्प झाला आहे. [आतां हेंच व्यतिरेकानें दृढ करितात–] शम–दमे प्राप्ते, विकल्पः अप्येति– पण या वक्त्यांचा आश्रयभूत विकल्प शम–दमांची प्राप्ति झाली असतां लीन होतो. तं अनु वादः शाम्यति–व त्या विकल्पाची निवृत्ति झाली असतां वाद शांत होतो. ६.

सत्त्वादि गुण क्षुब्ध झाले म्हणजे अभिमान उद्भवतो आणि त्यामुळें भयंकर विकल्प उत्पन्न होतात. वाद-विवादानें त्या विकल्पयुक्तींचें खंडण करितो. ६८ या गुणक्षोभाचा त्याग केला असतां रज-तमांचा नाश होऊन सत्त्ववृत्ति प्रकाशते. त्यामुळें शम- दमांचा उत्कर्ष होतो. ६९ सूर्योदय होतांच अंधकार जसा नाहींसा होतो, त्याप्रमाणें शम-दमांच्या वृत्ति जागृत होतांच संकल्पविकल्पासह वाद-विवाद शांत होतो. ७० यास्तव जे सर्वज्ञ ज्ञाते असतात ते तत्त्वासंबंधीं नाना प्रकारच्या मतांचा विचार करून त्यांतील मर्माचें स्वतः विवेचन करितात. उद्धवा, मी आतां तुला तेंच सांगतों, ऐक. ७१.

परस्परानुप्रवेशात्तत्त्वानां पुरुषर्षभ । पौर्वापर्यप्रसंख्यानं यथा वक्तुर्विवक्षितम् ॥ ७ ॥
एकस्मिन्नपि दृश्यन्ते प्रविष्टानीतराणि च । पूर्वस्मिन्वा परस्मिन्वा तत्त्वे तत्त्वानि सर्वशः ॥ ८ ॥

गुरुपाशीं शास्त्रपाठा । करूनि साधिली निजनिष्ठा । ऐक उद्धवा पुरुषश्रेष्ठा । प्रियवरिष्ठा प्रियोत्तमा ॥ ७२ ॥ तत्त्वगणनेचे जे जे लेख । एकाचें थोडें एकाचें अधिक । हा अनुप्रवेश वोळख । एकामाजीं एक उपजती ॥ ७३ ॥ तत्त्वांपासूनि तत्त्वें होती । कारणरूपें कार्यांची स्थिती । अंतीं जेथील तेथें प्रवेशती । हे तत्त्वोपपत्ती उद्धवा ॥ ७४ ॥ पूर्वस्थित जें कारण । त्यापासोनि उपजे तें कार्य जाण । हें कार्यकारणांचें लक्षण । तत्त्वविचक्षण बोलती ॥ ७५ ॥ येथ वक्त्याचें जैसें मनोगत । तैशी तत्त्वसंख्या होत । कार्य कारण एकचि गणित । तत्त्वसंख्या तेथ थोडीच ॥ ७६ ॥ एकचि कार्य आणि कारण । गणितां आणिती भिन्न भिन्न । तेथ तत्त्वसंख्या अधिक जाण । होय गणन उद्धवा ॥ ७७ ॥ एवं कार्यकारणें भिन्नभिन्नें । तत्त्वसंख्या थोडी बहुत होणें । ही तत्त्व वक्त्यांचीं लक्षणें । तुज सुलक्षणें सांगीतलीं ॥ ७८ ॥ येचि विषयींची उपपत्ती । स्वयें सांगताहे श्रीपती । कार्यकारणनिजयुक्ती । उद्धवाप्रती निवाडे ॥ ७९ ॥

आकाशापासूनि वायु झाला । तो गगनावेगळा नाहीं गेला । वायूपासूनि अग्नि झाला । तेथ प्रवेशू आला दोहींचा ॥ ८० ॥ अग्नीपासूनि झाला जळरसू । त्यामाजीं तिहींचा रहिवासू । जळापासूनि पृथ्वीचा प्रकाशू । तीमाजीं प्रवेशू चहूंचा ॥ ८१ ॥ तैसें कार्य आणि कारण । परस्परें अभिन्न जाण । जेवीं लेणें

—चवथ्या श्लोकांत ' सन्ति सर्वत्र ' असें जें म्हटलें होतें त्याचा पुढील दोन श्लोकांनीं विस्तार करितात—

पुरुषर्षभ-हे पुरुषश्रेष्ठा ! **तत्त्वानां परस्परानुप्रवेशात् वक्तुः यथा विवक्षितं तथा पौर्वापर्यप्रसंख्यानं भवति** —तत्त्वांचा परस्पर अनुप्रवेश केल्यामुळें वक्त्याची जशी विवक्षा असेल त्याप्रमाणें कार्यकारण-भावानें गणना होते किंवा अल्प व अधिक संख्येचा जो भाव तेंच पौर्वापर्य होय. (आतां अनुप्रवेशच दाखवितात-) **एकस्मिन् अपि पूर्वस्मिन् वा परस्मिन् वा तत्त्वे इतराणि तत्त्वानि प्रविष्टानि दृश्यन्ते**—मृत्तिकेमध्यें जसा घट त्याप्रमाणें एका कारणतत्त्वामध्येंहि इतर कार्यतत्त्वें सूक्ष्मरूपानें प्रविष्ट झालेलीं दिसतात. तसेंच घटांतील मृत्तिकेप्रमाणें एकाच कार्यतत्त्वामध्यें कारणतत्त्वें अनुवृत्तरूपानें प्रविष्ट झालेलीं दिसतात. ७–८.

हे प्रियमय पुरुषश्रेष्ठ उद्धवा ! गुरूपाशीं शास्त्राभ्यास करून मीं जी आत्मनिष्ठा साधली, ती ऐक. ७२ तत्त्वांच्या संख्येविषयीं जेवढीं मतें आहेत, त्या सर्वांचीं तत्त्वें कोणाचीं अधिक तर कोणाचीं उणीं ठरतात. कारण तीं एकमेकांत गुंतलेलीं असल्यामुळें एकापासून दुसरें उत्पन्न होतें. ७३ उद्धवा ! तत्त्वांपासूनच तत्त्वें उत्पन्न होतात. कारणरूपानें कार्याची स्थिति होते आणि शेवटीं जेथलें तत्त्व तेथेंच प्रवेश करून लीन होतें. अशी ही तत्त्वांची उपपत्ति आहे. ७४ आरंभीचें जें कारण असतें, त्याच्यासून कार्य उपजतें. त्या कार्यकारणांचें लक्षण तत्त्ववेत्तेच जाणतात. ७५ यामुळें व्याख्यान करणारांची जशी इच्छा असेल, तशी तत्त्वांची संख्या होत असते. जे कार्य आणि कारण दोन्हीं एकच मानितात त्यांच्या तत्त्वांची संख्या थोडी असते. ७६ उद्धवा ! एकच कार्य आणि कारण यांची जे भिन्न भिन्न मोजदाद करितात, त्यांच्या तत्त्वांची संख्या सहजच वाढत जाते. ७७ याप्रमाणें कार्य आणि कारण यांची भिन्न भिन्न प्रकारें गणना केली असतां तत्त्वांची संख्या कमी किंवा अधिक भरते. हा तत्त्व सांगणाऱ्या विद्वानांचा प्रकार मीं तुला सांगितला ७८ याविषयींचें अधिक स्पष्टीकरण आणि कार्य-कारणांविषयीं आपलें स्पष्ट मत श्रीकृष्ण उद्धवाला सांगत आहे. ७९.

आकाशापासून वायु झाला; पण तो कांहीं आकाश सोडून दूर जात नाहीं. वायूपासून अग्नि झाला; पण त्यांत आकाश व वायु या दोहोंचा प्रवेश आहे. ८० अग्नीपासून जल झालें; त्यांत आकाशादि तिहींचा अंतर्भाव होतो. जलापासून पृथ्वी झाली; पण तिच्यांत या चारींचा समावेश होतो. ८१ सुवर्ण आणि त्याचे दागिने जसे

आणि सुवर्ण । वेगळेपण एकत्वें ॥ ८२ ॥ जेवीं तंतू आणि पट । दोनीं दिसती एकवट । तेवीं कार्य कारण सगट । दिसे स्पष्ट अभिन्न ॥ ८३ ॥ साकरेंची नारळें केळीं । परी तीं साकरत्वा नाहीं मुकलीं । तेवीं कारणांची कार्यें झालीं । असतां संचलीं कारणत्वें ॥ ८४ ॥ जेवीं कां पृथ्वीचा मृत्पिंड । मृत्पिंडीं अनेक भांड । होती गाडगीं उदंड । मृत्तिका अखंड सर्वांमाजीं ॥ ८५ ॥ तेवीं कारणीं कार्यविशेषू । कार्यासी कारणत्वें प्रकाशू । हा परस्परानुप्रवेशू । अनन्य विलासू अखंडत्वें ॥ ८६ ॥ एक कार्य आणि कारण । होय भिन्न आणि अभिन्न । तेणें तत्त्वसंख्यालक्षण । घडे जाण न्यूनाधिक्यें ॥ ८७ ॥

पौर्वापर्यमतोऽमीषां प्रसङ्ख्यानमभीप्सताम् । यथा विविक्तं यद्वक्त्रं गृह्णीमो युक्तिसम्भवात् ॥ ९ ॥

म्यां सांगीतली तैशी जाण । तत्त्वसंख्या अधिकन्यून । व्हावया हेंचि कारण । वक्त्याची ज्ञानविवक्षा ॥ ८८ ॥ जैसें ज्यासी असे ज्ञान । जैसा इप्सितमताभिमान । तैसतैसें तत्त्वव्याख्यान । ऋषीश्वर जाण बोलती ॥ ८९ ॥ जो बोले ज्या मतयुक्ती । तें तें घडे त्या मतसंमतीं । हें मी जाणें सर्वज्ञ श्रीपती । यालागीं त्या युक्ती मीही मानीं ॥ ९० ॥ जें बोलिले ऋषिजन । सव्वीस तत्त्वें विवंचून । उद्धवा तुज मी सांगेन । सावधान अवधारीं ॥ ९१ ॥

अनाद्यविद्यायुक्तस्य पुरुषस्यात्मवेदनम् । स्वतो न सम्भवादन्यस्तत्त्वज्ञो ज्ञानदो भवेत् ॥ १० ॥

एकरूप असतात, त्याप्रमाणें कार्य आणि कारण हीं एकमेकांपासून भिन्न नाहींत. ८२ वस्त्रांतील तंतु आणि वस्त्र हीं दोन्हीं जशीं एकत्र दिसतात, त्याप्रमाणें कार्य आणि कारण हीं दोन्हीं स्पष्टपणें एकरूपच आहेत. ८३ साखरेचा नारळ व केळीं बनविलीं तरी साखर आपल्या मूळच्या रूपाला अंतरत नाहीं. त्याप्रमाणें कारणापासून झालेलीं कार्यें कारणरूपानेंच व्याप्त असतात. ८४ किंवा पृथ्वीचीच माती घेतली आणि तिचीं नानाप्राकरचीं भांडीं बनविलीं तर असंख्य गाडगीं होतात, पण त्या सगळ्यांत माती एकच असते; ८५ त्याप्रमाणें कारण कार्यामध्यें ओतप्रोत असतें. कारणानेंच कार्य प्रकट होतें. हें परस्पर अखंड ऐक्य आहे. ८६ एकच कार्य आणि कारण भिन्न दृष्टीनें भिन्न व अभिन्न होतें. त्यामुळें तत्त्वांची संख्या कमी अधिक-भरते. ८७.

—आतां या अविरोधाचाच उपसंहार करितात—

अतः अमीषां पौर्वापर्यं प्रसंख्यानां च अभीप्सतां यथा यद्वक्त्रं तथा तत्सर्वं विविक्तं युक्तिसंभवात् गृह्णीमः—यास्तव या तत्त्वांचें कारणकार्यत्व व न्यूनाधिक संख्या यांची इच्छा करणाऱ्या वाद्यांतील ज्याचें ज्या विवक्षेनें जसें मुख प्रवृत्त होतें तसेंच तें सर्व, पूर्वोक्त न्यायानें सर्व पक्षांमध्यें युक्तीचा संभव असल्यामुळें, आम्ही निश्चयानें मान्य करितों. ९.

मीं सांगितल्याप्रमाणें तत्त्वांची संख्या कमी-जास्त होण्याचें कारण वक्त्याची इच्छा होय. जसें ज्याचें ज्ञान असेल, ८८ जसा ज्यांस इष्ट मताचा अभिमान असेल तसें ऋषीश्वर तत्त्वांचें व्याख्यान करितात. ८९ जो ज्या मताभिमानानें बोलत असतो, तें त्याचें बोलणें त्या मताला संमत असतें. हें मी सर्वज्ञ श्रीहरी जाणतों, म्हणून त्याचें म्हणणें मी मान्य करितों. ९० ऋषींनीं जीं सव्वीस तत्त्वें विचार करून ठरविलीं आहेत, तीं मी तुला सांगतों, तरी हे उद्धवा ! सावधान चित्तानें ऐक. ९१.

—' अहोपण, कार्य-कारण तत्त्वांच्या भेदाभेदविवक्षेनें संख्याभेद होवो; पण जीवेश्वरांच्या भेदाभेदविवक्षेनें सव्वीस व पंचवीस हे पक्ष कसे प्रवृत्त होतात—

अनाद्यविद्यायुक्तस्य पुरुषस्य आत्मवेदनं स्वतः न संभवात् अन्यः तत्त्वज्ञः ज्ञानदः भवेत्—अनादि अविद्येनें युक्त असलेल्या पुरुषाचें आत्मज्ञान स्वतः संभवत नाहीं, तर तें दुसऱ्यापासून संभवतें. यास्तव स्वतः सर्वज्ञ असलेला दुसरा ज्ञानदाता परमेश्वर अवश्य असला पाहिजे, असा हा सव्वीस तत्त्वें मानणाऱ्या सेश्वर सांख्यांचा अभिप्राय आहे. १०,

प्रकृतिपुरुषमहत्तत्त्वें येथें । अहंकार आणि महाभूतें । इंद्रियें विषयसमेतें । ये तत्त्वें निश्चितें पंचवीस ॥ ९२ ॥ येथ पुरुष होऊनि भिन्न । जीव वेगळा करूनि जाण । तत्त्वसंख्यालक्षण । केली संपूर्ण सव्वीस ॥ ९३ ॥ जीवाच्या भिन्नत्वाचें कारण । अनादि अविद्येस्तव जाण । घेऊनि ठेला देहाभिमान । कर्मबंधन दृढ झालें ॥ ९४ ॥ अहंकर्तेपणाचा खटाटोप । तेणें अंगीं आदळे पुण्यपाप । विसरला निजरूप । विषयलोलुप्य वाढवितां ॥ ९५ ॥ लागलें बद्धतेचें बंधन । न करवे कर्मपाशच्छेदन । त्याच्या उद्धरालागीं जाण । ज्ञानदाता सर्वज्ञ ईश्वर ॥ ९६ ॥ गुरुद्वारा पाविजे ज्ञान । तेथें ईश्वराचा आभार कोण । येथ ईश्वरकृपेवीण । सद्‌गुरु जाण भेटेना ॥ ९७ ॥ झालिया सद्‌गुरुप्राप्ती । ईश्वरकृपेवीण न घडे भक्ती । सद्‌गुरु तोचि ईश्वरमूर्ती । वेदशास्त्रार्थीं संमत ॥ ९८ ॥ गुरुईश्वरा भिन्नपण । ऐसें देखे तो नागवला आपण । एवं ईश्वरानुग्रहें जाण । ज्ञानसंपन्न होय जीवू ॥ ९९ ॥ गुरूंनीं सांगीतली ज्ञानस्थिती । ते ईश्वरकृपेवीण चित्तीं । ठसावेना साधकांप्रती । जाण निश्चितीं उद्धवा ॥ १०० ॥ जीव नियम्य ईश्वर नियंता । जीव अज्ञान ईश्वर ज्ञानदाता । जीव परिच्छिन्न एकदेशतां । ईश्वर सर्वथा सर्वज्ञ ॥ १ ॥ जीव हीन दीन अज्ञान । ईश्वर समर्थ सर्वज्ञ । जीवास दृढ कर्मबंधन । ईश्वर तो जाण निष्कर्म ॥ २ ॥ एवं ईश्वरकृपें जाण । जीवासी प्राप्त होय ज्ञान । या लागीं ईश्वराहून जीव भिन्न या हेतू ॥ ३ ॥ म्हणशी करितां कर्माचरण । जीवासी प्राप्त होईल ज्ञान । हें सर्वथा न घडे जाण । जडत्वपण कर्मासी ॥ ४ ॥ कर्मा जडत्व जाण । त्यासी बद्धत्व अज्ञान । त्या कर्मासी अत्यंत बद्धपण । हें सज्ञान जाणती ॥ ५ ॥ कर्म स्वरूपें जड अचेतन । त्यासी चेतविता ईश्वर जाण । तें न करितां ईश्वरार्पण । ज्ञानदाता कोण कर्मासी ॥ ६ ॥ कर्मासी जडत्वें नाहीं सत्ता । कर्मक्रियेचा ईश्वर ज्ञाता । ईश्वराचि कर्मफळदाता । कर्मचेतविता ईश्वरू ॥ ७ ॥ जीवासी ज्ञानें सायुज्यता । का स्वर्गभोगफळदाता ।

प्रकृति, पुरुष, महत्तत्त्व, अहंकार, पंचमहाभूतें, पांच विषय व मनासह अकरा इंद्रियें मिळून पंचवीस तत्त्वें झालीं. ९२ यांत ईश्वराहून जीवाला निराळा कल्पिला कीं, तत्त्वांची संख्या सव्वीस होते. ९३ अनादि अविद्याच जीवाच्या भिन्नत्वाचें कारण आहे. त्यास देहाभिमान चिकटल्यामुळें त्याचें कर्मबंधन दृढ झालें. ९४ 'मी कर्ता' या अहंकारामुळें त्याच्या अंगाला पुण्य-पाप चिकटतें आणि विषयासक्ति वाढल्यामुळें तो स्वस्वरूपालाहि विसरतो. ९५ त्याच्या मागें बद्धतेचें बंधन लागलें, त्यामुळें कर्मरूप पाश तोडतां येईनासा झाला. त्या जीवाच्या उद्धरासाठीं ज्ञान देणाऱ्या सर्वज्ञ ईश्वराची गरज लागते. ९६ 'परंतु सद्‌गुरूपासून ज्ञानप्राप्ति होते. मग ईश्वराची काय आवश्यकता !' असें जर म्हणशील, तर ईश्वराच्या कृपेवांचून सद्‌गुरु भेटत नसतो, ९७ सद्‌गुरूची प्राप्ति जरी झाली तरी ईश्वराच्या कृपेवांचून भक्ति घडत नाहीं. सद्‌गुरूच ईश्वराची मूर्ति आहे, हें वेद-शास्त्रांनाहि संमत आहे. ९८ गुरु व ईश्वर यांना भिन्न समजणारा पूर्णपणें नागवलाच म्हणून समजावें. त्याप्रमाणें ईश्वराच्या अनुग्रहानेंच जीव ज्ञानसंपन्न होतो. ९९ उद्धवा ! गुरूनें सांगितलेला ज्ञानाचा प्रकार ईश्वराच्या कृपेवांचून साधकाच्या मनांत ठसत नाहीं हें खात्रीनें जाण. १०० जीव नियमानें बद्ध झालेला आणि ईश्वर त्याचें नियमन करणारा आहे. जीव अज्ञ, ईश्वर ज्ञान देणारा; जीव मर्यादित, ईश्वर सर्वव्यापी; १ जीव हीन, दीन, किंचिज्ज्ञ; ईश्वर समर्थ, सर्व जाणणारा; जीवाला दृढ कर्मबंधन आहे. ईश्वर कर्मरहित आहे २ अशा प्रकारें ईश्वराच्या कृपेनें जीवाला ज्ञान प्राप्त होतें म्हणून जीव ईश्वराहून भिन्न आहे. ३ 'कर्माचरणानें ज्ञान होतें.' असें जर तूं म्हणशील, तर कर्माला जडत्व असल्यामुळें तसें घडणें केव्हांहि शक्य नाहीं. ४ कर्माला जडत्व असल्यामुळें तें अज्ञानानें बद्ध करितें. कर्माला बद्धत्व आहे हें सज्ञान लोक जाणतात. ५ कर्म स्वभावतः जड म्ह० अचेतन आहे. त्याला चेतविणारा ईश्वर आहे. तें जर ईश्वरार्पण केलें नाहीं, तर ज्ञान कोण देणार ! ६ कर्म जड असल्यामुळें त्याला सत्ता नाहीं. म्हणून कर्मक्रियेला जाणणारा ईश्वर होय. ईश्वरच कर्माचें फल देणारा व कर्माला चेतना देणारा आहे. ७ जीवाला ज्ञानानें मोक्ष देणारा किंवा स्वर्गफल देणारा ईश्वरच आहे. किंवा या लोकीं त्याला वागविणाराहि

अथवा इहलोकीं वर्तविता । जीवासी तत्त्वतां ईश्वरू ॥ ८ ॥ यापरी अवश्य जाण । जीव ईश्वर करितां भिन्न । तत्त्वें सव्वीस संपूर्ण । बोलिले ब्राह्मण या हेतु ॥ ९ ॥ पंचवीस तत्त्वांची कथा । ते जीवेश्वरांची ऐक्यता । तेही सांगेन मी आतां । त्यांच्या मता संमत ॥ ११० ॥

पुरुषेश्वरयोरत्र न वैलक्षण्यमण्वपि । तदन्यकल्पनाऽपार्था ज्ञानं च प्रकृतेर्गुणः ॥ ११ ॥

जीवेश्वरांची ऐक्यता । सहजचि असे स्वभावतां । तेथ अणुमात्र भेदवार्ता । न रिगे सर्वथा निश्चित ॥ ११ ॥ स्वभावें पाहतां दर्पण । एकाचें देखिजे दुजेपण । परी द्विधा नव्हेचि आपण । यापरी जाण जीवशिव ॥ १२ ॥ अज्ञानप्रतिबिंबित जीव । त्याचा द्रष्टा तो सदाशिव । तरी ऐक्यतेचें जें वैभव । तो निजस्वभाव मोडेना ॥ १३ ॥ जेवीं दर्पणामाजीं आपण । तेवीं जीवरूपें शिवूचि जाण । दोनी चेतनत्वें समान । तेंही लक्षण अवधारीं ॥ १४ ॥ जैशी चेष्टा कीजे आपण । तेचि प्रतिबिंबीं दिसे जाण । तेवीं ईश्वरसत्ता सचेतन । गमनागमन जीवासी ॥ १५ ॥ जेणें स्वरूपें असे आपण । तद्रूप प्रतिबिंबीं दिसे जाण । तेवीं ईश्वरत्व संपूर्ण । असे अविच्छिन्न जीवामाजीं ॥ १६ ॥ जैसा अग्नि राखां झांकोळिला । तरी अग्निपणें असे संचला । तेवीं शिवासी जीवभावो आला । परी नाहीं मुकला निजत्वा ॥ १७ ॥ ॥ आशंका ॥ हो कां जीव शिव दोनी एक । तरी एक मलिन एक चोख । सदोख आणि निर्दोख । हे विशेख कां दिसती ॥ १८ ॥ थिल्लरीं प्रतिबिंबला सविता । त्या प्रतिबिंबाअंगीं सर्वथा । थिल्लरींचे मळ

ईश्वरच आहे. ८ अशा रीतीनें जीव आणि ईश्वर यांना अवश्य भिन्न करावें लागतें. याच कारणानें ब्राह्मण सव्वीस तत्त्वें सांगतात. ९ पंचवीस तत्त्वांची कथा म्हणजे जीव आणि ईश्वर यांचें ऐक्य, तेंहि त्यांना संमत असलेलें मत तुला सांगतों. ऐक. ११०.

—तर मग पंचवीस तत्त्वें मानणारांचा पक्ष कसा ! उत्तर—

अत्र पुरुषेश्वरयोः वैलक्षण्यं अणु अपि न—येथें पुरुष व ईश्वर यांच्यामध्यें वैलक्षण्य यत्किंचित्‌हि नाहीं. कारण त्या दोघांनाहि चिद्रूपत्व आहे. म्हणून, तदन्यकल्पना अपार्था—पुरुष व ईश्वर यांच्या अत्यंत भेदाची कल्पना करणें व्यर्थ आहे, असा हा पंचविंशतितत्त्वपक्ष प्रवृत्त झाला आहे (' अहोपण, असें जरी मानिलें तरी ईश्वरप्रसादानें प्राप्त होणारें ज्ञान यांहून निराळेंच असल्यामुळें हे दोन्ही पक्ष संभवत नाहींत. ' अशी आशंका घेऊन सांगतात—) ज्ञानं च प्रकृतेः गुणः—ज्ञान हा प्रकृतीचा गुण आहे. [ज्ञानाला सत्वगुणवृत्तित्व असल्यामुळें त्याचा प्रकृतींत अंतर्भाव होतो, असा याचा भावार्थ.] ११.

जीव आणि ईश्वर यांचें ऐक्य स्वभावतःच आहे. त्यांत यत्किंचित्‌हि भेद मानण्याचें कारण नाहीं, हें केव्हांहि निश्चितच आहे. ११ सहज आरशांत पाहिलें असतां एका व्यक्तीचीं दोन रूपें भासतात; पण वास्तविक कांहीं दोन व्यक्ति नसतात. त्याचप्रमाणें हे जीव आणि शिव आहेत. १२ अविद्येंत प्रतिबिंबित झालेला तो जीव आणि त्याचा साक्षी तो सदाशिव. याप्रमाणें ते दोन जरी भासले, तरी त्यांचें स्वाभाविक ऐक्य मोडत नाहीं व त्यांचा मूळ स्वभाव पालटत नाहीं. १३ आरशांत जसें पहाणाराचेंच प्रतिबिंब दिसत असतें, त्याप्रमाणें जीव-रूपानें शिवच असतो. दोहोंतील चैतन्य सारखेंच असतें. त्याचेंहि लक्षण सांगतों ऐक. १४ आपण जशी हालचाल करावी, तसें प्रतिबिंब दिसत असतें. त्याप्रमाणें ईश्वरसत्ताहि जीवाच्या जाण्या-येण्याला कारण होत असते. १५ आपलें जसें स्वरूप असतें, तसें प्रतिबिंबांत दिसतें. त्याप्रमाणें जीवामध्यें पूर्णपणें ईश्वरत्व असतें. १६ अग्नि जरी राखेनें झांकून ठेविला, तरी आंत त्याची उष्णता जशी कायम असते, त्याप्रमाणें शिव जरी जिवत्वाला प्राप्त झाला तरी तो आपल्या मूळ स्वरूपाला मुकत नाहीं. १७ (आशंका-) जीव आणि शिव हे दोन्ही जर एकच आहेत, तर मग एक मलिन, एक शुद्ध; एक सदोष, एक निर्दोष हे भेद त्यांत कां दिसतात ? १८ (उत्तर-) एखाद्या डबक्यांत पड-

पाहतां। दिसती तत्त्वतां लागलेसे ॥ १९ ॥ तेचि निर्वाळूनि पाहतां वेगीं। बिंबप्रतिबिंबनियोगीं। सर्वथा मळ न लगे अंगीं। उभयभागीं विशुद्ध ॥ १२० ॥ आरशाअंगीं टिकले मळ। सुबद्ध बैसले बहुकाळ। ते प्रतिबिंबाअंगीं केवळ। दिसती प्रबळ जडलेसे ॥ २१ ॥ तो मळ जैं पडे फेडावा। तैं आरिसा साहणे तोडावा। परी बिंब प्रतिबिंब केव्हां। साहणे धरावा हें बोलूं न ये ॥ २२ ॥ तेवीं सदोष आणि निर्दोष। केवळ अविद्याचि हे देख। जीव शिव उभयतां चोख। नित्य निर्दोष निजरूपें ॥ २३ ॥ पाहतां शुद्धत्वें स्फटिक जैसा। जे रंगीं ठवावा दिसे त्या ऐसा। स्वयें अलिप्त जैसातैसा। जीव स्वभाववशा तैसाची ॥ २४ ॥ जीव स्वयें चित्स्वरूप। जे गुणीं मिळे दिसे तद्रूप। परी गुणदोष पुण्यपाप। जीवासी अल्प लागेना ॥ २५ ॥ प्रत्यक्ष प्रतिबिंबीं मिथ्यता। दिसे निजबिंबाचिया सत्ता। तेवीं जीवशिवांसी अभिन्नता। जाण तत्त्वतां निश्चित ॥ २६ ॥ जीवशिवांचें एकपण तेणें सव्विसांमाजीं जाण। एक तत्त्व होतां न्यून। शेष तेचि पूर्ण पंचवीस ॥ २७ ॥ ॥ आशंका ॥ जीवशिवांचें एकपण। ऐसें जें जाणणें तें ज्ञान। तें एक तत्त्व येथें आन। त्यांमाजीं जाण उपजलें ॥ २८ ॥ तें ज्ञानतत्त्व अंगीकारितां। पंचवीस सव्वीस तत्त्वकथा। दोनीं मतें होती वृथा। ऐसें सर्वथा न म्हणावें ॥ २९ ॥ येथ मूळींचें निरूपण। श्लोकाचे अंतींचा चरण। ज्ञान तें प्रकृतीचा गुण। त्यासी वेगळेपण असेना ॥ १३० ॥ गुणकर्मांच्या खटपटा। प्रपंच अज्ञानें अतिलाठा। ज्ञान अज्ञानाचा सत्ववांटा। जेवीं काटेनि कांटा काडिजे ॥ ३१ ॥ शोधित जो सत्वगुण। त्या नांव बोलिजे मुख्य ज्ञान। तेंही गुणांमाजी पडे जाण। वेगळेंपण नव्हेचि तत्त्व ॥ ३२ ॥ ज्ञान स्वतंत्र तत्त्व होतें। तरी नासती दोनी मतें। तें पडे गुणाआंतौतें। यालागीं दोनी मतें निर्दुष्ट ॥ ३३ ॥ तेचि त्रिगुणांची व्यवस्था। तुज मी सांगेन आतां। ऐक उद्धवा तत्त्वतां। गुण सवर्था आविद्यक ॥ ३४ ॥

लेल्या सूर्याच्या प्रतिबिंबाकडे पाहिलें असतां त्या डबक्यांतील सगळी घाण त्या प्रतिबिंबाला लागलेली दिसते. १९. परंतु तेंच नीट विचारपूर्वक पाहिलें तर सूर्य किंवा प्रतिबिंब हीं दोन्ही मलापासून अलिप्त असून निर्मलच दिसतात; १२० आरशावर पुष्कळ दिवसांची धूळ बसलेली असली किंवा कीट चढलेला असला तर तो मालिनतेचा दोष प्रतिबिंबांत दिसूं लागतो. २१ ती मलिनता घालविण्यासाठीं आरशावरील धूळ झाडली पाहिजे. किंवा आरसा साहणेवर घांसून त्याचा कीट घालविला पाहिजे. प्रतिबिंब झाडून किंवा सहाणेवर घांसून स्वच्छ करितां येत नाहीं. २२ त्याप्रमाणें सदोष व निर्दोष हीं अविद्याच आहे. जीव आणि शिव हे दोन्ही वास्तविक आत्मस्वरूपानें निर्दोषच आहेत. २३ स्फटिक पाहिला तर स्वच्छच असतो. पण तो ज्या रंगावर ठेवावा त्या रंगाचा दिसतो; तरी तो स्वतः त्या रंगापासून जसा अलिप्त असतो, तसा जीव स्वभावतःच अलिप्त आहे. २४ जीव स्वभावतः चैतन्यस्वरूपच आहे; पण तो तीन गुणांच्या संगतीनें तद्रूप दिसतो. तरीहि गुण-दोष, पुण्य-पाप जीवाला मुळींच बाधत नाहींत. २५ मूळ बिंबाच्या सामर्थ्यानेंच प्रतिबिंबाचें मिथ्यात्व प्रत्यक्ष दिसूं लागतें; त्याचप्रमाणें जीव-शिवाचें ऐक्य आहे, असें निश्चित जाणावें. २६ याप्रमाणें जीव-शिवांचें ऐक्य मानिलें असतां सव्वीस तत्त्वांतील एक तत्त्व कमी होऊन पंचवीसच उरतात. २७ (आशंका) तर मग 'जीवा-शिवांचें ऐक्य आहे,' असें जाणणें हें एक ज्ञानच आहे. तेव्हां हें नवीनच आणखी एक तत्त्व उत्पन्न झालें. २८ हें ज्ञानतत्त्व स्वीकारिल्यास पंचवीस व सव्वीस तत्त्वें आहेत, हें म्हणणें व्यर्थ ठरतें. (उत्तर—) अशी शंका घेऊं नये. २९ कारण मूळ श्लोकाच्या शेवटच्या चरणांत 'ज्ञान-प्रकृतीचा गुण आहे, त्याला भिन्नत्व नाहीं' असें निरूपण केलें आहे. १३० गुण-कर्मांच्या खटपटीमुळें प्रपंच अज्ञानानें फार वाढला आहे. ज्ञान हा अज्ञानांतील सत्त्वगुणाचा भाग आहे. यास्तव कांट्यानें कांटा जसा काढावा, तसें ज्ञानानें अज्ञान घालवावें. ३१ शुद्ध सत्त्वगुणालाच मुख्य ज्ञान असें म्हणतात, पण त्याचाहि गुणांतच समावेश होतो म्हणून तें निराळें तत्त्व नाहीं. ३२ ज्ञान जर स्वतंत्र तत्त्व ठरतें, तर दोन्हीं मतें व्यर्थ म्हणतां आलीं असतीं; पण तें ज्ञान गुणांतच अंतर्भूत होत असल्यामुळें तीं दोन्हीं मतें निर्दोषच ठरतात. ३३ उद्धवा! हे गुण सर्वथा अविद्यात्मकच आहेत. मी तुला त्यांची व्यवस्था सांगतों, ती ऐक. १३४.

प्रकृतिर्गुणसाम्यं वै प्रकृतेर्नात्मनो गुणाः । सत्त्वं रजस्तम इति स्थित्युत्पत्त्यन्तहेतवः ॥ १२ ॥

उत्पतिस्थितिनिर्दळण । हें त्रिगुणांचें कार्य पूर्ण । गुणसाम्य ते प्रकृति जाण । आत्मा निर्गुण गुणातीत ॥ ३५ ॥ म्हणशी परमात्मा गुणातीत । परी जीवात्मा गुणग्रस्त । हेही गा मिथ्या मात । ऐक वृत्तांत सांगेन ॥ ३६ ॥ चंद्र निश्चळ निजस्वभावें । तो चाले त्या अभ्रासवें । दिसे जेवीं सवेग धांवे । तेवीं गुणस्वभावें जीवात्मा ॥ ३७ ॥ घटामाजीं उदक भरितां । घटाकाश भिजेना सर्वथा । तेवीं जीवात्मा गुणीं वर्ततां । अलिप्तता गुणकर्मीं ॥ ३८ ॥ जीव अहंकर्तेपणीं विख्यात । तो केवीं म्हणावा कर्मातीत । येचि अर्थीं कृष्णनाथ । विशदार्थ सांगत ॥ ३९ ॥

सत्त्वं ज्ञानं रजः कर्म तमोऽज्ञानमिहोच्यते । गुणव्यतिकरः कालः स्वभावः सूत्रमेव च ॥ १३ ॥

सत्वगुणास्तव ज्ञान । रजोगुण कर्मजाण । मोह आलस्ययुक्त गहन । तमीं अज्ञान नांदत ॥ १४० ॥ सत्वादि जे तिन्ही गुण । केवळ प्रकृतीचे हे जाण । यांसी स्वतंत्रपण । नव्हेचि जाण या हेतू ॥ ४१ ॥

—'अहोपण, ज्ञान हा जीवाचा धर्म आहे; त्याला प्रकृतीचा गुण कसा म्हणतां ? ' उत्तर—

गुणसाम्यं वै प्रकृतिः—गुणांची साम्यावस्था हीच प्रकृति आहे, **सत्त्वं रजः तमः इति स्थित्युत्पत्त्यन्तहेतवः गुणाः प्रकृतेः**—सत्त्व-रज तम हे उत्पत्ति, स्थिति व लय यांस कारण होणारे गुण प्रकृतिविशेषरूप असल्यामुळें प्रकृतीचे आहेत. **न आत्मनः**—आत्म्याचे म्ह० जीवाचें नाहींत. जीवाला अकर्तृत्व असल्यामुळें स्थित्यादिहेतुभूत गुणाश्रयत्व संभवते. १२.

उत्पात्ति-स्थिति-लय हें त्रिगुणांचें कार्य आहे. तीन गुणांची साम्यावस्था हीच प्रकृति होय; आणि आत्मा निर्गुण गुणातीत आहे. ३५ यावर तूं कदाचित् असें म्हणशील कीं, परमात्मा गुणातीत आहे, पण जीवात्मा गुणांनीं युक्त आहे, तर ही गोष्टहि खोटी आहे. त्याचा वृत्तांत सांगतों, ऐक. ३६ चंद्र वास्तविक स्थिर असतो, पण मेघ चालूं लागले कीं, चंद्रच पळत आहेसें भासतें; त्याप्रमाणें ज्ञान हा प्रकृतीचा गुण असून, आपण तो जीवाचा समजतों. ३७ घटांत जल भरलें असतां त्यानें घटाकाश जसें भिजत नाहीं, त्याप्रमाणें जीवात्मा गुणांत वागत असतांहि तो गुण-कर्मांपासून अलिप्त असतो. ३८ पण जीव 'मी कर्ता' या अहंकारानें युक्त असल्याची जर प्रसिद्धि आहे, तर मग त्याला कर्मांपासून अलिप्त कसें म्हणावें ! हेंच श्रीकृष्णनाथ स्पष्ट करून सांगत आहे. १३९.

सत्त्वं ज्ञानं—ज्ञान हा सत्त्वगुणाचा परिणाम आहे. (म्हणूनच तो प्रकृतीचा गुण आहे, असा अकराव्या श्लोकांतील 'प्रकृतेः गुणः' या पदाशीं अन्वय. 'अहोपण, त्यापासून होणारें कर्म व अज्ञान हीं निराळीं तत्त्वें असतील ! ' उत्तर—नाहीं.) **रजः कर्म तमः इह अज्ञानं उच्यते**—कर्म ही रजोगुणाची वृत्ति आहे व अज्ञान ही तमोगुणाची वृत्ति आहे, असें येथें सांगितलें जातें. [त्यामुळें कर्म व अज्ञान याचा रजोगुण व तमोगुण यांच्या द्वारां प्रकृतीमध्येंच अंतर्भाव होतो, असा याचा भावार्थ. ' तथापि काल व स्वभाव हीं आणखीं निराळीं तत्त्वें आहेत, ' अशी आशंका घेऊन सांगतात—] **गुणव्यतिकरः कालः स्वभावः सूत्रं एव च**—गुणांचा व्यतिकर म्ह० परस्पर मिश्रण किंवा क्षोभ ज्यामुळें होतो तो ईश्वरच काल आहे. स्वभाव म्ह० सूत्रच महत्तत्त्व आहे. कारण त्याला सर्वशक्तिमत्त्व आहे. [याप्रमाणें ज्ञानादिकांचा यथासंभव पूर्वोक्त तत्त्वांत अंतर्भाव होत असल्यामुळें दोन्ही पक्षीं तत्त्वांची वृद्धि होत नाहीं, इतर पक्षांमध्येंहि असेंच जाणावें. आतां पक्षांतराला उत्थापित करितात-ते गुण कोणते, त्यांचें प्रयोजन काय, त्यांचें स्वरूप काय, हें सर्व दाखविणारे भगवान् अर्थात् अठ्ठावीस तत्त्वें हें स्वमत आहे, असें प्रतिपादन करणाऱ्या पहिल्याच श्लोकांतील 'त्रीणि' या पदाचें व्याख्यान बाराव्या श्लोकाच्या 'सत्त्वं रजस्तम इति०' या उत्तरार्धांत करितात. दुसऱ्या मतीं, काल, सूत्र, पुरुष असे तीन पदार्थ आहेत. पण स्वमतामध्यें गुणांना आगमापायित्व असल्यामुळें त्यांचा प्रकृतीहून भेद विवक्षित आहे. यास्तव गुण हीं तीन तत्त्वें व पूर्वोक्त पक्षद्वयसाधारण पंचवीस तत्त्वें मिळून एकंदर अठ्ठावीस तत्त्वें आहेत, असें हें भगवानांचें मत आहे.] १३.

सत्त्वगुणानें ज्ञान होतें, रजोगुणानें कर्म वाढतें व तमोगुणानें आलस्ययुक्त मोह आणि गाढ अज्ञान पसरतें. १४० सत्त्वादि तीन्ही गुण केवळ प्रकृतीचे आहेत. त्यामुळें त्यांना स्वतंत्रता नाहीं. ४१ गुणांना क्षोभविणारा काळ आहे;

गुणक्षोभक काळ देख। तो पुरुषाचा अवलोक। पुरुष काळ हा नामविशेख। स्वरूपें एक हे दोन्ही ॥ ४२ ॥ स्वाभाविक मायेचें स्फुरण। प्रथम कार्य जें निर्माण। त्या नांव महत्तत्त्व जाण। सूत्र प्रधान ज्यासी म्हणती ॥ ४३ ॥ यालागीं प्रकृतीहूनि भिन्न। यासी न ये वेगळेपण। हे प्रकृति कार्यकारणीं अभिन्न। तत्त्वविचक्षण मानिती ॥ ४४ ॥ अठ्ठावीस तत्त्वें पूर्वोक्त। हें भगवंताचें निज मत। तेंचि अडीच श्लोकीं सांगत। संख्यातत्त्वार्थ निजबोधें ॥ ४५ ॥

पुरुषः प्रकृतिर्व्यक्तमहङ्कारो नभोऽनिलः। ज्योतिरापः क्षितिरिति तत्त्वान्युक्तानि मे नव ॥ १४ ॥

प्रकृति पुरुष महत्तत्त्व। महाभूतें अहंभाव। अठ्ठाविसांत हीं तत्त्वें नव। इतर वैभव तें ऐक ॥ ४६ ॥

श्रोत्रं त्वग्दर्शनं घ्राणो जिह्वेति ज्ञानशक्तयः। वाक्पाण्युपस्थपाय्वङ्घ्रिः कर्माण्यङ्गोभयं मनः ॥ १५ ॥

मुख्य ज्ञानेंद्रियें पांच जाण। पांच कर्मेंद्रियें आन। कर्मेंद्रियें ज्ञानेंद्रियांअधीन। स्वतां गमन त्यां नाहीं ॥ ४७ ॥ आंधळें पायीं चालों जाणे। पांगुळ केवळ देखणें। अंधें पंगु खांदीं घेणें। परी बोलें वर्तणें देखण्याचेनि ॥ ४८ ॥ तेवीं ज्ञानेंद्रियां कर्मेंद्रियांसी। संगती घडली असे तैशी। यालागीं मुख्यत्वें ज्ञानेंद्रियांसी। हृषीकेशी बोलिला ॥ ४९ ॥ उभय इंद्रियां चाळक। तेणें मनचि गा एकलें एक। येणेंचि अकरा इंद्रियें देख। यदुनायक सांगत ॥ १५० ॥ इंद्रियविषय निरूपण। स्वयें सांगताहे नारायण। मुख्य विषय पांच जाण। तयांचें साधन गत्यादिक ॥ ५१ ॥

पुरुषाचें ईक्षण म्ह० पहाणें हाच काळ. पुरुष आणि काळ हीं दोन नांवें तेवढीं भिन्न आहेत. स्वरूपतः ते दोन्ही एकच आहेत. ४२ मायेचें जें स्वभाविक स्फुरण तेंच तिचें पहिलें कार्य निर्माण होतें तेंच महत्तत्त्व होय. त्यालाच सूत्र-प्रधान म्हणतात.४३ म्हणून यांस प्रकृतीहून भिन्नपण नाहीं. ही प्रकृति कार्य-कारणाहून भिन्न नाहीं असें तत्त्ववेत्ते मानितात. ४४ पूर्वी सांगितल्याप्रमाणें एकंदर अठ्ठावीस तत्त्वें आहेत, हें जें भगवंताचें मत त्याचेंच पुढील अडीच श्लोकांत प्रतिपादन करितात. १४५.

—आतां त्यांतील नऊ तत्त्वें कोणतीं तीं सांगतात—

पुरुषः० ......क्षितिः इति मे नव तत्त्वानि उक्तानि—चेतन-पुरुष, जड प्रकृति, व्यक्त महत्तत्त्व, अहंकार, आकाश, वायु, तेज, जल, व पृथ्वी अशीं नऊ तत्त्वें मीं सांगितलीं आहेत. १४.

प्रकृति, पुरुष, महत्तत्त्व, पंचमहाभूतें, अहंकार, हीं अठ्ठाविसांतील नऊ तत्त्वें आहेत. आतां इतर तत्त्वांचें महात्म्य ऐक. १४६.

—आतां अकरा तत्त्वें कोणतीं तीं सांगतात—

श्रोत्रं......जिव्हा इति ज्ञानशक्तयः—श्रोत्र, त्वक्, चक्षु, रसन, घ्राण, अशीं हीं ज्ञानेंद्रियें आहेत. वाक०...... अङ्घ्रिः कर्माणि—वाक, हस्त, उपस्थ, पायु, पाद हीं पांच कर्मेंद्रियें आहेत. उभयं मनः—आणि या दोन्ही इंद्रियांना साधारण असें मन आहे. अंग—हे उद्धवा ! (अशीं हीं अकरा तत्त्वें आहेत.) १५.

मुख्य ज्ञानेंद्रियें पांच आहेत. दुसरीं पांच कर्मेंद्रियें आहेत. कर्मेंद्रियें ज्ञानेंद्रियांच्या अधीन आहेत. त्यांना स्वतःचें चलन नाहीं. ४७ आंधळा मनुष्य पायांनीं चालावयाचें जाणतो, पांगळा केवळ पाहूं शकतो, पण आंधळ्यानें पांगळ्याला खांद्यावर घेतलें तरी त्याला पांगळा दाखवील त्या खुणेनेंच चालावें लागतें. ४८ त्याप्रमाणें ज्ञानेंद्रियें आणि कर्मेंद्रियें यांची संगती घडली आहे. म्हणून भगवानानें ज्ञानेंद्रियांना मुख्यत्त्व दिलें आहे. ४९ ज्ञानेंद्रियें आणि कर्मेंद्रियें या दोहोंना प्रेरणा करणारें एक मनच आहे. अशाप्रकारें मनासह अकरा इंद्रियें श्रीकृष्णानें सांगितलीं. १५० आतां नारायण स्वतः इंद्रियविषयांचें निरूपण करीत आहे. त्यांत मुख्य पांच विषय असून गति इत्यादि त्यांचीं साधनें आहेत. १५१.

शब्दः स्पर्शो रसो गन्धो रूपं चेत्यर्थजातयः । गत्युक्त्युत्सर्गशिल्पानि कर्मायतनसिद्धयः ॥ १६ ॥

रसस्पर्शादि लक्षण । पांचही विषय ते जाण । गत्यादि क्रियाचरण । तें जाण साधन या विषयांचें ॥ ५२ ॥ दृष्टि रूपातें प्रकाशी । चरण धांवती तयापाशीं । हस्त उद्यत घ्यावयासी । रस स्पर्शसिद्धीसी विषयांचें ॥ ५३ ॥ एवं उभय इंद्रियीं जाण । विषय पांचचि प्रमाण । नव्हे अधिक तत्त्वतां गणन । स्वयें श्रीकृष्ण सांगत ॥ ५४ ॥ नव एकादश तत्त्वलक्षण । मागां दों श्लोकीं केलें निरूपण । येणें श्लोकें परम प्रमाण । विषय जाण पांचचि ॥ ५५ ॥ केवळ ज्ञानेंद्रियीं भोगू नव्हे । कर्मेंद्रियांही भोग न पावे । उभयसंयोगें भोग पावे । परी विषय आघवे पांचचि ॥ ५६ ॥ इहीं पांच विषयीं आपण । व्यापिलें चतुर्दश भुवन । सुरासुर भुलविले जाण । यांचें गोडपण मारक ॥ ५७ ॥ जेवीं कां मैंद गोडपणें । संगती लागोनि जीव घेणें । तेवीं विषयसंगाचें साजणें । बांधोनि नेणें नरकासी ॥ ५८ ॥ नरकीं निरय भोगिती । तेथही न सोडी विषयासक्ती । विषयाऐसा विश्वासघाती । आन त्रिजगतीं असेना ॥ ५९ ॥ ते हे पंच विषय प्रमाण । पांचचि परी अतिदारुण । ब्रह्मादिक इहीं नाडले जाण । इतरांचा कोण पडिपाडू ॥ १६० ॥ विषयांचें जें गोडपण । तें विषाहूनि दारुण । विष एकदा आणी मरण । पुनः-पुनः मरण विषयांचेनी ॥ ६१ ॥ पुढती जन्म पुढती मरण । हें विषयांस्तव घडे जाण । संसाराचें सबळपण । विषयाधीन उद्धवा ॥ ६२ ॥ जेथ विषयांचा विषयत्यागू । तेथें उन्मळे भवरोगू । आंदणा मी श्रीरंगू । त्यासी विषयभोगू नावडे ॥ ६३ ॥ ते हे पंचविषय गा जाण । तुज म्यां केलें निरूपण । आतां त्रिगु-

---

—पांच तत्त्वें दाखवितात—

शब्द०...रूपं च इति अर्थजातयः—शब्द, स्पर्श, रस, गंध व रूप, हीं विषयत्वानें परिणत झालेलीं पंचभूतें हेंच पंच विषय आहेत. ['अहोपण, गत्यादिकांच्या योगानें तिन्ही पक्षीं तत्त्वांचें आधिक्य संभवतें.' याचें 'नाहीं' असें उत्तर देतात—] गत्युक्त्युत्सर्गशिल्पानि कर्मायतनसिद्धयः—गमन, भाषण, दोन प्रकारचा त्याग, शिल्प हीं कर्मेंदियांचीं फलें आहेत. निराळीं तत्त्वें नाहींत. १६.

रस-रूप-शब्द-गंध-स्पर्श असे पांच विषय आहेत; आणि जाणें, येणें इत्यादि क्रिया आहेत. त्या या विषयांचें साधन आहेत. ५२ दृष्टीनें रूप दाखविलें म्हणजे चरण त्या विषयांपाशीं धांवतात. रस, स्पर्श इत्यादिकांचें ज्ञान व्हावें, म्हणून हात विषयांचें ग्रहण करण्यास तयार होतात; ५३ याप्रमाणें ज्ञान व कर्म या दोन्हीं प्रकारच्या इंद्रियांचे पांचच प्रमाणभूत विषय आहेत; त्यापेक्षां त्यांची संख्या जास्त नाहीं, असें श्रीकृष्ण स्वतः सांगत आहे. ५४ नऊ आणि अकरा तत्त्वांचीं लक्षणें गेल्या दोन श्लोकांत सांगितलीं आहेत. त्या श्लोकांवरून पांचच विषय खरे ठरतात. ५५. कारण केवळ ज्ञानेंद्रियांनीं भोग मिळत नाहीं. केवल कर्मेंद्रियांनींहि भोग घेतां येत नाहीं. या दोहोंचा जेव्हां संयोग होतो, तेव्हांच विषयांचा भोग घेतां येतो. यावरून विषय पांचच आहेत. ५६ पण या पांचच विषयांनीं सगळीं चवदा भुवनें व्यापून टाकिलीं आहेत, त्यांची चटक इतकी घातुक आहे कीं, ती सुर-असुरांनाहि भुरळ पाडिते. ५७ एखादा ठग जसा गोड बोलून सोबतीला येतो व जीव घेतो त्याप्रमाणें हा विषय-संग जीवाला बांधून नरकांत टाकितो. ५८ जीव नरकामध्यें भयंकर यातना भोगीत असले तरी तेथेंहि ते विषया-सक्ति सोडीत नाहींत. विषयांसारखा विश्वासघातकी त्रिभुवनांत दुसरा कोणीहि सांपडत नाहीं. ५९ ते हे पांच विषय प्रमाण आहेत, ते पांचच आहेत, तरी मोठे भयंकर आहेत. त्यांनीं ब्रह्मदेवादिकांसहि जर नाडिलें आहे, तर इतरांचा काय पाड ! १६० विषयांचें सेवन विषाच्या सेवनाहूनहि घातक आहे. विषानें एकदांच मरण येतें; पण हे विषय पुनः पुनः जन्म-मरण भोगावयास लावितात. ६१ उद्धवा ! पुनः जन्म पुनः मरण हें विषयांमुळें घडतें. विषयांमुळें संसार प्रबल होतो. ६२ जेव्हां विषयांचा त्याग होतो तेव्हां संसाररूपी रोगाचा समूळ नाश होतो. ज्याला विषय-भोग आवडत नाहींत, त्यांचा मी श्रीहरि आंदण दिलेला दास होतों. ६३ त्यां पांच विषयांचें मीं तुला सविस्तर

णांचें लक्षण । ऐक सावधान सांगतों ॥ ६४ ॥ उत्पत्तिस्थितिनिर्दळण । त्रिगुणांस्तव घडे जाण । यालागीं स्वयें श्रीकृष्ण । तीन्ही गुण अंगीकारी ॥ ६५ ॥ अंगीकारूनि तीन्ही गुण । अठ्ठावीस तत्त्वें केलीं पूर्ण । हें कृष्णसंमत लक्षण । उद्धवा जाण निश्चित ॥ ६६ ॥ त्रिगुणेंवीण प्रकृती । सृष्टिसर्जनीं नाहीं शक्ती । गुणद्वारा उत्पत्तिस्थिती । संहार अंतीं स्वकार्यें ॥ ६७ ॥ तेचि अर्थीचें निरूपण । स्वयें सांगताहे श्रीकृष्ण । कार्यकारणलक्षण । यथार्थ जाण विभाग ॥ ६८ ॥

सर्गादौ प्रकृतिर्ह्यस्य कार्यकारणरूपिणी । सत्त्वादिभिर्गुणैर्धत्ते पुरुषोऽव्यक्त ईक्षते ॥ १७ ॥

प्रकृतीपासाव विकारमेळा । त्रिगुणांचिया गुणलीळा । सात कारणें कार्यें सोळा । ऐक वेगळा विभाग ॥ ६९ ॥ मदहंकार महाभूतें । सातही कारणें निश्चितें । अकरा इंद्रियें विषययुक्तें । इयें जाणावीं येथें कार्यें सोळा ॥ १७० ॥ यापरी निजप्रकृती । रजोगुणातें धरोनि हातीं । कार्यकारणांचिया युक्ती । करी उत्पत्ति सृष्टीची ॥ ७१ ॥ स्रजिलिये सृष्टीसी जाण । सत्वगुणें करी पालन । तमोगुणें निर्दळण । प्रकृति आपण स्वयें करी ॥ ७२ ॥ पुरुषें न करितां ईक्षण । उत्पत्ति स्थिति निर्दळण । प्रकृतीचेनि नव्हे जाण । तेंही उपलक्षण अवधारीं ॥ ७३ ॥ हात पाय न लावितां जाण । केवळ कूर्मीचें अवलोकन । करी पिलियांचें पालन । तैसें ईक्षण पुरुषाचें ॥ ७४ ॥ कां सूर्याचिया निजकारणीं । जेवीं अग्नीतें स्रवे मणी । तेणें स्वधर्मकर्मं ब्राह्मणीं । कीजे यज्ञाचरणीं महायागू ॥ ७५ ॥ तैसें हें जाण चिन्ह । येणें होय कार्य कारण । चाले स्वधर्मआचरण । यापरी जाण उद्धवा ॥ ७६ ॥ ऐसें चालतां प्रकृतिपर । ब्राह्मण करिती स्वाचार । तेणें वृद्धि कर्माचार । परापर उद्धवा ॥ ७७ ॥ तेवीं पुरुषाचें

वर्णन करून सांगितलें. आतां तीन गुणांचें लक्षण सांगतों, तें सावधान चित्तानें ऐक. ६४ उत्पत्ति, स्थिति व लय या तीन गुणांमुळेंच होतात. म्हणून श्रीकृष्ण त्या तीन्ही गुणांचा स्वीकार करितो, ६५ उद्धवा ! या तीन गुणांचा स्वीकार करून अठ्ठावीस तत्त्वें पूर्ण केलीं. श्रीकृष्णाला संमत असलेलें असें हें लक्षण आहे, हें तूं निश्चित जाण. ६६ प्रकृतीमध्यें या त्रिगुणावांचून सृष्टि उत्पन्न करण्याचें सामर्थ्य नाहीं. गुणांमुळेंच उत्पत्ति व स्थिति होत असून शेवटीं त्यांनींच लय होतो. ६७ त्याच अर्थी कार्य-कारणविभागाचें यथार्थ निरूपण श्रीकृष्ण करीत आहे. १६८.

——याप्रमाणें तिन्हीं मतांत तत्त्वसंख्याभेद सांगून तिसऱ्या श्लोकांत उद्धवानें 'ऋषि कोणत्या आशयानें असा हा तत्त्वभेद सांगतात' असें जें विचारिलें होतें, त्यांचें आणखी एक निराळें तात्पर्य सांगतात——

कार्यकारणरूपिणी प्रकृतिः हि अस्य सर्गादौ सत्त्वादिभिः गुणैः धत्ते—सोळा विकार हीं कार्यें व महदादि सात कारणें एतद्रूप झालेली ही प्रकृतीच या जगाच्या उत्पत्तिसमयीं सत्त्वादि गुणांनीं उपादानकारणत्वामुळें उत्पाद्यवस्था धारण करिते. पुरुषः अव्यक्तः ईक्षते—पण अव्यक्त, परिणामी व निमित्तभूत असा पुरुष केवल पहातो . [तस्मात् परिणामीनी प्रकृतीहून पुरुष भिन्न आहे.] १७.

मायेपासून विकारांचा समूह, तीन गुणांच्या लीला, सात कारणें आणि सोळा कार्यें उत्पन्न होतात. त्यांचे भिन्न भिन्न विभाग सांगतों, ते ऐक. ६९ महत्तत्त्व, अहंकार आणि पंच महाभूतें हीं सात कारणें निश्चित आहेत; मनासह अकरा इंद्रियें आणि पांच विषय मिळून सोळा कार्यें झालीं. १७० याप्रमाणें मूळ प्रकृति रजोगुणाच्या साह्यानें कार्य-कारणरूपानें सृष्टीची उत्पत्ति करिते. ७१ सृष्टि उत्पन्न केल्यानंतर प्रकृति स्वतःच सत्त्वगुणानें तिचें पालन आणि तमोगुणानें संहार करिते ७२ परंतु पुरुषानें ईक्षण केलें नाहीं, तर प्रकृतीला उत्पत्ति-स्थिति लय करितां येणार नाहीं. त्याविषयींचा प्रकारहि ऐक. कांसवी हात-पाय न हालवितां केवळ पहाण्यानेंच आपल्या पिलांचें पोषण जसें करिते, त्याप्रमाणें पुरुष नुसत्या अवलोकनानें प्रकृतीला चैतन्य देतो. ७४ किंवा सूर्यकिरणाचा प्रकाश पडतांच सूर्यकांत मण्यांतून जसा अग्नि उत्पन्न होतो, आणि त्या अग्नीनें ब्राह्मण स्वधर्म-कर्म यज्ञ-याग करितात, ७५ त्याप्रमाणें हें चिन्ह आहे यानें कार्य-कारण होतें आणि स्वधर्माचरण चालतें. ७६ उद्धवा ! याप्रमाणें प्रकृतीच्या अधीन होऊन ब्राह्मण स्वधर्माचरण करितात व त्यामुळें उच्च नीच कर्मांची वृद्धि होते. ७७ याप्रमाणें प्रकृतीला पुरुषाच्या ईक्षणानें

ईक्षण । प्रकृति लाहोनि आपण । उत्पत्ति स्थिति निर्दळण । करावया पूर्ण सामर्थ्य पावे ॥ ७८ ॥ छायामंडपींचें विचित्र सैन्य । दिसावया दीपचि कारण । तेवीं प्रकृतिकार्यासी जाण । केवळ ईक्षण पुरुषाचें ॥ ७९ ॥ जगाचें आदिकारण । प्रकृति होय गा आपण । प्रकृति प्रकाशी पुरुष जाण । तो महाकारण या हेतू ॥ १८० ॥ प्रकृति व्यक्त पुरुष अव्यक्त । हे विकारी तो विकाररहित । हे गुणमयी गुणभरित । तो गुणातीत निजांगें ॥ ८१ ॥ प्रकृति स्वभावें चंचळ । पुरुष अव्ययत्वें अचळ । प्रकृति बद्धत्वें शबळ । पुरुष केवळ बंधातीत ॥ ८२ ॥ प्रकृति स्वभावें सदा शून्य । पुरुष केवळ चैतन्यघन । प्रकृतीस होय अवसान । पुरुष तो जाण अनंत ॥ ८३ ॥ प्रकृति केवळ निरानंद । यालागीं तेथ विषयच्छंद । पुरुष पूर्ण परमानन्द । विषयकंदच्छेदक ॥ ८४ ॥ प्रकृतिपुरुषांचें वेगळेपण । तुज म्यां सांगीतलें संपूर्ण । हेचि परमार्थाचि निजखूण । पुरुष तो भिन्न प्रकृतीसी ॥ ८५ ॥ तेंचि जाणावया विशद । नाना मतांचे मतवाद । त्या मतांचा मतप्रबोध । तुज मी शुद्ध सांगेन ॥ ८६ ॥

व्यक्तादयो विकुर्वाणा धातवः पुरुषेक्षया । लब्धवीर्याः सृजन्त्यण्डं संहताः प्रकृतेर्बलात् ॥ १८ ॥

पुरुषेक्षण झालिया प्राप्त । महदहंकारादि पदार्थ । प्रकृतिबळें समस्त । एकत्र होत ब्रह्मांड ॥ ८७ ॥ पुरुषावलोकें वीर्यप्राप्ती । लाहोनि ब्रह्मांडातें धरिती । यालागीं याते धातु म्हणती । जाण निश्चिती उद्धवा ॥ ८८ ॥ हें सामान्यता निरूपण । तुज म्या सांगीतलें आपण । ते नाना मतवादी जाण । विशेष लक्षण बोलती ॥ ८९ ॥

उत्पत्ति-स्थिति-लय करण्याचें सामर्थ्य येतें. ७८ पडद्यावर प्रकाशाच्या साह्यानें पडलेलीं छायाचित्रें दिव्यावांचून जशीं दिसत नाहींत, त्याप्रमाणें प्रकृतिकार्याला पुरुषाचें ईक्षण अवश्य आहे. ७९ प्रकृति जगाचें आदिकारण आहे. १८० प्रकृति व्यक्त आहे; पुरुष अव्यक्त आहे. प्रकृति विकारी; पुरुष अविकारी; ती गुणयुक्त; तो गुणरहित व स्वभावतःच गुणातीत आहे. ८१ प्रकृति स्वभावतःच चंचल आहे. पुरुष अव्यय असल्यामुळें अचल आहे; प्रकृति मायेच्या उपाधीमुळें बद्ध आणि पुरुष बंधातीत आहे; ८२ प्रकृतीचा स्वभाव नेहमीं शून्य आणि पुरुष केवल ज्ञानस्वरूप; प्रकृतीला अंत आहे पुरुष अंतरहित आहे; ८३ प्रकृति आनंदरहित असल्यामुळें तिला विषयांचा छंद आहे व पुरुष पूर्ण परमानंद असल्यामुळें तो विषयांचें निर्मूलन करणारा आहे; ८४ असें हें प्रकृतिपुरुषांचें. भिन्नत्व मीं तुला सविस्तर सांगितलें. पुरुष प्रकृतीहून भिन्न आहे, हीच परमार्थाची खरी खूण आहे. ८५ तेंच स्पष्टपणें जाणण्यासाठीं नाना प्रकारचीं अनेक मतें झालीं आहेत. त्या मतांचा शुद्ध प्रबोध मी तुला सांगतों. १८६.

—'तत्त्वांनीं आरंभिलेल्या कार्याचा तत्त्वांतच अंतर्भाव होतो' अशा अभिप्रायानें भगवान् सांगतात—

व्यक्तादयः धातवः विकुर्वाणाः पुरुषेक्षया लब्धवीर्याः संहताः प्रकृतेः बलात् अण्डं सृजन्ति—प्रकृतीपासून उत्पन्न झालेले जे महादादि धातु ते विकार पावत असतांना पुरुषाच्या ईक्षणानें समर्थ व परस्पर संहत होऊन प्रकृतीचा आश्रय करून ब्रह्माण्डाला उत्पन्न करितात. १८.

पुरुषानें ईक्षण केलें असतां प्रकृतीच्या सामर्थ्यानें (महत्-अहंकारादि सर्व) एकत्र होऊन ब्रह्माण्ड उत्पन्न होतें. ८७ पुरुषाच्या अवलोकनानेंच प्रकृतीला वीर्यप्राप्ति होऊन ती ब्रह्माण्डाला धारण करिते. म्हणूनच हे उद्धवा ! याला धातु असें म्हणतात. ८८ हें मीं सामान्यतः निरूपण करून सांगितलें. परंतु अनेक मतवादी विशेष लक्षणहि सांगतात. १८९.

सप्तैव धातव इति तत्रार्थाः पञ्च खादयः । ज्ञानमात्मोभयाधारस्ततो देहेन्द्रियासवः ॥ १९ ॥

पंचवीस सव्वीस तत्त्वगणन । मागां सांगीतलें निरूपण । आतां सातां तत्वांचें लक्षण । ऐक सुलक्षण सांगेन ॥ १९० ॥ महाभूतें जीव शिव । हा सातां तत्त्वांचा भाव । प्राणेंद्रियसमुदाव । यांचिपासाव पैं होत ॥ ९१ ॥ महाभूतें अचेतन । यांसी चेतविता जीव जाण । त्याचाही द्रष्टा परिपूर्ण । ईश्वर जाण सातवा ॥ ९२ ॥ माया महत्तत्त्व अहं जेथ । ये सूक्ष्मकारणें निश्चित । यांपासोनि स्थूल भूतें होत । कारणें कार्यांत सबाह्य ॥ ९३ ॥ मनइंद्रियादि जें कां येथें । तेंही यांत अंतर्भूतें । एवं जाण येणें मतें । पांच महाभूतें नेमिलीं ॥ ९४ ॥ यांसी चेतविता जीव । सर्वनियंता सदाशिव । एवं सप्ततत्त्व-समुदाव । तो हा उगव उद्धवा ॥ ९५ ॥ आतां सहा तत्त्वें ये पक्षीं जाण । तुज मी सांगेन निरूपण । जें बोलिले ऋषिजन । तें विवंचन अवधारीं ॥ ९६ ॥

षडित्यत्रापि भूतानि पञ्च षष्ठः परः पुमान् । तैर्युक्तमात्मसम्भूतैः सृष्ट्वेदं समुपाविशत् ॥ २० ॥
चत्वार्येवेति तत्रापि तेज आपोऽन्नमात्मनः । जातानि तैरिदं जातं जन्मावयविनः खलु ॥ २१ ॥

पाहें पां पंच महाभूतें । पुरुषें सृजिलिया येथें । स्वयें प्रवेशला तेथें । यालागीं त्यातें षष्ठ म्हणती ॥ ९७ ॥ ज्याचेनि मतें तत्त्वें चारी । तयांची ऐक नवलपरी । जो देखे प्रत्यक्षाकारीं । तोचि धरी तत्त्वार्थ ॥ ९८ ॥

—याप्रमाणें स्वमताचा उपसंहार करून इतर मतांतहि सांगितलेली प्रक्रिया विशेषतः तात्पर्यासह दाखवितात—

सप्त एव धातवः इति—सातच तत्त्वें आहेत, असें कोणी म्हणतात. **तत्र खादयः पञ्च अर्थाः**—त्यांतील आकाशादि पांच विषय, **ज्ञानं**—द्रष्टा जीव **उभयाधारः, आत्मा**—द्रष्टा व दृश्य या दोघांचा आधार आत्मा अशीं तीं सात तत्त्वें आहेत. [त्यांतील प्रकृतींचा कारणत्वानें आकाशादिकांत अंतर्भाव होतो. बाकीच्यांच्या अंतर्भावासाठीं भगवान् म्हणतात—] **ततः देहेंद्रियासवः**—त्या सात तत्त्वांपासून देह, इंद्रियें प्राण इत्यादि, सर्व कार्यें उत्पन्न होतात. १९.

पंचवीस आणि सव्वीस तत्त्वांच्या संख्येचें निरूपण मीं मागेंच केलें आहें. आतां सात तत्त्वांचें लक्षण सविस्तर सांगतों, तें ऐक. ९० पंचमहाभूतें, त्यांना चेतना देणारा जीव आणि दृश्य व द्रष्टा यांचा आधार असलेला शिव अशीं सात तत्त्वे आहेत. पंचप्राण आणि इंद्रियें यांचा समुदायहि यांच्याच पासून होतो. ९१ अचेतन पंचमहाभूतांना चेतना देणारा जीव आहे. त्यांचाहि परिपूर्ण साक्षी ईश्वर सातवा आहे. ९२ माया, महत्तत्त्व आणि अहंकार हीं जेथें असतात तेथेंच सूक्ष्म कारणें उत्पन्न होतात. त्यांच्यापासून सबाह्य-कार्यकारणासह स्थूल भूतें निर्माण होतात. ९३ तसाच मन-इंद्रियादिकांचाहि यांतच अंतर्भाव होतो. अशाप्रकारें हीं पंचमहाभूतें नेमिलीं आहेत. ९४ या सर्वांना चेतना देणारा जीव आहे व त्या सर्वांचा नियामक सदाशिव आहे. अशाप्रकारें हा सात तत्त्वांचा समूह स्पष्ट झाला. ९५ आतां सहा तत्त्वें मानणाऱ्या पक्षाचें निरूपण करून सांगतों. याविषयीं ऋषींचें म्हणणें काय आहे, त्याचें विवेचन करितों, तें ऐक. १९६.

षड् इति अत्र अपि भूतानि पञ्च षष्ठः परः पुमान्—तत्त्वें सहा आहेत, या मतींहि पांच भूतें व सहावा परम पुरुष. [या मतांत भौतिकांचा भूतांत व जीवांचा परमात्म्यांत अंतर्भाव करितात.] **आत्मसंभूतैः तैः युक्तं इदं सृष्ट्वा सः समुपाविशत्**—आपल्यापासून उत्पन्न झालेल्या पंचभूतांनीं युक्त असलेलें हें देहादि जगत् उत्पन्न करून तो परम पुरुष स्वतःच त्यांत प्रविष्ट झाला. पंचभूतात्मक पूर्वकारणामध्यें भौतिक इंद्रियादिकांचा अंतर्भाव वरील वचनानेंच सांगितला आहे, **चत्वारि एव इति तत्र अपि**—तत्त्वें चारच आहेत, यापक्षींहि, **तेजः आपः अन्नं आत्मनः जातानि**-तेज, जल, व पृथ्वी हीं आत्म्यापासून झालेलीं तीन भूतें आत्म्यासह चार तत्त्वें होतात. [त्यांच्या अंतर्भावासाठीं म्हणतात—] **तैः इदं जातं**-त्यांच्यापासून हें जगत् झालें, **अवयविनः जन्म खलु**-कार्यांचा जन्म कारणापासून होतो, हें प्रसिद्ध आहे. २०—२१.

पुरुष पंचमहाभूतांना निर्माण करून स्वतः त्यांतच प्रवेश करितो. म्हणून त्याला सहावें तत्त्व म्हणतात. ९७ आतां ज्याच्या मतानें फक्त चारच तत्त्वें आहेत, त्यांचा चमत्कार ऐक. तो जेवढा म्हणून साकार पदार्थ पहातो, तेवढें तत्वच आहे असें मानितो, १९८.

प्रत्यक्ष देखिजेती नयनीं । अग्नि आप आणि अवनी । तींचि सत्यत्वें मानी । मतज्ञानी मतवादी ॥ ९९ ॥ या स्थूळांतें चेतविता । तो आत्मा घेतला चौथा । या तिहींवीण साकारता । न घडे सर्वथा सृष्टीसी ॥ २०० ॥ नाम रूप क्रिया कारण । सृष्टीसी मुख्यत्वें यांचें जाण । यालागीं भूतें तीनचि प्रमाण । बोलतें लक्षण तें ऐसें ॥ १ ॥ एवं भूतें तीन आत्मा चौथा । हे चौं तत्त्वांची व्यवस्था । आतां सतरा तत्त्वांची कथा । ऐक तत्त्वतां सांगेन ॥ २ ॥

संख्याने सप्तदशके भूतमात्रेन्द्रियाणि च । पञ्च पञ्चैकमनसा आत्मा सप्तदशः स्मृतः ॥ २२ ॥

पंच विषय पंच भूतें । पांच इंद्रियें घेतलीं येथें । मन आत्मा मेळवूनि तेथें । केलीं निश्चितें सतरा हीं ॥ ३ ॥ यापरी तूं गा जाण । सोळा तत्वांचें निरूपण । तेथेंचि त्रयोदशलक्षण । स्वयें नारायण सांगत ॥ ४ ॥

तद्वत् षोडशसंख्याने आत्मैव मन उच्यते । भूतेन्द्रियाणि पञ्चैव मन आत्मा त्रयोदश ॥ २३ ॥

सतरा तत्त्वांचें निरूपण । तुज सांगीतलें संपूर्ण । त्यांत मन आत्मा एक जाण । तेंही लक्षण अवधारीं ॥ ५ ॥ जेवीं कां कथा सांगता आपण । स्वभावें हात हाले जाण । तेवीं मनाचें चंचळपण । स्वभावें जाण होतसे ॥ ६ ॥ राजा सिंहासनीं बैसला । तो राजत्वें पूज्य झाला । वसंत खेळतां धाविन्नला । तरी काय मुकला राज्यपदा ॥ ७ ॥ जेवीं काळें क्षोभला अतिथोर । तरी तो बोलिजे सागर । कां निश्चळ राहिलिया नीर । तरी समुद्र समुद्रत्वें ॥ ८ ॥ तेवीं मनपणें अतिचंचळ । कां आत्मत्वें निजनिश्चळ । दोहींपरी अविकळ । जाण केवळ परमात्मा ॥ ९ ॥ यालागीं मनाचें जें मनपण । आत्मसाक्षात्कारेंवीण ।

अग्नि, जल आणि पृथ्वी हीं प्रत्यक्ष डोळ्याना दिसणारीं तेवढींचें तत्त्वें खरीं आहेत. असें म्हणणारे कांहीं मतवादी आहेतें ९९ आणि या स्थूल तत्वांना चेतना देणाऱ्या आत्म्याला ते चौथें तत्त्व मानितात. या ती तत्त्वांवांचून सृष्टीला आकार येत नाहीं; २०० यांच्याचमुळें सृष्टीला नाम-रूप, क्रियाकारण प्राप्त होतें. यास्तव ते तीनच तत्त्वें प्रमाण मानितात. १ याप्रमाणें तीन भूतें व चवथा आत्मा अशीं चार तत्त्वांची व्यवस्था आहे. आतां सतरा तत्त्वांची व्यवस्था सविस्तर सांगतों, ती ऐक. २०२.

सप्तदशके संख्याने च–व तत्त्वें सतरा आहेत या मतीं, **भूतमात्र इंद्रियाणि पञ्च पञ्च एकमनसा आत्मा सप्तदशः स्मृतः**–भूतें शब्दादि तन्मात्रें व इंद्रियें हीं प्रत्येकीं पांच पांच व एका मनासह आत्मा सतरावा सांगितलेला आहे.

रूप-रसादि पांच विषय, आकाशादि पांच भूतें, पांच ज्ञानेंद्रियें मिळून पंधरा त्यांत मन व आत्मा मिळविला असतां सतरा तत्वें होतात. ३ याप्रमाणें सोळा तत्वांचें वर्णन करून, त्याच वेळीं तेरा तत्वांचें लक्षणहि स्वतः नारायण सांगत आहे. २०४.

तद्वत् षोडशसंख्याने आत्मा एव मनः उच्यते–त्याचप्रमाणें तत्त्वें सोळा आहेत, या मतीं संकल्प करणाऱ्या आत्म्यालाच मन म्हटलें जातें, **भूतेन्द्रियाणि पंच एव मनः आत्मा त्रयोदश**–तत्त्वें तेरा आहेत, या पक्षीं तन्मात्राशीं एकरूप केलेलीं भूतें पांच त्यांची प्रकाशक इंद्रियेंहि पांचच आणि मन एक, इंद्रियांचा अधिष्ठाता व आत्मा असा द्विविध आत्मा, याप्रमाणें तत्त्वें तेरा होतात. २३.

मीं तुला सतरा तत्त्वांचें सविस्तर व्याख्यान करून सांगितलें. त्यांत मन आणि आत्मा हीं एकरूपच आहेत त्यांचेंहि लक्षण आतां ऐक. ५ आपण एखादी कथा सांगत असतां हातानें स्वभावतःच जसे हावभाव होतात, त्याप्रमाणें मनाची स्वभावतःच हाल-चाल होत असते. ६ राजा सिंहासनावर बसतांच पूज्य होतो. मग तो जरी वसंत-ऋतूंतील मृगयादि क्रीडेंत धांवत असला तरी आपल्या राज्यपणाला कांहीं मुकत नाहीं. ७ तुफानी वाऱ्यानें समुद्र अतिशय खवळला व एरवीं शांत असला तरी त्याचा समुद्रपणा सारखाच असतो; ८ त्याप्रमाणें मनाच्या रूपानें अतिशय चंचलत्व आलें किंवा आत्मस्वरूपानें निश्चलत्व आलें तरी दोहोंतील अविकृत परमात्मा एकसारखाच

कोणासी न कळेचि गा जाण । हें मुख्य लक्षण मनाचें ॥ २१० ॥ मनआत्म्यांचें उभयऐक्य । तेंचि सतरांमाजीं उणें एक । उरली ती आवश्यक । सोळा हीं देख निजतत्त्वें ॥ ११ ॥ पांच इंद्रियें पंच महाभूतें । अकरावें मन ठेवूनि तेथें । जीव शिव दोनी घेऊनि येथें । केलीं निश्चितें तेराचि ॥ १२ ॥ आणीकही नाना तत्त्वमतें । मागां पुशिलीं तुवां मातें । तींही सांगेन मी तूंतें । सुनिश्चितें उद्धवा ॥ १३ ॥

एकादशत्वमात्माऽसौ महाभूतेन्द्रियाणि च ॥ अष्टौ प्रकृतयश्चैव पुरुषश्च नवेत्यथ ॥ २४ ॥

अकरा तत्त्वें बोलिलीं येथें । पांच इंद्रियें पंच महाभूतें । जीव शिव आणि मनातें । एकत्वें येथें गणिलीं देख ॥ १४ ॥ द्रति मधु आणि पिंवळा । एकत्र जेवीं चांपेकळा । सुवास सुस्वाद सुनीळा । एकत्र मेळा आम्रफळीं ॥ १५ ॥ तेवीं शिव आणि मन । तिन्हीं एकरूपचि जाण । जेवीं हेममणी संपूर्ण । हेमसूत्रीं सज्ञान ओंविती ॥ १६ ॥ पंच इंद्रियें पंच महाभूतें । जीव शिव मन एकात्मते । एकादश तत्त्वें येथें । जाण निश्चितें या हेतू ॥ १७ ॥ प्रकृति पुरुष महदहंकार । पंच महाभूतें अविकार । सकळ विकारसंभार । यामाजीं साचार अंतर्भूत ॥ १८ ॥ एवं ऋषीश्वरांच्या व्युत्पत्ती । तत्त्वविवक्षा उपपत्ती । नव तत्त्वसंख्यायुक्ती । जाण या रीतीं उद्धवा ॥ १९ ॥ एक बोलती निजज्ञानी । प्रकृति पुरुष तत्त्वें दोनी । आन पाहतां जनींवनीं । तिसरें नयनीं दिसेना ॥ २२० ॥ जे निश्चयें अतिनिष्टंक । ते म्हणती तत्त्व एक । एक तोंचि अनेक । अनेकीं एक निश्चित ॥ २१ ॥ जेवीं सुवर्णाचें भूषण । भूषणीं स्वयें सुवर्ण । तेवी अनेकी एकपण । एकत्वें जाण निश्चित ॥ २२ ॥ जेवीं उंसाची निजगोडी । गूळसाकरेच्या

असतो. ९ यास्तव मनाचें स्वरूप आत्मसाक्षात्कारावांचून कोणाला कळत नाहीं. हेंच मनाचें मुख्य लक्षण आहे. २१० अशाप्रकारें मन व आत्मा या दोहोंचें ऐक्य मानिलें असतां सतरांतून एक तत्त्व कमी होऊन सोळा तत्त्वें रहातात. ११ पांच इंद्रियें, पांच महाभूतें, अकरावें मन, जीव आणि आत्मा मिळून कोणी तेराच तत्त्वें मानितात. १२ हे उद्धवा ! आणखीहि नानाप्रकारचीं मतें तूं मागें विचारिलीं होतींस, तीहि मी तुला सविस्तर सांगतों, ऐक. २१३.

(एकादशत्वपक्षीं) असौ आत्मा महाभूतेन्द्रियाणि च –हा आत्मा, महाभूतें व इंद्रियें मिळून तत्त्वांना एकादशत्व आहे. (यापक्षीं जीव व मन यांचा आत्म्यामध्यें अंतर्भाव केला जातो.) अथ अष्टौ प्रकृतयः पुरुषः च एव इति नव– आठ प्रकृति व पुरुष या नऊ तत्त्वपक्षीं नऊ तत्त्वें मानितात. [घ्राण, जिव्हा, त्वक्, चक्षु श्रोत्र, मन, हस्त इत्यादि विकारांचा प्रकृतींत अंतर्भाव होतो.] २४.

अकराच तत्त्वें आहेत असें जे सांगतात ते पांच इंद्रियें, पंच महाभूतें मिळून दहा व जीव, शिव आणि मन यांना एकरूप मानून अकरा संख्या धरितात. १४ सुवास, मधुरत्व आणि पिवळेपणा हे तीन गुण चांफेकळींत जसे एकवटलेले असतात; किंवा सुगंध, उत्तम माधुर्य व उत्तमवर्ण हीं जशीं आंब्याच्या फळांत एकत्र असतात; १५ त्याप्रमाणें जीव, शिव आणि मन हीं तीन्हीं एकरूपच आहेत; किंवा कुशल लोक सोन्याचे मणि सोन्याच्या तारेंत जसे ओंवितात, १६ त्याप्रमाणें पांच इंद्रियें, पांच भूतें आणि जीव-शिव-मन यांचें ऐक्य मिळून अकरा तत्त्वें मानितात. १७ प्रकृति-पुरुष, महत्, अहंकार, अविकारी पंच महाभूतें आणि सगळ्या विकारांचा समुदाय या सर्वांचा यांत अंतर्भाव होतो. १८ अशा प्रकारें ऋषीश्वरांच्या व्युत्पत्तीनें तत्त्वांची विवक्षा संभवते. तत्त्वांच्या नऊ या संख्येविषयींही तूं अशीच उपपत्ति जाण. १९ दुसरे कित्येक ज्ञानी म्हणतात कीं, प्रकृति आणि पुरुष हीं दोनच तत्त्वें आहेत, त्याहून तिसरें तत्त्व जनांत किंवा वनांत कोठेंहि सांपडणार नाहीं. २२० ज्यांचा दृढ निश्चय आहे असे अद्वैती 'एकच तत्त्व आहे' असें म्हणतात. तेंच अनेक आकारांनीं भासतें. त्या अनेकांत तेंच एक निश्चित आहे. २१ सोन्याचा अलंकार बनविला असतां त्यांतील सोनें व तो दागिना हीं दोन्हीं जशीं एक असतात, त्याप्रमाणें अनेक दिसणाऱ्या तत्वांत खरें तत्त्व एकच आहे. २२ उंसाचा गोडपणा जसा गूळ व साखर यांच्या स्वरूपानें दोन

मोडी । तेचि दिसे चढोवढी । तेवीं तत्त्वपरवडी निजतत्त्वें ॥ २३ ॥ त्या जाणावया निजतत्त्वांतें । ऋषीश्वरांचीं बहुत मतें । मी स्वल्पचि बोलिलों येथें । येरवीं अगणितें ग्रंथांतरीं ॥ २४ ॥

इति नाना प्रसंख्यानं तत्त्वानामृषिभिः कृतम् । सर्वं न्याय्यं युक्तिमत्वाद्विदुषां किमशोभनम् ॥ २५ ॥

येथ सर्वज्ञ ज्ञाते होती । ते नाना मतें तत्त्वयुक्ती । विवंचोनियां उपपत्ती । विभागू जाणती यथार्थे ॥ २५ ॥ निजतत्त्व जाणावया जाण । करितां तत्त्वविवंचन । सर्वथा न लगे दूषण । तत्त्वें अधिकन्यून बोलतां ॥ २६ ॥ वस्तुतां विकारांच्या ठायीं । ज्ञात्यासी बोलावया विशेष नाहीं । विकार ते प्रकृतीच्या ठायीं । आत्मा शुद्ध पाहीं अविकारी ॥ २७ ॥ प्रकृतीहूनि आत्मा भिन्न । यालागीं तो अविकार जाण । विकारी प्रकृतीमाजीं पूर्ण । हें मुख्य लक्षण तत्त्वांचें ॥ २८ ॥ प्रकृतीहूनि वेगळेपण । पुरुषांचें जाणावया आपण । यालागीं उद्धवा जाण । तत्वविवंचन साधावें ॥ २९ ॥ हें ऐकोनि कृष्णवचन । उद्धव चमत्कारला जाण । प्रकृतिपुरुषांचें भिन्नपण । देवासी आपण पुसों पां ॥ २३० ॥

उ० उ०–प्रकृतिः पुरुषश्चोभौ यद्यप्यात्मविलक्षणौ । अन्योन्यापाश्रयात्कृष्ण दृश्यते न भिदा तयोः । प्रकृतौ लक्ष्यते ह्यात्मा प्रकृतिश्च तथात्मनि ॥ २६ ॥

एवं मे पुण्डरीकाक्ष महान्तं संशयं हृदि । छेत्तुमर्हसि सर्वज्ञ वचोभिर्नयनैपुणैः ॥ २७ ॥

प्रकारें व्यक्त होतो, त्याचप्रमाणें तत्त्वांचा प्रकार आहे. २३ त्या तत्त्वांना जाणण्यासाठीं अनेक श्रेष्ठ ऋषींचीं नानाप्रकारचीं मतें आहेत त्यांतील निवडक मतेंच मीं तुला सांगितलीं. पण इतर ग्रंथांतून तीं असंख्य वर्णिलीं आहेत. २२४.

——आतां उपसंहार करितात——

इति ऋषिभिः तत्त्वानां नाना प्रसंख्यानं कृतं–याप्रमाणें ऋषींनीं तत्त्वांच्या भेदाची गणना प्रकृति व पुरुष यांच्या भेदाचा बोध करण्यासाठीं केली आहे. [मग या अनेक पक्षांतील त्याज्य पक्ष कोणता व ग्राह्य कोणता ! उत्तर–] युक्तिमत्वात् सर्वं न्याय्यं–युक्तियुक्त असल्यामुळें हीं सर्वच तत्त्वगणना न्याय्य आहे, विदुषां अशोभनं किं–विद्वानांना व शोभणारें असें काय आहे ! २५.

जे सर्वज्ञ ज्ञाते असतात, ते अनेक प्रकारच्या तत्त्वांच्या युक्त्या सांगून, उपपत्तीचें विवेचन करून त्यांचा यथार्थ विभाग कसा करावा तें जाणतात. २५ वास्तविक एक आत्मतत्त्व जाणण्यासाठीं तत्त्वांचा विचार करून त्यांची कमी-अधिक संख्या केल्यास त्यांत कांहीं दोष नाहीं. २६ कारण विकारी वस्तूविषयीं बोलण्यास विद्वानाला कांहींच हरकत नाहीं. विकार प्रकृति आहेत आणि आत्मा शुद्ध अविकारी आहे २७ आत्मा प्रकृतीहून भिन्न आहे. म्हणून तो अविकारी आहे; आणि प्रकृति पूर्णपणें विकारयुक्त आहे. हेंच तत्त्वांचें मुख्य लक्षण आहे. २८ हे उद्धवा ! पुरुष प्रकृतीहून भिन्न आहे, हें जाणण्यासाठीं तत्त्वांचा विचार करावा. २९ हें श्रीकृष्णाचें वचन ऐकून उद्धवाला मोठा चमत्कार वाटला आणि तो आपण होऊन प्रकृति-पुरुषांचा भिन्नपणा देवाला विचारूं लागला. २३०.

' अहोपण, गुणसाम्य ही प्रकृति आहे. सत्त्वादि हे तिचे गुण आहेत, आत्म्याचे नव्हेत, अशी त्यांची भेदप्रतीति येत नसल्यामुळें तें जाणणें कसें शक्य आहे, असें उद्धव विचारितो——

उद्धव उवाच–उद्धव म्हणाला,प्रकृतिः पुरुषः च उभौ यद्यपि आत्मविलक्षणौ–प्रकृति व पुरुष हे दोन पदार्थ जरी जड व चित्स्वभावामुळें परस्पर विलक्षण आहेत तरी, हे कृष्ण अन्योन्यापाश्रयात् तयोः भिदा न दृश्यते–हे कृष्णा ! एकमेकांना सोडून त्या दोहोंची प्रतीति येत नसल्यामुळें त्यांचा भेद अनुभवाला येत नाहीं. (उद्धव त्यांचें अन्योन्य अपाश्रयत्वच सांगतो–) प्रकृतौ हि आत्मा लक्ष्यते तथा च आत्मनि प्रकृतिः–शरीराकार परिणत झालेल्या प्रकृतींत आत्मा प्रतीत होतो व त्याचप्रमाणें प्रकृति आत्म्यामध्यें प्रतीत होते. कारण आत्म्यावांचून तिची प्रतीतीच येत नाहीं. (अर्थात् देह व आत्मा यांचा भेद प्रतीत होत नाहीं, असा याचा भावार्थ.) पुण्डरीकाक्ष सर्वज्ञ–हे कमलनयना सर्वज्ञा, एवं मे हृदि महान्तं संशयं नयनैपुणैः वचोभिः छेत्तुं अर्हसि–याप्रमाणें माझ्या हृदयांतील फार मोठा संशय युक्तिप्रावीण्ययुक्त वचनांनीं घालविण्यास तूं समर्थ आहेस. २६–२७.

प्रकृति पुरुष भिन्नभिन्न । येचि अर्थीं उद्धवें जाण । साडेतीन श्लोकीं अगाध प्रश्न । देवासी आपण पुसत ॥ ३१ ॥ प्रकृतीहूनि पुरुष भिन्न । हें एकोनि देवाचें वचन । प्रकृतिपुरुषांवेगळा श्रीकृष्ण। हा द्रष्टा संपूर्ण दोहींचा ॥ ३२ ॥ म्हणे ऐक श्रीकृष्णा श्रेष्ठा । हे प्रकृतिपुरुषांची चेष्टा । तूं वेगळेपणें देखणा द्रष्टा । सुखवरिष्ठा श्रीपती ॥ ३३ ॥ प्रकृति पुरुष दोनी भिन्न । एक जड एक चेतन । हें मजही कळतसे जाण । परी वेगळेपण लक्षेना ॥ ३४ ॥ जैसा तप्तलोहाचा गोळ । दिसे अग्नीचि केवळ । तेवीं प्रकृतिपुरुषांचा मेळ । दिसे सबळ एकत्वें ॥ ३५ ॥ जेवीं बीज धरोनियां पोटेंसीं । निकणू कोंडा वाढे कणेंसीं । तेवीं प्रकृति जाण पुरुषेंसीं । अभिन्नतेंसीं जडलीसे ॥ ३६ ॥ कां नारळ चोख धरोनि पोटीं । निरस कठिण वाढे नरोटी । तेवीं पुरुषयोगें प्रकृति लाठी । झाली सृष्टी अनिवार ॥ ३७ ॥ कणावेगळा कोंडा न वाढे । तेवीं पुरुषावेगळी प्रकृति नातुडे । हें प्रकृतिपुरुषांचें बिरडें। तुजवेगळें निवाडें निवडेना ॥ ३८ ॥ जेवीं कां शिंपीचे अंगीं । जडली रुपेपणाची झगी । तेवीं पुरुषाच्या संयोगीं । प्रकृति जगीं भासत ॥ ३९ ॥ तीक्ष्ण रविकरसंबंधीं । भासे मृगजळाची महानदी । तेवीं पुरुषाच्या संबंधीं । प्रकृति त्रिशुद्धी आभासे ॥ २४० ॥ जेवीं का नभीं नीलिमा । वेगळी न दिसे सांडूनि व्योमा । तेवीं प्रकृति पुरुषोत्तमा । वेगळीक आम्हां दिसेना ॥ ४१ ॥ मुख्य देहाचें जें देहपण । तेंचि प्रकृतीचें बाधकत्व जाण । या देहाहोनियां भिन्न । पुरुषाचें भान दिसेना ॥ ४२ ॥ अहं प्रत्ययें आत्मा म्हणती । तेही देहाकारें स्फुरे स्फूर्ती । देहावेगळी आत्मप्रतीती । न दिसे निश्चितीं गोविंदा ॥ ४३ ॥ डोळा सांडूनि दृष्टि उरे । वातीवेगळा दीप थारे । तैं देहावेगळा आत्मा स्फुरे । साचोकारें गोविंदा ॥ ४४ ॥ जिव्हेवीण रसस्वादू । श्रोत्रेंवीण ऐकवे शब्दू । तैं देहावेगळा आत्मबोधू । होय विशदू गोविंदा ॥ ४५ ॥ कांटेवीण फणस आतुडे । कां सोपटेंवीण ऊंस वाढे । तैं देहावेगळा

प्रकृति-पुरुषांच्या भिन्नपणाविषयींचा गूढ प्रश्न पुढील साडेतीन श्लोकांनीं उद्धवानें श्रीकृष्णाला विचारिला. ३१ ‘प्रकृतीहून पुरुष भिन्न आहे’ हें देवाचें वचन ऐकून ‘तर मग प्रकृति-पुरुषाहूनहि भिन्न असलेला हा श्रीकृष्ण त्या दोहोंचाहि साक्षी झाला.’ ३२ अशा आशयानें उद्धव म्हणाला ‘हे देवाधिदेवा लक्ष्मीकांता! श्रेष्ठ श्रीकृष्णा, ऐक. यावरून प्रकृति-पुरुषांचा सर्व व्यवहार पहाणारा तूं एक वेगळाच साक्षी आहेस असें ठरतें. ३३ प्रकृति व पुरुष हीं दोन्हीं भिन्न आहेत. एक जड आहे व एक चेतन आहे, हें मला कळतें; परंतु तें परस्परांहून वेगळें कसें हें मात्र समजत नाहीं. ३४ तापवून लाल केलेल्या लोखंडाचा गोळा जसा केवळ अग्नीच दिसतो, त्याप्रमाणें प्रकृति-पुरुषांचा समुदाय मला एकरूपच भासतो. ३५ किंवा पोटांत बीज ठेवून कणरहित कोंडा जसा वाढतो तशीं हीं प्रकृति-पुरुष परस्पर संलग्न झालेलीं दिसतात. ३६ किंवा पोटांत उत्तम खोबरें धारण करून नारळाची करवंटी जशी वाढत असते, त्याप्रमाणें प्रकृति-पुरुषाच्या ऐक्यानें या सृष्टीचा एवढा अफाट विस्तार झाला आहे. ३७ कोंडा जसा कणावांचून वाढत नाहीं, त्याप्रमाणें प्रकृति पुरुषावांचून व्यक्त होत नाहीं. हें प्रकृति-पुरुषांचें जाळें तुझ्यावांचून इतर कोणालाहि सोडवितां येणार नाहीं. ३८ शिंपीला जसें रुप्याचें तेज जडलेलें असतें, त्याप्रमाणें पुरुषाच्या साहचर्यामुळें प्रकृति जगांत भासते. ३९ सूर्याच्या प्रखर किरणांमुळें मृगजळाची जशी महानदी भासते, ३९ तशी पुरुषाच्या सान्निध्यानें प्रकृति सत्य असल्याप्रमाणेंच वाटते. २४० हे पुरुषोत्तमा! आकाशाचा निळेपणा आकाशाला सोडून जसा वेगळा रहात नाहीं, तशी प्रकृति पुरुषावांचून असलेली आम्हांला दिसत नाहीं. ४१ मुख्य देहाचा जो देहपणा तोच प्रकृतीचा बाध होय. पण आम्हांला देहाव्यतिरिक्त पुरुषाचें भान होत नाहीं. ४२ हे गोविंदा! ‘अहं’ म्ह० मी या प्रत्ययालाच आत्मा असें म्हणतात; परंतु तें स्फुरणहि देहामुळेंच होतें. देहावांचून आत्मप्रतीति केव्हांहि होत नाहीं. ४३ हे श्रीहरे! नेत्रावांचून जर दृष्टि राहील, वातीवांचून जर दिवा जळेल तरच देहावांचून आत्मा प्रतीत होईल. ४४ जिभेवांचून जसा रस चाखावा, किंवा कानांवांचून शब्द ऐकावा; त्याप्रमाणें देहावांचून आत्म्याचा अनुभव घेणें आहे. ४५ किंवा हे श्रीकृष्णा! कांट्यावांचून जर फणस असूं

आत्मा जोडे । वाडेंकोडें गोविंदा ॥ ४६ ॥ तुम्हींच सांगीतली निजात्मखूण । नरदेह ब्रह्मप्राप्तीचें कारण । शेखीं देहावेगळें आत्मदर्शन । केवीं आपण प्रतिपादां ॥ ४७ ॥ आणि आत्म्यावेगळी प्रकृती । सर्व प्रकारें नये व्यक्ती । रूपावेगळी छाया केउती । कैशा रीतीं आभासे ॥ ४८ ॥ गोडी-वेगळी साकर होये । परिमळावेगळा कापूर राहे । तैं आत्म्यावेगळी पाहें । प्रकृति लाहे अभिव्यक्ती ॥ ४९ ॥ गगनावेगळा घट राहे । तंतू वेगळा पट होये । तैं आत्म्यावेगळी पाहें । प्रकृति लाहे अभिव्यक्ती ॥ २५० ॥ गोडीवेगळा वाढे ऊंस । कणेंवीण जैं वाढे भूस । तैं आत्म्यावेगळी रूपस । माया सावकाश व्यक्तीसी ये ॥ ५१ ॥ प्रकृतिलक्षणीं आत्मा लक्षिजे । आत्मेनि प्रकृतीसी प्रकाशिजे । अनादि दोनी इये योग जे । वेगळा लाहिजे बोध केवीं ॥ ५२ ॥ प्रकृतीहूनि आत्मा भिन्न । सर्वथा आम्हां न दिसे जाण । येचि अर्थींची विनवण । उद्धव आपण करितसे ॥ ५३ ॥

कमलनाभा कमलानना । कमलालया कमलधारणा । कमलिनीवासस्थाना । कमलनयना श्रीकृष्णा ॥ ५४ ॥ प्रकृतिपुरुषयोग अवघड । योग्यां न कळे भिन्न निवाड । या संशयाचें अतिजाड हृदयीं झाड वाढलें ॥ ५५ ॥ हृदयीं संदेहाचीं मूळें । प्रकृतिभूमीं विकल्पजळें । संशयवृक्ष तेणें बळें । वाढला अहंफळें सदा फळित ॥ ५६ ॥ ज्या वृक्षाचीं सदा फळें खातां । जीव न राहे सर्वथा । तेणें संशयाची अधिकता । उसंतू चित्ता पैं नाहीं ॥ ५७ ॥ ऐशिया वृक्षाचें छेदन । कृपेनें करावें आपण । सोडूनि ज्ञानतिखबाग्बाण । करीं निर्दळण निजांगें ॥ ५८ ॥ योगयागशास्त्रपाठें । करितां धर्मकर्म-कचाटें । या वृक्षाचें पानही न तुटे । हें कठिणत्व मोठें गोविंदा ॥ ५९ ॥ या वृक्षाचें करितां छेदन । ब्रह्मा झाला संदेहापन्न । तुवां हंसगीत सांगोन । उद्धरिला जाण सुपुत्र ॥ २६० ॥ मुख्य ब्रह्मयाची ऐशी

शकेल, किंवा सोपटावांचून जर ऊस वाढेल तर देहावांचून आत्म्यांचें स्फुरण होईल. ४६ हे गोविंदा ! मनुष्य-देहांतच ब्रह्मप्राप्ति होते, अशी आत्मखूण तूंच मला सांगितलीस व आतां देहावांचून आत्म्याची प्रतीति येते, हें कसें प्रतिपादन करितोस ! ४७ आत्म्यावांचून प्रकृति केव्हांहि प्रत्ययास येत नाहीं. पदार्थावांचून छाया जशी शक्य नाहीं, तशी पुरुषावांचून प्रकृति भासणें शक्य नाहीं. ४८ गोडपणावांचून साखर जर असूं शकेल किंवा सुवासावांचून कापूर राहूं शकेल तर आत्म्यावांचून प्रकृति व्यक्त होईल. ४९ आकाशाहून घट जर निराळा राहील व तंतूहून पट जर निराळा राहील, तर आत्म्यावांचून प्रकृति अभिव्यक्त होईल. २५० गोडपणावांचून जर ऊंस वाढेल, कणावांचून जर भुसा वाढेल तर आत्म्यावांचून मूर्त माया प्रकट झालेली दिसेल. ५१ प्रकृतीच्या लक्षणावरून आत्मा प्रतीत होतो आणि आत्मा प्रकृतीला प्रकाशित करितो. असा हा परस्पर संबंध अनादि आहे. तो वेगळा कसा समजावयाचा ! ५२ यास्तव आत्मा प्रकृतीहून भिन्न असल्याचें आम्हांला सर्वथा दिसत नाहीं. याच अर्थाची विनंति उद्धव पुनः पुनः करीत आहे. २५३.

हे कमलनाभा, कमलवदना, श्रीनिवासा, कमलधरा ! कमलिनी-आश्रया ! कमलनयना, श्रीकृष्णा ! ५४ प्रकृति-पुरुषांचा हा संबंध फार गहन आहे. त्याचा स्पष्ट निर्णय योग्यांनाहि कळत नाहीं. याच संशयाचा अफाट वृक्ष हृदयांत वाढला. ५५ हृदयांतील संशयरूपी मुळांना प्रकृतिरूपी भूमीमध्यें विकल्परूपी जल मिळालें. त्यामुळें हा संशयवृक्ष जोमानें वाढला व त्याला अहंकाराचीं असंख्य फळें सदोदित लागत आहेत. ५६ त्या वृक्षाचीं हीं फळें खाल्ल्यावांचून जीवाला क्षणभरहि चैन पडत नाहीं. त्यानें त्याचा संशय वाढत जातो व चित्ताला विश्रांति मिळेनाशी होते. ५७ अशा या वृक्षाचा तूं कृपा करून छेद कर. ज्ञानरूपी तीक्ष्ण बाण सोडून तूं स्वतः त्या वृक्षाचा समूळ नाश कर. ५८ हे गोविंदा ! कितीहि यज्ञ-याग केले, शास्त्रपठन केलें किंवा धर्म-कर्माचे कितीहि अनुष्ठान केलें तरी या वृक्षाचें एक पानहि तुटत नाहीं. असा तो वृक्ष फार चिवट आहे. ५९ या वृक्षाचा छेद करीत असतां ब्रह्मदेवहि संशयांत पडला; तेव्हां तूंच हंसगीत सांगून त्याच्या सनकादि सुपुत्रांचा उद्धार केलास. २६०

अवस्था । तेथ इतरांची कोण कथा । या वृक्षाचा छेदिता । तुजवीण सर्वथा आन नाहीं ॥ ६१ ॥ छेद करितां वरिवरी । वासना मूळ उरल्या उरी । फांफाईल चौगुण्या परी । अतिशयें भारी बांबळे ॥ ६२ ॥ याचा समूळ मूळेंसीं कंदू । छेदिता छेदक तूं गोविंदू । तुजवेगळा संशयच्छेदू । भलता प्रबुद्धू करूं न शके ॥ ६३ ॥ म्हणशी संशय हृदयाच्या ठायीं । तेथ शस्त्रांचा रिगमू नाहीं । म्यां छेदावें कैसें कायी । ते अर्थीचें मी पाहीं सांगेन ॥ ६४ ॥ तुझें ज्ञानचक्र अलौलिक । तुझेनि शब्दतेजें अतितिख । समूळ संशयाचें छेदक । तुझें वचन एक गोविंदा ॥ ६५ ॥ ऐसें तुझें ज्ञानवचन । तुवां केलिया कृपावलोकन । समूळ संशयाचें निर्दळण । सहजेंचि जाण होताहे ॥ ६६ ॥ तरी तुवां श्रीमुकुंदा । फेडावी माझी संशयबाधा । तया उद्धवाचिया शब्दा । गोपीराद्धा सांगेन म्हणे ॥ ६७ ॥ असता बहुसाल सज्ञान । सकळ संशयांचें निर्दळण । मीचि कर्ता हें काय कारण । तेंही लक्षण अवधारीं ॥ ६८ ॥

त्वत्तो ज्ञानं हि जीवानां प्रमोषस्तेऽत्र शक्तितः । त्वमेव ह्यात्ममायाया गतिं वेत्थ न चापरः ॥ २८ ॥

अतर्क्य तुझी मायाशक्ती । त्या आवरूनि आनंदस्फूर्ती । दृढ लावूनि विषयासक्ती । तेणें जीव होती अज्ञान ॥ ६९ ॥ करितां विषयांचें ध्यान । जीव होय मनाअधीन । त्यास मन करी हीनदीन । अतिकृपण जड मूढ ॥ २७० ॥ ऐसे केवळ जीव जे अज्ञान । ते तुझ्या कृपाकटाक्षें जाण । झाले गा ज्ञानसंपन्न । हे कृपा पूर्ण पैं तुझी ॥ ७१ ॥ तुझी कृपा झालिया परिपूर्ण । करूनि मायेचें निर्दळण । जीव होती ब्रह्म पूर्ण । तुझेनि जाण श्रीकृष्णा ॥ ७२ ॥ म्हणशी माझे गांठीं जाण । नाहीं ज्ञान ना

मुख्य ब्रह्मदेवाची जर ही स्थिति तर मग इतरांची काय कथा ! हे प्रभो ! या वृक्षाचा छेद करणारा तुजवांचून दुसरा कोणीहि नाहीं. ६१ या वृक्षाचा वरून-वरूनच जर छेद केला व त्याचीं वासनारूपी मुळें तशींच राहिलीं, तर पहिल्यापेक्षां चौपटीनें तो जोमांत वाढतो आणि त्याचा अनिवार विस्तार होतो. ६२ यास्तव याचा समूळ गड्डाच तोडून टाकण्यास तूं एक गोविंद समर्थ आहेस. तुझ्यावांचून दुसरा कोणी बुद्धिमान् पुरुषहि या संशयाचा नाश करूं शकणार नाहीं. ६३ यावर तूं कदाचित् असें म्हणशील कीं, हा संशय हृदयांत असतो; तेथें शस्त्रांचा प्रवेशहि होत नाहीं. मग मी त्याचा छेद कसा करावा ! याचेंहि उत्तर सांगतों, ऐक. ६४ हे गोविंदा ! तुझें ज्ञानरूपी चक्र अलौकिक आहे. त्याला तुझ्या शब्दरूपी तेजानें अत्यंत तीक्ष्ण धार चढली आहे. यास्तव तुझें एक वचनच सगळ्या संशयाचा समूळ नाश करणारें आहे. ६५ तुझ्या ज्ञानवचनाचा इतका प्रभाव आहे. तुझी फक्त कृपादृष्टि असली कीं, सगळ्या संशयाचें सहजच निरसन होतें. ६६ म्हणून हे मुकुंदा ! माझ्या मनाचा संशय दूर करावा. उद्धवाच्या या विनंतीला गोपिकारमण श्रीकृष्णानें ' सांगेन ' असें उत्तर दिलें. ६७ ' अनेक सज्ञान लोक असूनहि सगळ्या संशयांचा नाश करणारा मीच एक आहें, ' असें म्हणण्याचें कारण काय ! याचाहि हेतु उद्धव सांगत आहे. २६८.

—वर अर्हसि असें जें म्हटलें आहे, तेंच अधिक स्पष्ट करितात—

हि जीवानां ज्ञानं त्वत्तः—कारण जीवांचें ज्ञान तुझ्या प्रसादानेंच होतें. अत्र प्रमोषः ते शक्तितः—व त्यांच्या ज्ञानाचा भ्रंश तुझ्या मायाशक्तीमुळें होतो. (अरे उद्धवा ! स्वप्रकाश आत्म्याचा भ्रंश कसा होईल. ज्ञान देणें व त्याचा भ्रंश होणें यांत माझें कोणतें प्रयोजन सिद्ध होणार आहे ! उत्तर—) त्वं एव हि आत्ममायायाः गतिं वेत्थ न अपरः —तूंच आपल्या मायेची गति जाणतोस दुसरा कोणीहि जाणत नाहीं. २८.

हे श्रीकृष्णा ! तुझी मायाशक्ति अतर्क्य आहे. ती आत्मानंदाच्या स्फूर्तीला आंवरून धरिते आणि विषयांची दृढ आसक्ति वाढविते. त्यामुळें जीव अज्ञान बनतो. ६९ विषयांचें चिंतन केल्यानें जीव मनाच्या अधीन होतो मग त्याला मन हीन, दीन, जड, मूढ व अतिकृपण करून सोडितें २७० व केवल अज्ञ असलेले जीव तुझ्या कृपादृष्टीनें ज्ञानसंपन्न होतात. ही तुझीच केवल पूर्ण कृपा होय. ७१ अशी तुझी परिपूर्ण कृपा झाली असतां जीव मायेचा पुरता पराभव करून तुझ्याच सामर्थ्यानें परब्रह्माला प्राप्त होतो. ७२ यावर तूं कदाचित असें म्हणशील कीं, माझ्या-

अज्ञान। तरी तूं ज्ञानदाता आपण। झालासी पूर्ण तें ऐक॥ ७३॥ धातासवितासनत्कुमारांसी। नारदप्र्ऱ्हादअंबरीषांसी। कालीं उपदेशिलें अर्जुनासी। ऐसा तूं होशी ज्ञानदाता॥ ७४॥ म्हणशी बहुत असती सज्ञान। त्यांसी पुसोनि साधावें ज्ञान। तुजवेगळें मायेचें नियमन। त्यांचेनि जाण कदा नोहे॥ ७५॥ मायेची उत्पत्तिस्थिती। मायानिर्दळणी गती। तूं एक जाणता त्रिजगती। यालागीं श्रीपति कृपा करीं॥ ७६॥ यापरी उद्धवें विनंती। करूनि प्रार्थिला श्रीपती। तो प्रकृतिपुरुषविभाग युक्तीं। उद्धवाप्रती सांगेल॥ ७७॥ जेवीं सूर्यापाशीं मृगजळ। कां गगनीं उपजे आभाळ। काचभूमिके दिसे जळ। तैशी प्रकृति सबळ पुरुषापाशीं॥ ७८॥ यापरी स्वयें श्रीकृष्ण। प्रकृतिपुरुषनिरूपण। समूळ सांगताहे आपण। तो म्हणे सावधान उद्धवा॥ ७९॥

श्री० भ० प्रकृतिः पुरुषश्चेति विकल्पः पुरुषर्षभ। एष वैकारिकः सर्गो गुणव्यतिकरात्मकः॥ २९॥

प्रकृति पुरुष हे दोनी। सदा अत्यंत वेगळेपणीं। जैसा दिवस आणि रजनी। एक लोपोनी एक प्रबळे॥ २८० दिवस लोपतांचि जाण। अंधकारेंसीं परिपूर्ण। घेऊनियां ताराग्रहगण। रात्री आपण उल्हासे॥ ८१॥ तेवीं लोपतां पुरुषाचें भान। घेऊनि कार्येंसी कारणगुण। ज्ञानाज्ञानेंसीं परिपूर्ण। प्रकृति जाण थोरावे॥ ८२॥ येथ मुख्यत्वें जो देहाकार। तेंचि प्रकृतीचें दुर्ग थोर। तेथें ठेविला ठाणेदार। देहअहंकार महायोद्धा॥ ८३॥ जो जिवलग विश्वासाचा। प्रकृतीस विश्वास त्याचा। तो नेटका झुंझार दुर्गींचा। भरभार तेथींचा तो आहे॥ ८४॥ तेथ अभिमानें आपण। प्रकृतीस निर्भय

जवळ ज्ञानहि नाहीं व अज्ञानहि नाहीं ! तर तूं ज्ञानदाता कसा आहेस तेंहि सांगतों, ऐक. ७३ तूंच ब्रह्मदेव, सूर्य, सनत्कुमार नारद, प्रल्हाद, अंबरीष, यांना ज्ञानी केलेंस, आतां नुकताच तूं अर्जुनाला गीतारूपानें उपदेश केलास. असा तूं ज्ञान देणारा आहेस. ७४ तूं जर असें म्हणशील कीं, 'पुष्कळ सज्ञान ब्रह्मवेत्ते आहेत, त्यांना विचारून तूं ज्ञान-संपन्न हो' तर तुझ्यावांचून दुसरा कोणीहि मायेचें नियमन करणारा नाहीं. ७५ मायेची उत्पत्ति-स्थिति-लय हें जाणणारा सगळ्या त्रिभुवनांत तूंच एक आहेस. म्हणून हे श्रीपते ! मजवर कृपा कर. ७६ याप्रमाणें विनंति करून उद्धवानें श्रीकृष्णाला प्रसन्न केलें. तो आतां प्रकृति-पुरुषांचा विभाग स्पष्ट करून उद्धवाला सांगत आहे. ७७ सूर्य-किरणांपासून जसें मृगजळ निर्माण होतें, किंवा आकाशांत जसे मेघ पसरतात, किंवा कांचा बसविलेल्या जमिनीवर जसा पाण्याचा भास होतो, तशी पुरुषापासून ही अत्यंत प्रबळ प्रकृति उत्पन्न होते. ७८ याप्रमाणें श्रीकृष्ण स्वतः प्रकृति-पुरुषांचें स्पष्ट निरूपण करण्याच्या इच्छेनें म्हणाला, 'उद्धवा ! सावधान हो. २७९.

—विकार व अविकार, नानात्व व एकत्व, सापेक्ष प्रकाश व निरपेक्ष प्रकाश, यांच्या योगानें प्रकृति—पुरुषांचा अत्यंत भेद सांगतात—

श्रीभगवान् उवाच - भगवान् म्हणाले—पुरुषर्षभ—हे पुरुषश्रेष्ठा ! प्रकृतिः पुरुषः च इति विकल्पः—महदादिरूपानें जी परिणाम पावते ती प्रकृती, जें कधींहि परिणाम न पावणारें तत्त्व तो पुरुष असा प्रकृति—पुरुषांचा अत्यंत भेदच आहे. ('पण तो कोणत्या कारणानें ?' अशी अपेक्षा झाली असतां प्रकृति या शब्दानें सांगितलेल्या देहादि संघाताचें विकारित्वच अगोदर दाखवितात—) एषः सर्वः वैकारिकः—हा उत्पन्न केला जाणारा देहादिसंघात विकारवान् आहे. कारण तो गुणव्यतिकरात्मकः सत्त्वादि गुणांच्या क्षोभामुळें झालेला आहे. २९.

प्रकृति आणि पुरुष हीं दोन्हीं निरंतर भिन्नच आहेत. दिवस आणि रात्र यांतील एक मावळतो व दुसरी प्रकटते; २८० दिवस मावळतांच रात्र सर्व नक्षत्रें, ग्रह, यांच्या समुदायासह पूर्ण अंधाराला बरोबर घेऊन मोठ्या उल्हासानें जशी प्रकट होते, ८१ त्याप्रमाणें पुरुषाचें भान लुप्त होतांच प्रकृति आपल्या सत्त्वादि गुणांच्या कार्य-कारणांसह ज्ञान-अज्ञान यांस घेऊन अत्यंत प्रबल होते. ८२ देहाचा आकार हाच मुख्यत्वेंकरून प्रकृतीचा अजिंक्य किल्ला आहे. त्यांत तिनें देहाभिमान हा अत्यंत शूर किल्लेदार रक्षक ठेविला आहे. ८३ तोच या प्रकृतीचा अत्यंत जिवलग, विश्वासु व एकनिष्ठ सेवक आहे. देहरूपी किल्ल्यावरील पराक्रमी योद्धा तोच आहे. त्या गडाची सगळी

देऊनि जाण । घालूनि सामग्रीविकारभरण । दुर्ग दारुण बळकाविलें ॥ ८५ ॥ ऐक उद्धवा पुरुषश्रेष्ठा । निजप्रकृतीचिया निष्ठा । देहदुर्गीं अभिमान लाठा । जाहला वरिष्ठा या हेतू ॥ ८६ ॥ देहदुर्गीं गुण अहंकार । दुर्गसामग्रीविकार । अवघीं प्रकृतीच साचार । तदाकार भासत ॥ ८७ ॥ गगनीं गंधर्वनगर जाण । माड्या गोपुरें वन उपवन । तैशी प्रकृति आपण । नानाकारें जाण भासत ॥ ८८ ॥ जैशी मृगजळाची सरिता । दुरोनि दिसे प्रवाहतां । तेवीं प्रकृतीची सर्वथा । नानाकारता आभासे ॥ ८९ ॥ ऐसें प्रकृतिदुर्ग महाथोर । तेथें नाना सामग्रीविकार । जे जे घाली अहंकार । ते ऐक साचार सांगेन ॥ २९० ॥

ममाङ्ग माया गुणमय्यनेकधा विकल्पबुद्धिश्च गुणैर्विधत्ते ।
वैकारिकस्त्रिविधोऽध्यात्ममेकमथाधिदैवमधिभूतमन्यत् ॥ ३० ॥

माझी माया गा आपण । सर्वांगें जाहली तिनी गुण । तेही अभिमानें आपण । निजसत्ता जाण आवरिले ॥ ९१ ॥ तेचि देहदुर्गाभंवतीं जाण । त्रिगुणांचें आगड पूर्ण । तेथें मांडूनि त्रिपुटीविंदाण । मारा दारुण अभिमान करी ॥ ९२ ॥ त्या दुर्गाचें दृढ रक्षण । मुख्यत्वें त्रिपुटीचि जाण । ते त्रिपुटीचें मूळ लक्षण । तुज मी आपण सांगेन ॥ ९३ ॥ अगा उद्धवा बुद्धिमंता । तुज मी सांगेन ऐक आतां । तेथ असती तिनी वाटा । दोनी अव्हाटा एकी नीट ॥ ९४ ॥ त्या मार्गींची उभारणी । सैन्य रचिलें दाही आरणीं । युद्धकार जो निर्वाणी । तो तेथूनि निरीक्षी ॥ ९५ ॥ तेही मार्ग धरिले चौपाशीं । राखण बैसले तिनी वाटेशीं । तेथ रिघावया सायासीं । ज्ञानियासी काय काज ॥ ९६ ॥ आतां असो इतुली

जबाबदारी त्याच्यावर असते. ८४ तो अहंकाररूपी वीर आपण होऊन प्रकृतीला अभय देतो. विकारांची सर्व युद्धसामग्री जमवून तो दुर्गम किल्ला हस्तगत करून घेतो. ८५ हे पुरुषांतील श्रेष्ठ उद्धवा ! ऐक. प्रकृतीवर निष्ठा ठेवून हा अहंकार देहरूपी किल्ल्यांत बलाढ्य होऊन रहातो व त्यामुळें तो दुर्जय होतो. ८६ या देहरूपी गडावर तीन गुण व अहंकारादि विकार यांची सामग्री भरलेली असते. ती वास्तविक प्रकृतीची असून देहाचीच भासते. ८७ आकाशांतील गंधर्वनगरांत माड्या, शिखरें, वनें, उद्यानें इत्यादि जशीं भ्रमानें भासतात, त्याप्रमाणें प्रकृति नानाप्रकारची भासते. ८८ मृगजलाच्या महानदीचा प्रवाह जसा लांबून फार दूरवर वहात असलेला भासतो, त्याप्रमाणें प्रकृतीचे अनेक आकार भासतात. ८९ असा हा प्रकृतीचा किल्ला अत्यंत दुर्घट असून त्यांत अहंकार नानाप्रकारच्या विकारांची सामग्री ठासून भरीत असतो. तेंच सविस्तर सांगतों, ऐक. २९०.

—आतां मायेचें नानात्व सांगतात—

अङ्ग—हे उद्धवा ! **मम गुणमयी माया गुणैः अनेकधा विकल्पबुद्धिः च विधत्ते**—माझी त्रिगुणात्मिका माया अनेक प्रकारचा भेद व अनेक प्रकारच्या भेदबुद्धि करिते. (अनेकत्वाचा विस्तार करितात—) **वैकारिकः अध्यात्मं एकं अथ अधिदैवं अन्यत् अधिभूतं इति त्रिविधः**—हा भेद अनेक विकारवान् जरी असला तरी मुख्यतः अध्यात्म, अधिदैव व अधिभूत असा तीन प्रकारचा आहे. ३०.

माझी माया आपल्या स्वरूपानेंच त्रिगुणात्मक झाली आहे. तीच स्वतः अभिमान बनली आणि आपल्या सत्तेनें तिनें सर्वांवर ताबा ठेविला आहे. ९१ त्या देहरूपी किल्ल्याभोंवतीं तीन गुणांचा खंदक खणून त्रिपुटीची व्यवस्थित रचना करून हा अभिमान आंतून जोराचा मारा सुरू करितो. ९२ त्या किल्ल्यांचें दृढ रक्षण मुख्यत्वें करून त्रिपुटीच्या योगानेंच होतें. त्या त्रिपुटीचें मूळ लक्षण मी तुला सांगतों. ९३ हे बुद्धिमान् उद्धवा ! मी तुला आतां सांगतों, तें नीट लक्षपूर्वक ऐक. त्या देहरूपी किल्ल्याला तीन मार्ग आहेत. त्यांतील दोन आडवाटा आहेत व एक सरळ राजमार्ग आहे. ९४ त्या मार्गांत अशी रचना केलेली असते कीं, दहा ठिकाणीं सैन्य उभें असतें व शेवटीं युद्ध करणारा मुख्य वीर तेथून पहात असतो. ९५ ते मार्ग चारी बाजूंनीं अडवून धरलेले असतात. त्यांतील तिन्ही वाटांवर पहारेकरी असतात. तेव्हां मोठे कष्ट सोसून तेथून जाण्याची ज्ञानी लोकांना काय गरज ! ' आतां हा

परी । देहदुर्गाची थोर भरोभरी । म्हणे ऐके गा यया थोरी । उद्धवातें हरी सांगत ॥ ९७ ॥ कार्य कारण कर्तव्यता । कर्म क्रिया अहंकर्ता । ध्येय ध्यान विषयध्याता । दुर्ग सर्वथा दृढ केलें ॥ ९८ ॥ तेथ भोग्य भोग भोक्ता । कर्म कार्य आणि कर्ता । अभिमान जाहला वसता । प्रकृतिसंमता संयोगें ॥ ९९ ॥ तेथ चोरद्वाराचिया लक्षीं । उघडूनि कामक्रोधखिडकी । घाला घालितां एकाएकीं । सकळ लोकीं कांपिजे ॥ ३०० ॥ त्यांचा घेऊनियां भेदरा । तापस पळाले सैरा । लंगोटी सांडिल्याही दिगंबरा । क्रोध थरथरां कांपवी ॥ १ ॥ लोभयंत्राचे कडाडे । तमधूम दाटे चहूंकडे । महामोहाचें गडद पडे । मागेंपुढें दिसेना ॥ २ ॥ दुर्गासभोंवतीं नवद्वारें । नवद्वारीं नवही यंत्रें । तेणें तेणें यंत्रद्वारें । विषय महामारें मारिती ॥ ३ ॥ देहाभिमानाचें चाळक । मुख्यत्वें मनचि एक । तें दुर्धर महामारक । दुर्गअटक तेणें केलें ॥ ४ ॥ माळ चढोनि अवचट । पारके रिघती घडघडाट । ते दशमद्वाराची वाट । देऊनि कपाट दृढ बुजिलें ॥ ५ ॥ यापरी स्वयें मन । दुर्ग पन्नासी आपण । त्यासी सबाह्य राखण । घरटी जाण स्वयें करी ॥ ६ ॥ धरोनि कामाचा हात । मन रिघे पारक्यांत । मुख्य धुरंसी लोळवीत । इतरांचा तेथ कोण पाड ॥ ७ ॥ ऐसें मनाचें मारकपण । अनिवार अतिकठिण । त्रिविधतापें खोंचूनि जन । हुंबत जाण पाडिले ॥ ८ ॥ देवांपासोनि आधिदैविक । मानस ताप आध्यात्मिक । भूतांपासाव तो भौतिक । या नांव देख त्रिविध ताप ॥ ९ ॥ सत्त्वगुणें देख अंतःकरण । रजोगुणें इंद्रियें जाण । महाभूतें विषयभान । तमोगुणें जाण प्रसवत ॥ ३१० ॥ त्रिविध विकारीं विकार बहुळ । ते हे प्रकृतीच येथें केवळ । हेचि दुर्गसामग्री प्रबळ । प्रपंच सबळ येणें जाहला ॥ ११ ॥ संकल्पमहापर्जन्योदकीं । वासनाजीवनें भरलीं टांकीं । तेणें जीवनें दुर्गाच्या लोकीं । संसारसुखदुःखीं विचरिजे ॥ १२ ॥ दुर्गनवद्वारीं समस्तें ।

प्रकार इतकाच ठेवूं. अगोदर देहरूपी किल्ल्यावर भयंकर सामग्री भरलेली आहे. तिचा महिमा सांगतों ऐक.' असें श्रीहरि उद्धवाला म्हणाला. ९७ कार्य-कारण-कर्तव्य; कर्म-क्रिया-कर्ता; ध्येय-ध्यान-ध्याता या त्रिपुटीनें सगळा किल्ला व्यापून टाकिला, ९८ तेथें भोग्य-भोग-भोक्ता; कर्म-कार्य-कर्ता हा अभिमान प्रकृतीच्या संमतीनें दृढ ठाणें देऊन बसला आहे. ९९ तो चोर दरवाजा उघडून पहात असतो आणि काम-क्रोधांची खिडकी उघडून एकदम छापा घालतो. त्यामुळें सगळ्या लोकांचा थरकांप होतो. ३०० त्याच्या भयंकर धाकानें तपस्वी सैरा-वैरां पळत सुटतात. लंगोटी सोडून टाकलेल्या दिगंबरासहि क्रोध चळचळां कांपवितो. १ लोभरूपी तोफांची सरबत्ती सुरू झाली कीं, सारखा धाड धाड शब्द होत असतो. त्यामुळें चारहि दिशा अज्ञानरूपी धुरानें भरून जातात. महामोहानें सर्व दिशा धुंद होतात. मागें-पुढें कांहीं दिसेनासें होतें. २ या किल्ल्याच्या सभोंवार नऊ बुरुज आहेत व त्या प्रत्येक बुरुजावर एकेक तोफ तयार करून ठेवलेली असते. विषय त्या नऊहि द्वारानें तोफांचा मारा करीत असतात. ३ देहाभिमानाचा मुख्य चालक मन होय. त्याचा मारा तर फारच भयंकर असतो. तें अत्यंत दुर्जय आहे. तें मागें न हटतां सगळा किल्ला आपल्या ताब्यांत ठेवितें. ४ पण हें पाहून शत्रूहि अकस्मात माळ चढून मोठ्या त्वरेनें पुढें चाल करितो तों त्यास दहावें दारहि कपाट लावून पक्कें बंद केलेलें आढळतें. ५ अशाप्रकारें हें मन स्वतः सगळ्या किल्ल्याचें रक्षण करीत असतें. त्याचें आंतून व बाहेरून रक्षण व्हावें म्हणून तें स्वतःच घरटी बांधीत असतें. ६ कामाचा हात धरून तें शत्रूला अर्धचंद्र देतें. याप्रमाणें मुख्य पुढाऱ्यांस तें लोळवितें. मग तेथें इतरांचा काय पाड! ७ असा हा मनाचा मारा फार कठिण आहे. तें लोकांना त्रिविध तापानें जर्जर करून त्यांना कण्हण्यास लावितें. ८ देवापासून होणारा ताप आधिदैविक, मनापासून होणारा आध्यात्मिक आणि पंचमहाभूतांपासून होणारा आधिभौतिक; असे तापाचे प्रकार आहेत. ९ महाभूतें सत्त्वगुणानें अंतःकरण, रजोगुणानें इंद्रियें आणि तमोगुणानें विषयभाव प्रसवतात. ३१० या त्रिविध गुणांपासून दुसरें अनेक विकार उत्पन्न होतात. तेहि मायेचेच आहेत, असें समजावें. देहरूपी किल्ल्यावरील या जय्यद ११ सामग्रीमुळेंच हा प्रपंच इतका प्रबल झाला आहे. १२ संकल्परूपी जोराच्या वृष्टीनें वासनाजलाची टाकीं भरतात. तें जल प्राशन करून किल्ल्यांतील

आधिदैव आणि आधिभूतें । अध्यात्म तें कोण येथें । ऐक निश्चितें सांगेन ॥ १३ ॥ कोणे द्वारीं कोण यंत्र । कोण चेतविता कैसें सूत्र । कैसा होतसे विषयमार । तोही निर्धार तूं ऐक ॥ १४ ॥

दृग्रूपमार्कं वपुरत्र रन्ध्रे परस्परं सिध्यति यः स्वतः खे ।
आत्मा यदेषामपरो य आद्यः स्वयाऽनुभूत्याऽखिलसिद्धसिद्धिः
एवं त्वगादि श्रवणादि चक्षुर्जिह्वादि नासादि च चित्तयुक्तम् ॥ ३१ ॥

योऽसौ गुणाक्षोभकृतो विकारः प्रधानमूलान्महतः प्रसूतः ॥
अहं त्रिवृन्मोहविकल्पहेतुर्वैकारिकस्तामस ऐन्द्रियश्च ॥ ३२ ॥

लोक संसारांतील सुख-दुःखांचा अनुभव घेत असतात. १३ या किल्ल्यांतील जीं नवद्वारें (सु. गी. ५-१३ पृ. ११०) त्यांतील अधिदैव, अधिभूत आणि अध्यात्म कोणतें त्यांचें स्पष्टीकरण करितों, तें ऐक. १३ त्याचप्रमाणें कोणत्या दारांत कोणतें यंत्र असतें, त्यांचा चालक कोण, त्याची रचना कशी असते, त्यानें विषयांचा मारा कसा होतो, इत्यादि सर्व प्रकार सांगतों, तोहि ऐक. ३१४.

—आतां तीं अध्यात्मादि तीन रूपेंच सांगतात.

दृक् अध्यात्मं—दृक् म्ह० चक्षु हें अध्यात्म आहे. **रूपं अधिभूतं अत्र रंध्रे आर्कं वपुः अधिदैवं**—रूप अधिभूत व त्या चक्षुर्गोलकांत प्रविष्ट झालेला सूर्याचा अंश हेंच अधिदैव, (यांची परस्पर सापेक्षता सांगतात—) **परस्परं सिध्यति**—हें विविधरूप परस्परांच्या अपेक्षेनें सिद्ध होतें. [चक्षूंच्या योगानें रूप जाणलें जातें; पण चक्षूंवांचून त्याची अनुपपत्ति असल्यामुळें चक्षूची सिद्धि होते. अधिष्ठात्री देवतेवांचून चक्षूची प्रवृत्ति संभवत नसल्यामुळें त्या देवतेची सिद्धि होते. चक्षुरधिष्ठात्री देवतेच्या योगानें चक्षूंची प्रवृत्ति होते, त्यामुळें रूपज्ञान होतें. याप्रमाणें हें अध्यात्मादि रूपत्रय परपस्परांच्या अपेक्षेनें सिद्ध होतें. (येथें रंध्र या विशेषणानें व्यावर्त्य असलेलें तत्त्व दृष्टान्ताच्या उपयोगित्वानें सांगतात—) **यः खे आत्मा सः स्वतः**-पण जो आकाशांतील मंडलात्मा सूर्य तो स्वतःच सिद्ध होतो. (त्या सूर्यमंडलाला चक्षुर्विषयत्व जरी असलें तरी प्रतियोगीची अपेक्षा नसते, तेवढ्याच कारणानें त्याला स्वतः असें म्हटलें आहे. आतां आत्म्याचा विकारित्वादिकांच्या अभावामुळें भेद सांगतात—) **यत् आत्मा एषां आद्यः एकरूपः भिन्नः च**—ज्याअर्थीं आत्मा या अध्यात्मादिकांचें कारण आहे, त्याअर्थीं तो एकरूप व भिन्न आहे. **अपरः**—त्यामुळेंच तो या सर्वांहून भिन्न आहे. (स्वप्रकाशत्वामुळेंहि त्याचा भेद सांगतात—) **स्वया अनुभूत्या अखिलसिद्धसिद्धिः**—स्वतःसिद्ध प्रकाशानें सर्व परस्पर प्रकाशक पदार्थांचाहि तो प्रकाशक आहे. (सर्व पदार्थ सामान्यतः चित्प्रकाशाचे विषय होतात; त्यामुळेंच आत्म्याचें स्वप्रकाशत्व सिद्ध होतें. चक्षूमध्यें प्रदर्शित केलेल्या विविधत्वाचा इतर इंद्रियां-मध्येंहि अतिदेश करितात—) **एवं यथा चक्षुः त्वगादि श्रवणादि जिह्वादि नासादि चित्तयुक्तं च**—याप्रमाणें चक्षूला विविधत्व आहे, तसेंच त्वगादिकांनाहि आहे. जसें त्वक् स्पर्श व वायु; श्रवण-शब्द-दिशा, जिव्हा-रस-वरुण; घ्राण-गंध-अश्विनीकुमार; चित्तानें युक्त असलेलें अंतःकरणहि त्रिविध आहे. जसें— चित्त-चेतयितव्य व वासुदेव; मन-मन्तव्य व चंद्र; बुद्धि-बोद्धव्य व ब्रह्मा; अहंकार-अहंकर्तव्य व रुद्र; याप्रमाणें या सर्वांना त्रिविधत्व आहे. ३१. —'अहोपण, तुम्हीं पुनरपि वैलक्षण्य मात्र सांगितलेंत ! त्रिविध प्रपंचाहून व्यतिरिक्त असलेल्या आत्म्याची प्राप्ति कशी होते !' अहंकारनिवृत्तीनें आत्मप्राप्ति व त्रिविध भेदनिवृत्तीनेंच अहंकारनिवृत्ति होते, अशा आशयानें भगवान् म्हणतात,— **यः असौ अहं**—जो हा अहं-कार, (त्याचींच विशेषणें—) **गुणक्षोभकृतः** गुणांच्या क्षोभामुळें झालेला व, **प्रधानमूलात् महतः प्रसूतः विकारः**—काल-निमित्त परमेश्वरामुळें ज्याचें प्रधान उपादान कारण आहे, अशा महत्तत्त्वापासून उत्पन्न झालेला विकार, **त्रिवृन् मोहविकल्पहेतुः वैकारिकः तामसः ऐन्द्रियः च**-तो तीन प्रकारचा, मोहमय विकल्पाचा हेतु, विकार पावणारा, तमोगुणप्रधान व इंद्रियसंबंधी आहे. ३२.

आत्मापरिज्ञानमयो विवादो ह्यस्तीति नास्तीति भिदाऽर्थनिष्ठः ।
व्यर्थोऽपि नैवोपरमेत पुंसां मत्तः परावृत्तधियां स्वलोकात् ॥ ३३ ॥

चक्षु इंद्रिय यंत्र थोर । तेथ कामिनीरूपाचा महामार । घायें भेदिती जिव्हार । पडले सुरनर कोट्यानुकोटी ॥ १५ ॥ चक्षुगोल इंद्रिय शरीरीं । तेथ अधिदैव सूर्य अधिष्ठात्री । देखिल्या रूपाची धारणा धरी । तेंचि निजनिर्धारीं अध्यात्म ॥ १६ ॥ नीलपीतरूपीभरण । दृष्टीं देखिजे दर्शन । तेंचि अधिभूत सत्य जाण । दृश्याचें भान दृष्टींसी ॥ १७ ॥ सूर्य अधिदैव सिद्ध आहे । अधिभूत दृष्टी भरलें पाहें । शरीरीं चक्षुगोळही होये । परी अध्यात्मतेजेंवीण राहे अंधत्व ॥ १८ ॥ अधिदैव अधिभूत असतां पाहीं । अध्यात्म तेज जंव दृष्टीसी नाहीं । तंव देखणें न घडे कांहीं । अंधत्व ते ठायीं ठसावोनि ठाके ॥ १९ ॥ अध्यात्म अधिभूत दोनीं आहे । जैं अधिदैव सूर्य अस्ता जाये । तैं दृष्टीचें देखणें ठाये । स्तब्धत्वें राहे तमामाजीं ॥ ३२० ॥ ते काळीं दृष्टीसी पाहें । स्नेहसूत्र मेळवून लाहे । अग्नि जरी केला साह्ये । तरी प्रकाशू नोहे रवीऐसा ॥ २१ ॥ तेथ चंद्रोदयो जरी जाहला । तो सूर्यसमान नाहीं आला । निशा निरसूनि दृष्टीं साह्य जाहला । यालागीं सूर्य बोलिला अधिदैव ॥ २२ ॥ अध्यात्म अधिभूत असतां पाहीं । अधिदैव सूर्य जेथ नाहीं । तेथ दृष्टीचें न चले कांहीं । तुज म्यां तेंही सांगीतलें ॥ २३ ॥ अध्यात्म अधिदैव दोनी आहे । अधिभूत दृश्यदर्शन राहे । तैं सत्य ब्रह्मज्ञान होये । जैं गुरुकृपा पाहे

त्याची निवृत्ति कशी होते ! उत्तर—तो आत्म्याच्या अज्ञानाचें कार्य असल्यामुळें आत्मज्ञानानें त्याची निवृत्ति होते; (अशा आशयानें भगवान् म्हणतात) **आत्मापरिज्ञानमयः**—तो आत्म्याच्या अज्ञानाचा परिणाम आहे [—' अहोपण, भेद व अहंकार यांच्या सत्यत्वाचा अंगीकार पुष्कळांनीं केला आहे, तेव्हां त्याला मोहमयत्व कसें ! ' उत्तर—] **हि अस्ति इति नास्ति इति भिदा स्वलोकात् मत्तः परावृत्तधियां पुंसां अर्थनिष्ठः विवादः व्यर्थः अपि न एव उपरमेत**—तो आहे व नाहीं, अशा भेदामुळें, मद्रूप आत्मलोकापासून ज्यांची बुद्धि बहिर्मुख झाली आहे, अशा पुरुषांचा विषयांविषयींचा विवादहि आत्म्याच्या अज्ञानाचाच परिणाम आहे. (किंवा सर्व विवाद भेदनिष्ठच आहे. वस्तूंशीं त्याचा संबंध नाहीं. अर्थात् वाद्यांच्या परस्पर युक्तींनींच त्याचें निराकरण झालेलें असल्यामुळें मोहमयत्व सिद्ध होतें. ' अहोपण, जर अहंकार व विकल्प मुळीं नाहींच, तर त्यांच्या निवृत्तीसाठीं प्रयास करणें व्यर्थ आहे, अशी आशंका घेऊन सांगतात—) आत्मबहिर्मुख झालेल्या पुरुषांचा तो विवाद जरी व्यर्थ आहे, तरी केव्हांहि निवृत्त होत नाहीं. [उलट त्यांनीं केलेल्या कर्मांच्या योगानें ते उच्च-नीच देहांमध्यें संसार करितात.] ३३.

चक्षु हें इंद्रिय एक मोठी तोफ आहे. ती कामिनीरूपाचा भडिमार करिते. त्या प्रहारानें चित्ताला मर्मभेदक जखम होते. त्यामुळें कोट्यवधि देव-दानव त्या नेत्रकटाक्षांच्या मारानें घायाळ होऊन पडतात. १५ नेत्राचे गोलक शरीरांत असून सूर्य त्याची अधिष्ठात्री देवता आहे. म्हणून पाहिलेल्या रूपाचें तें ग्रहण करितें. तेंच खरोखर अध्यात्म होय. १६ दृष्टीला निळें-पिवळें इत्यादि रूपांचा जो भास होतो व तिला जें दृश्य दिसतें, तें अधिभूत समजावें. १७ अधिदैव सूर्य सिद्ध आहे दृष्टीसमोर अधिभूत ठेविलें आहे, व देहांत नेत्राचे गोलकहि आहेत, पण त्यांत जर अध्यात्म तेज नसलें तर त्या दृष्टीला अंधत्व येतें. १८ अधिदैव आणि अधिभूत असूनहि जोंपर्यंत अध्यात्मतेज नाहीं, तोंपर्यंत कांहींच दिसत नाहीं. अंधत्व तसेंच कायम रहातें १९ किंवा अध्यात्म व अधिभूत हीं दोन्हीं असलीं व दृष्टींत अध्यात्म तेज नसलें तर त्याला कांहीं दिसत नाहीं. पूर्ण अंधत्व त्याच्यामध्यें ठसतें. अध्यात्म व अधिभूत हीं दोन असलीं आणि अधिदैवत सूर्य मावळला तर नेत्रांचें पहाणें अंधारांत लुप्त होतें. ३२० त्यावेळीं पदार्थ दृष्टीस पडावेत म्हणून तेल-वात घालून अग्नि लावून दिवा पेटविला तरी त्याचा सूर्यासारखा प्रकाश पडत नाहीं २१ किंवा चंद्रोदय झाला तरी तोहि सूर्यप्रकाशाची बरोबरी करूं शकत नाहीं. रात्रीचा अंधार घालवून सूर्य दृष्टीला साह्य करितो, म्हणून त्याला अधिदैव म्हणतात. २२ अध्यात्म व अधिभूत हे दोन असून अधिदैव सूर्य जर तेथें नसेल तर तेथें नेत्रांचें कांहीं चालत नाहीं, हें मीं तुला सांगितलें. २३ अध्यात्म, अधिदैव हीं दोन्ही असून सद्गुरूची जेव्हां पूर्ण कृपा होते व अधिभूतांचें दृश्य-दर्शन खुंटतें, तेव्हांच खरें ब्रह्मज्ञान होतें. २४ येथें जें

पूर्णांशें ॥ २४ ॥ येथ जे दृश्याचें दर्शन । तेणें देहबुद्धि दृढ जाण । तें दृश्याचें पुशिल्या भान । होय देहेंशीं शून्य संसार ॥ २५ ॥ अधिदैवें अध्यात्म अधिभूत । त्रिपुटी बोलिजे हे येथ । तुज म्यां सांगीतली साद्यंत । जाण निश्चित विभाग ॥ २६ ॥ येथूनि त्रिपुटीचें विंदान । दृश्य द्रष्टा आणि दर्शन । कर्म कर्ता क्रियाचरण । ध्येय ध्यान ध्यातृत्व ॥ २७ ॥ त्रिपुटी म्हणावयाचें कारण । परस्परें सापेक्षपण । तें अपेक्षेचें लक्षण । ऐक संपूर्ण सांगेन ॥ २८ ॥ नानाकारें अतिविलास । येथ देखणी दृष्टी डोळस । तेही सूर्येंवीण वोस । हा अनुप्रवेश परस्परें ॥ २९ ॥ सूर्य आहे डोळा नाहीं । तेथ पाहणें न चले पाहीं । हो कां डोळा आहे सूर्य नाहीं । तेथें दृष्टीचें कांहीं चालेना ॥ ३३० ॥ सूर्य आणि दृष्टी दोनी आहे । परी दृश्य जें नाहीं होये । तैं दोहींचें सामर्थ्य राहे । देखावें काये दृष्टीनें ॥ ३१ ॥ सूर्य प्रकाशी रूपासी । दृष्टींसी रिघोनियां स्वांशेंसीं । दाखवी नाना आकारांसी । परस्परानुप्रवेशीं बोलिजे सिद्धी ॥ ३२ ॥ इतुकें करोनियां सविता । नभोमंडळीं अलिप्तता । तेवीं जगदाकारें चेतविता । अलिप्त तत्त्वतां चिदात्मा ॥ ३३ ॥ जो जगामाजीं भरला राहे । जगाचा हृदयस्थही होये । जग जरी होये जाये । परी तो आहे जैसातैसा ॥ ३४ ॥ जेवीं आकाश अभ्यंतरीं । होतां घटाकाश सहस्रवरी । आकाश त्या घटाभीतरीं । प्रत्यक्षाकारीं भरलें दिसे ॥ ३५ ॥ ते घटचि होती जाती । परी आकाश सहजस्थिती । तेवीं उत्पत्तिस्थितिअंतीं । अलिप्त श्रीपति चिदात्मा ॥ ३६ ॥ तो आदीची अनादि आदि । तो बुद्धीची अनादि बुद्धी । तो सिद्धींची अनादि सिद्धी । जाण त्रिशुद्धी परमात्मा ॥ ३७ ॥ हा प्रकाशा प्रकाशक । अर्काचाही आदि अर्क । स्वयें त्रिपुटीचा द्योतक । अलिप्त एक परमात्मा ॥ ३८ ॥ हा विवेकाचाही विवेक । हा सुखाचा सुखदायक । बुद्धीचा जो बोधक । प्रकाशा प्रकाशक परमात्मा ॥ ३९ ॥ त्यासी जाणों जातां जाणपणें । वेदांसी जाहलें लाजिरवाणें । वेडावलीं स्मृतिपुराणें । न कळे शास्त्रपठणें भांडतां ॥ ३४० ॥ देवो देवी

दृश्याचें दर्शन होतें त्यामुळेंच देहात्मबुद्धि दृढ होते. तें दृश्याचें भान नाहींसें झालें म्हणजे देहासह सर्व संसार शून्य वाटूं लागतो. २५ अधिदैव, अध्यात्म व अधिभूत ही जी त्रिपुटी म्हणतात ती मीं तुला सविस्तर सांगितली. २६ यावरून दृश्य-द्रष्टा-दर्शन; कर्म-कर्ता-कर्माचरण; ध्येय-ध्यान-ध्याता २७ हेंच त्रिपुटीचें स्वरूप आहे. तीं परस्परांच्या अपेक्षेनें रहातात म्हणून त्यांस त्रिपुटी म्हणतात. त्यांच्या अपेक्षेचें लक्षण तुला सविस्तर सांगतों, तें ऐक. २८ नानाप्रकारचे विलास पहाण्यास दृष्टि समर्थ असते; पण सूर्यावांचून ती व्यर्थ आहे. आहे त्यांचा परस्परसंबंध आहे. २९ सूर्य आहे आणि डोळा नसला तर तेथेंहि पहातां येत नाहीं. बरें, सूर्य नसला व डोळा असला तरीहि कांहीं दिसत नाहीं. ३३० किंवा सूर्य व नेत्र दोन्ही असले व पहावयास कांहींच पदार्थ नसला तर त्या दोहोंचेंहि सामर्थ्य व्यर्थच ठरतें. कारण नेत्रानें काय पहावयाचें ! ३१ यावरून सूर्य स्वरूपावर प्रकाश पाडतो आणि आपल्या किरणानें दृष्टींत प्रवेश करून नाना प्रकारचे आकार दाखवितो. म्हणून ही त्रिपुटी परस्परावलंबी आहे. ३२ इतकेंहि करून हा सूर्य अलिप्तपणानें आकाशांत रहातो. ३३ त्याचप्रमाणें हा जो सगळ्या विश्वाला व्यापून रहाणारा, सर्वांच्या हृदयांत वसणारा, जगाची उत्पत्ति व नाश जरी झाला तरी निर्विकार असणारा परमात्मा तो या सगळ्या सृष्टीला चेतना देऊन स्वतः अलिप्तच असतो. ३४ आकाशांत हजारों घटाकाश निर्माण झाले तरी त्या घटांमध्यें आकाश आपल्या स्वरूपांत स्थित असतेंच. ३५ ते घट उत्पन्न होतात व नाश पावतात. परंतु त्यांतील आकाश जसें आपल्या स्वरूपांत कायम असतें, त्याप्रमाणें सृष्टीच्या उत्पत्ति-स्थिति-लय या तीन्ही अवस्थांमध्यें तो श्रीपति परमात्मा अलिप्त रहातो. ३६ तो परमात्मा आदीचाहि अनादि आदि आहे. बुद्धीचा अनादि बुद्धि व सिद्धीचा अनादि सिद्धि आहे. ३७ प्रकाशाला प्रकाश देणारा, सूर्याचाहि आदि सूर्य, त्रिपुटीला प्रकाशित करणारा हा परमात्मा एकच असून तो या सर्वांहून अलिप्त असतो. ३८ हा परमात्मा ज्ञानाचेंहि ज्ञान, सुखाचाहि सुखदाता, बुद्धीचा बोधक, प्रकाशाचा प्रकाशक आहे. ३९ ज्ञानाभिमानानें त्याला जाणण्यास गेलेले वेदहि लज्जित झाले. स्मृति-पुराणें वेडीं झालीं. शास्त्रपठनानें वाद-विवाद करूनहि तो कळत नाहीं. ३४० देव, देवी आणि देवता; भोग्य, भोग आणि

आणि देवता । भोग्य भोग आणि भोक्ता । नाना त्रिपुटींची त्रिगुणता । जाण सर्वथा प्रकृतीचि हे ॥ ४१ ॥ हा आद्य अव्यक्त अतर्क्य । प्रकृतिपुरुष परमात्मा एक । यासी जाणावया विवेक । न चले देख आणिकांचा ॥ ४२ ॥ याचेनि हा हृदयीं देखिजे । याचेनि हा इत्थंभूत जाणिजे । यातें धरोनि हा पाविजे । हेंही लाहिजे कृपें याचेनि ॥ ४३ ॥ हा स्वप्रकाश सहज निजें । यासी प्रकाशी ऐसें नाहीं दुजें । याचेनि प्रकाशें हा देखिजे । याचेनि होइजे याऐसें ॥ ४४ ॥ अधिदैव अध्यात्म आधिभूत । नेत्रद्वारा सांगितलें तेथ । तैसेंच अन्य इंद्रियीं व्यावृत्त । देव सांगत संकलितें ॥ ४५ ॥

प्रधानापासाव महदादिद्वारा । नाना विकारांचा पसारा । गुणक्षोभें क्षोभूनि पुरा । उठिला उभारा त्रिपुटीरूपें ॥ ४६ ॥ जेवीं सूर्यें चक्षुरादि विंदान । तैसेंचि श्रोत्र त्वचा रसना घ्राण । हें ज्ञानेंद्रियपंचक जाण । याचें कर्म समान त्रिपुटीरूपें ॥ ४७ ॥ येथ कर्मेंद्रियें पांच आन । तीं ज्ञानेंद्रियां अधीन । हस्त पाद गुद शिश्न । वाचा जाण पांचवी ॥ ४८ ॥ त्यांसी ज्ञानेंद्रियें प्रेरिती । तैं कर्मेंद्रियें कर्मीं वर्तती । एवं उभयपंचकस्थिती । जाण निश्चितीं दशेंद्रियें ॥ ४९ ॥ चित्तचतुष्टयचमत्कार । मन बुद्धि चित्त अहंकार । हीं एकचि परी भिन्न प्रकार । जैसा व्यापार तैसें नांव ॥ ३५० ॥ केवळ देहाकारें मीपण । तो सबळ अहंकार जाण । संकल्प-विकल्प जे गहन । तेंचि मन उद्धवा ॥ ५१ ॥ गतभोगाचें जें चिंतन । तें चित्ताचें लक्षण । केवळ निश्चयात्मक जाण । बुद्धि संपूर्ण ती नांव ॥ ५२ ॥ हें गुणक्षोभाचें लक्षण । भोगसाधनें भोग्य जाण । त्याहूनि भोक्ता तो भिन्न । तेंही उपलक्षण अवधारीं ॥ ५३ ॥ त्वगिंद्रियीं विषयस्पर्शन । तेथें अधिदैव वायु जाण । त्याहूनि परमात्मा भिन्न । चित्स्वरूपें जाण अविकारी ॥ ५४ ॥ गंधविषयो घ्राणेंद्रियें । तेथ अधिदैव अश्विनौदेव होये । आत्मा त्याहूनि वेगळा पाहें । चित्स्वरूपें राहे अ-

---

भोक्ता; अशी जी नानाप्रकारची त्रिपुटी उत्पन्न होते, ती प्रकृतीच होय. ४१ हा परमात्मा आद्य, अव्यक्त, अतर्क्य व प्रकृतीहून भिन्न आहे. त्याला जाणावयास इतर कोणाचीहि मति चालत नाहीं. ४२ याच्याच सामर्थ्यानें त्याला हृदयांत पहावें. याच्याच योगें त्याला पूर्णपणें जाणावें. याच्याच साह्यानें त्याला प्रसन्न करावें व ती प्रसन्नताहि याच्याच कृपेनें मिळवावी. ४३ हा स्वभावतःच स्वयंप्रकाश आहे. याला प्रकाशित करणारें दुसरें कोणी नाहीं. याच्याच प्रकाशानें याला पहावें व याच्याच योगें तद्रूप व्हावें. ४४ याप्रमाणें अधिदैव, अध्यात्म व अधिभूत यांचें नेत्रद्वारां वर्णन केलें. त्याचप्रमाणें इतर इंद्रियांतहि तीं कशी व्यापून रहातात, तेंहि श्रीकृष्ण आतां संक्षेपानें सांगत आहे. ३४५.

प्रकृतीपासूनच महत्तत्त्वादिद्वारां नानाप्रकारचे विकार पसरतात आणि गुणांचा क्षोभ झाल्यामुळें ते विकार पूर्णपणें खवळतात व त्रिपुटीरूपानें प्रबल होतात. ४६ ज्याप्रमाणें सूर्याच्या योगें नेत्रादिकांचे व्यापार चालतात, त्याचप्रमाणें श्रोत्र, त्वक्, रसन व घ्राण या ज्ञानेंद्रियपंचकांचें कार्यहि त्रिपुटीच्या रूपानेंच घडतें. ४७ त्यांत असलेलीं दुसरीं हस्तपादादि (पांच कर्मेंद्रियें) या पांच ज्ञानेंद्रियांच्या अधीन असतात. ४८ त्यांना ज्ञानेंद्रियें जेव्हां प्रेरणा करितात तेव्हांच तीं कर्मांत प्रवृत्त होतात. पांच ज्ञानेंद्रियें व पांच कर्मेंद्रियें अशीं पंचकें मिळून दहा इंद्रियें होतात, असें निश्चित जाणावें. ४९ मन, बुद्धि, चित्त व अहंकार हीं सर्व एकाचींच नांवें चित्ताच्या निरनिराळ्या कार्यांवरून पडलीं आहेत, जसें ज्याचें कार्य तसें त्याला नांव प्राप्त झालें. म्हणून त्याला ‘ चित्तचतुष्टयचमत्कार ’ असें म्हणतात. ३५० हे उद्धवा ! केवळ देहाकारावर जो ‘ मी-’ पणा उत्पन्न होतो, तोच प्रबल अहंकार होय; गहन संकल्पविकल्प करणारें मन होय; ५१ पूर्वींच्या भोगाचें स्मरण करणारें चित्त होय आणि दृढ निश्चय करणारी बुद्धि होय. ५२ हें गुणक्षोभाचें लक्षण भोगाच्या साधनानें भोग्य होतें. परंतु भोक्ता यांहून भिन्न असतो. त्याचेंहि लक्षण सांगतों, ऐक. ५३ त्वचेला जो विषयांचा स्पर्श होतो, तेथें वायु अधिदैव असतो. अविकारी (परमात्मा) चैतन्यरूपानें त्याहून भिन्न असतो. ५४ गंध हा विषय घ्राणेंद्रियानें कळतो; तेथें अश्विनीकुमार अधिदैव असतात. पण आत्मा त्याहून भिन्न असून

विकारी ॥ ५५ ॥ रसनेंद्रिय अतिगहन । रस विषयो तेथील जाण । वरुण अधिदैवत आपण । आत्मा स्वानंदपूर्ण रसातीत ॥ ५६ ॥ श्रवणेंद्रियीं विषयो शब्द । तेथ दिशा अधिदैव प्रसिद्ध । शब्दीं निजात्मा निःशब्द । चिद्‌त्वें शुद्ध अविकारी ॥ ५७ ॥ चक्षुरिंद्रियलक्षण । पूर्वीं निरूपिलें जाण । हें ज्ञानेंद्रियविंदान । त्रिपुटी संपूर्ण ऐशा रीतीं ॥ ५८ ॥ चित्त इंद्रिय जें कां येथ । चिंतन विषयो त्यासी प्राप्त । वासुदेव अधिदैवत । आत्मा अलिप्त चित्तेंसीं ॥ ५९ ॥ मनेंद्रिय अतिचपळ । संकल्प विषयो त्याचा प्रबळ । तेथ अधिदैव चंद्र निर्मळ । आत्मा केवळ मनातीत ॥ ३६० ॥ अहंकार इंद्रिय कठिण । तेथील विषयो मीपण । रुद्र अधिदैवत जाण । परमात्मा भिन्न अहंकारेंसीं ॥ ६१ ॥ बुद्धींद्रिय अतिसज्ञान । बोद्धव्य तेथींचा विषयो जाण । ब्रह्मा अधिदैवत आपण । आत्मा चिद्घन बुद्ध्यतीत ॥ ६२ ॥ चित्तचतुष्टय सकारण । त्रिपुटी सांगीतली हे संपूर्ण जाण । आतां कर्मेंद्रियांचें लक्षण । ऐक संपूर्ण सांगेन ॥ ६३ ॥ वागिंद्रियीं वाच्य विषयो । अग्नि अधिदैवत तेथील पहा हो । तेथ सरस्वती शक्तीचा निर्वाहो । यासी अलिप्त देवो महामौनें ॥ ६४ ॥ पाणींद्रियीं ग्रहण विषयो । इंद्र अधिदैवत तेथील पहा हो । तेथ क्रिया-शक्तीचा निर्वाहो । यासी अलिप्त देवो अक्रियत्वें ॥ ६५ ॥ पादेंद्रियीं गति विषयो । तेथें उपेंद्र अधि-दैवो । तेथें गमनशक्तीचा निर्वाहो । यासी अलिप्त देवो निश्चलत्वें ॥ ६६ ॥ गुदेंद्रियीं विसर्ग विषयो । निर्ऋति अधिदैवत तेथील पहा हो । क्षरशक्तीचा तेथ निर्वाहो । त्यासी अलिप्त देवो अक्षरत्वें ॥ ६७ ॥ शिश्नेंद्रियीं रति विषयो । प्रजापति तेथें अधिदैवो । आनंदशक्तीचा तेथें निर्वाहो । त्यासी अलिप्त देवो परमानंदें ॥ ६८ ॥ ज्ञानकर्मेंद्रियें कर्माचरण । चित्तचतुष्टयाचें लक्षण । हें गुणक्षोभाचें कारण । समूळ जाण मायिक ॥ ६९ ॥ तेंचि गुणक्षोभाचें प्रधान मूळ । प्रकृतिविकारें होय स्थूळ । आत्मा अविकारी

तो ज्ञानस्वरूपानें अधिकारी असतो. ५५ रसनेंद्रिय फार गूढ आहे. रस हा त्याचा विषय शब्द आहे. त्याचें अधिदैवत वरुण आहे. पण स्वानंदपूर्ण आत्मा त्या रसाच्या पलीकडे असतो. ५६ श्रवणेंद्रियाचा विषय शब्द आहे. त्याचें अधिदैवत दिशा प्रसिद्धच आहे. त्या शब्दांत निःशब्द असलेला आत्मा शुद्ध अधिकारी आणि चित्स्वरूप आहे. ५७ नेत्रेंद्रियाचें लक्षण पूर्वीं सांगितलेंच आहे. ज्ञानेंद्रियांचा प्रकार हा असा आहे. अशाप्रकारें सर्व त्रिपुटी निर्माण होतात. ५८ यांत 'चित्त-' नांवाचें जें इंद्रिय सांगितलें आहे, त्याचा चिंतन हा विषय आहे. वासुदेव त्याचें अधिदैवत आहे. आत्मा चित्तापासून अलिप्त आहे. ५९ 'मन' हें इंद्रिय अत्यंत चंचल आहे. 'संकल्प' हा त्याचा विषय अत्यंत प्रबल आहे. 'चंद्र' हें त्याचें निर्मल अधिदैव आहे. पण आत्मा मनाच्या अतीत आहे. ३६० 'अहंकार' हें इंद्रिय अतिशय कठिण आहे. 'मी-' पणा हा त्याचा विषय आहे. तमोगुणाची देवता रुद्र हें त्याचें अधिदैवत आहे. पण परमात्मा अहंकाराहून भिन्न आहे. ६१ 'बुद्धि' हें इंद्रिय अतिशय ज्ञानयुक्त आहे. 'जाणणें' हा त्याचा विषय आहे. ब्रह्मदेव त्याचें अधिदैवत आहे; पण ज्ञानस्वरूप आत्मा बुद्धीहूनहि भिन्न आहे. ६२ याप्रमाणें कारणासह मीं तुला चित्तचतुष्टय व त्रिपुटीचें लक्षण सांगि-तलें. आतां कर्मेंद्रियांचें लक्षण सविस्तर सांगतों, तें ऐक. ६३ वागिंद्रियाचा वाच्य हा विषय असून अग्नि त्याचें अधिदैवत आहे. तेथें सरस्वतीची शक्ति वास करिते; परंतु आत्माराम महामौनानें त्यापासून अलिप्तच रहातो. ६४ 'हात' या इंद्रियाचा 'ग्रहण करणें' हा विषय आहे. इंद्र त्याचें अधिदैवत आहे. तेथें क्रियाशक्ति रहाते व देव अक्रियत्वानें अलिप्तच असतो. ६५ 'पाय' या इंद्रियाचा विषय गति असून उपेंद्र त्याचें अधिदैव आहे. तेथें गमन-शक्तीचें वास्तव्य असून देव निश्चल असल्यामुळें त्याहूनहि भिन्न आहे. ६६ पुढील दोन्ही गुह्य इंद्रियांचे विषय मलोत्सर्ग व रति हे आहेत. निर्ऋति आणि प्रजापति हे क्रमानें त्यांचें अधिदैवत आहेत. क्षरशक्ति व आनंदशक्ति या अनुक्रमें तेथें रहातात. परंतु अक्षर व परमानंदस्वरूप असा परमात्मा त्या दोहोंच्याहि अतीत असतो. ६७–६८ ज्ञानेंद्रियें व कर्मेंद्रियें यांच्या योगानें कर्माचरण घडतें. तेंच चित्तचतुष्ट्याचें लक्षण होय. तेंच गुणक्षोभाचेंहि कारण असल्यामुळें तें सगळेंच मायिक आहे. ६९ तेंच गुणक्षोभाचें मुख्य मूळ, प्रकृतीच्या विकारानें जडरूप होतें. आणि

निर्मळ । अलिप्त केवळ प्रकृतीसी ॥ ३७० ॥ जेवीं वृत्तिभूमीसमवेत । गृहीं गृहसामग्री समस्त । अभिमानें उपार्जी गृहस्थ । परी तो त्याअतीत आपण जैसा ॥ ७१ ॥ तेवीं त्रिगुणक्षोभें अभिमान । वाढवी नाना विकारवन । आत्मा वसंत तो भिन्न । तेंचि निरूपण हरि बोले ॥ ७२ ॥

अहंअध्यासें संसारप्राप्ती । जीवासी लागली निश्चितीं । त्या अहंकाराचे निवृत्ती । भवनिर्मुक्ती जीवासी ॥ ७३ ॥ ऐसा बाधकत्वें दुर्धर । कैंचा उठिला अहंकार । हाही पुसों पाहसी विचार । ऐक साचार सांगेन ॥ ७४ ॥ स्वस्वरूपातें विसरून । दृढ जें स्फुरे मीपण । तोचि अहंकार जाण । विकारें त्रिगुणक्षोभक ॥ ७५ ॥ जागृतीचा जो विसरू । तोचि स्वप्नसृष्टीचा विस्तारू । वस्तुविमुख जो अहंकारू । तोचि संसारू त्रिगुणात्मक ॥ ७६ ॥ विकारें क्षोभती तिन्ही गुण । हें विस्मरण मोहाचें लक्षण । तेणें विकारले तीन गुण । विभाग भिन्न अवधारीं ॥ ७७ ॥ मूळीं बोलिला वैकारिकू । तो अहंकार जाण सात्विकू । तो चित्तचतुष्टयद्योतकू । होय प्रकाशकू अधिदैवें ॥ ७८ ॥ सत्वापासोनि उपजे मन । मनापासाव विकार गहन । यालागीं वैकारिक जाण । सत्वगुण बोलिजे ॥ ७९ ॥ ज्ञान कर्म उभय पंचक । इंद्रियांचा दशक । जाहला रजोगुणद्योतक । यालागीं ऐंद्रियक म्हणिपे त्यासी ॥ ३८० ॥ तामस गुण जो कां येथें । आकाशादि पंचीकृतें । आवरणरूपें महाभूतें । विषयसमवेतें उपजवी ॥ ८१ ॥ महाभूतें विषयपंचक । झाला तमोगुण प्रकाशक । यालागीं भूतादि देख । यासी आवश्यक बोलिजे ॥ ८२ ॥ एवं त्रिगुणगुणविकारें । काम्यकर्मसंस्कारें । सबळ होऊनि अहंकारें । संसारीं संचरे नाना हेतु ॥ ८३ ॥ या प्रकृतिविकारांपासून । आत्मा अतिशयें भिन्न । जेवीं मृगजळातें भरून । अलिप्त भानू नभामार्जी ॥ ८४ ॥ जैसा प्रकाशोनि सर्पाकार । सर्पासी नातळे स्वयें दोर । तेवीं प्रकाशोनि संसार । निःसंग निर्विकार

आत्मा अविकारी व शुद्ध असल्यामुळें प्रकृतीपासून अलिप्त रहातो. ३७० ज्याप्रमाणें एखादा गृहस्थ वडिलोपार्जित भूमीसह सर्व साहित्य मोठ्या अभिमानानें घरांत संपादन करून ठेवितो, पण तो स्वतः मात्र त्याहून भिन्न असतो, ७१ त्याप्रमाणें त्रिगुणांच्या क्षोभानें हा अभिमान नानाप्रकारच्या विकारांचें रान माजवितो. परंतु आत्मरूपी वसंतऋतु त्याहून अगदीं भिन्न असतो. तेंच निरूपण श्रीकृष्ण आतां करीत आहे. ३७२.

'हा मी, हें माझें' अशा नित्य चिंतनानें जीवाच्या मागें हा संसार लागला आहे. तो अहंकार नाहींसा झाला कीं, जीव संसारांतून मुक्त होतो. ७३ असा हा भयंकर पीडा देणारा अहंकार कोठून निर्माण झाला! असें जर विचारशील तर त्याचेंहि स्पष्टीकरण करितों, ऐक! ७४ आत्मस्वरूपाला विसरून जो दृढ 'मीपणा' स्फुरतो तोच अहंकार होय. त्याच्या विकारानें त्रिगुणांचा क्षोभ होतो. ७५ जागृतीचें जें विस्मरण तोच स्वप्नसृष्टीचा विस्तार होय. आत्मस्वरूपाला विसरणारा जो अहंकार तोच त्रिगुणात्मक संसार होय. ७६ विकारामुळें त्रिगुणांचा क्षोभ होतो. आत्मस्वरूपाचा विसर पडणें हेंच मोहाचें लक्षण होय. ज्यायोगें त्रिगुण विकारयुक्त होतात, ते त्याचे भिन्न विभाग सांगतों, ऐक. ७७ मूळ श्लोकांत 'वैकारिक' म्ह० विकृत म्हटलें आहे. तोच सात्त्विक अहंकार होय. तो मन, बुद्धि, चित्त व अहंकार या चतुष्टयाचा व अधिदैवाचाहि प्रकाशक आहे. ७८ सत्त्वगुणापासून मन उत्पन्न होतें. मनापासून प्रबल विकार उपजतात. यास्तव सत्त्वगुणाला 'वैकारिक' म्हटलें आहे. ७९ ज्ञानेंद्रियें व कर्मेंद्रियें या दोहोंचीं पंचकें मिळून दहा इंद्रियें होतात. त्यांना रजोगुण प्रकाशित करितो, म्हणून त्यास इंद्रियसंबंधी म्हणतात. ३८० यांत जो तमोगुण आहे तो भूतांच्या पंचीकरणापासून उत्पन्न होतो. ८१ महाभूतें आणि पांच विषय यांचा प्रकाशक तमोगुण आहे, म्हणून त्याला भूतादि असें म्हणतात. ८२ याप्रमाणें त्रिगुणांच्या विकारानें आणि काम्य कर्मांच्या संस्कारानें अहंकार प्रबल होऊन तो अनेक हेतूंनीं संसारांत भ्रमण करीत असतो. ८३ सूर्य आपल्या किरणांनीं मृगजल निर्माण करून आकाशांत असा अलिप्तपणानें रहातो, तसा हा आत्मा प्रकृतीच्या विकाराहून अत्यंत विलक्षण व भिन्न आहे. ८४ किंवा सर्पाकाराचा भ्रम उत्पन्न करून दोर जसा सर्पाला स्पर्शहि करीत नाहीं तसा आत्मा संसाराला प्रकाशित करून स्वतः निःसंग व निर्विकारच रहातो. ८५ स्फटिक असा काळ्या, पिवळ्या, तांबड्या, पांढ्या पदार्थांवर

निजात्मा ॥ ८५ ॥ जेवीं कृष्ण पीत रक्त श्वेत । स्फटिक ठेवितां तेथतेथ । जरी तदाकार भासत । तरी तो अलिप्त शुद्धत्वें ॥ ८६ ॥ तैसा गुणसंगें जीवात्मा बद्ध । दिसे तरी तो अतिशुद्ध । हा नेणोनियां निजबोध । करिती विवाद मतवादी ॥ ८७ ॥ एक म्हणती आत्मा देही । एक म्हणती तो विदेही । एक म्हणती आत्म्याच्या ठायीं । हे दोन्ही नाहीं सर्वथा ॥ ८८ ॥ एक म्हणती आत्मा सगुण । एक म्हणती तो गुणविहीन । एक म्हणती ते वेगळी खूण । सगुण निर्गुण परमात्मा ॥ ८९ ॥ एक प्रतिपादिती भेद । एक प्रतिपादिती अभेद । म्हणती दोन्ही अबद्ध । आमुचें मत शुद्ध देहात्मवादू ॥ ३९० ॥ एक म्हणती हें मिथ्याभूत । प्रत्यक्ष दिसताहे जो येथ । तो प्रपंच मानिती सत्य । हेंचि मत एकांचें ॥ ९१ ॥ ऐसे भेदवाद सकळ । विचारितां अज्ञानमूळ । आत्मा चिन्मात्र केवळ । भेदातें समूळ छेदक ॥ ९२ ॥ 'आत्मा परिज्ञानमय' शुद्ध । हें श्लोकींचें मूळ पद । तेणें निरसे अज्ञानभेद । आत्मा शुद्ध बुद्ध चिदात्मा ॥ ९३ ॥ जेवीं सनक्षत्र रजनी । निवटीत प्रकटे तरणी । तेवीं सभेद कार्य निरसूनि । प्रकट चित्किरणीं चिद्भानू ॥ ९४ ॥ तेथ गुणेंसीं माया उडे । भेदासहित वाद बुडे । मूळासह अज्ञान खुडे । चहूंकडे सच्चिदानंद ॥ ९५ ॥ आत्मा सच्चिदानंद पूर्ण । तेथ सकळ मिथ्या अज्ञान । तें अज्ञाननिरासीं साधन । विवेक सांख्यज्ञान व्यर्थ दिसे ॥ ९६ ॥ तेचि विषयींचें निरूपण । श्लोकार्धें सुलक्षण । स्वयें सांगताहे श्रीकृष्ण । साध्यसाधनविभाग ॥ ९७ ॥

मूळीं समूळ मिथ्या अज्ञान । अज्ञानजन्य विषयभान । तें देखोनि भुलले जन । पडिलें विस्मरण स्वस्वरूपीं ॥ ९८ ॥ मी परमात्मा हृदयस्थ सन्निधी । त्या मजपासोनि उपरमे बुद्धी । मग विषयासक्ति त्रिशुद्धी । आवडे उपाधी देह गेह दारा ॥ ९९ ॥ जें स्वस्वरूपाचें विस्मरण । तें वाढवी तीव्र विषयध्यान ।

ठेविला असतां त्या त्या रंगाचा व त्या त्या आकाराचा दिसतो, पण वास्तविक तो स्वच्छच असतो; ८६ तसा जीवात्मा अत्यंत निर्मळ असल्यामुळें गुणसंगानें जरी बद्ध झालेला भासला तरी तो स्वरूपतः अत्यंत शुद्धच आहे. परंतु हें न जाणतां निरनिराळे मतवादी आत्मतत्त्वाविषयीं व्यर्थ वाद करीत बसतात. ८७ एक म्हणतो, आत्मा देहवान् आहे, दुसरा म्हणतो तो देहरहित आहे, तर तिसरा सांगतो कीं, आत्मा देही व विदेही दोन्ही नाहीं! ८८ कोणी म्हणतो आत्मा सगुण आहे, तर कोणी सांगतो तो निर्गुण आहे! कोणी म्हणतात आत्म्याची खूण वेगळीच आहे. परमात्मा सगुण व निर्गुण दोन्ही आहे. ८९ एकजण द्वैताचें प्रतिपादन करितो तर दुसरा अद्वैत सिद्ध करितो. तर तिसरा तीं दोन्हीं मतें खोटीं ठरवून देहात्मवादालाच सत्य म्हणतो! ३९० कोणी म्हणतो हें सगळेंच मिथ्या आहे. प्रत्यक्ष दिसणारा प्रपंच तेवढा सत्य आहे. ९१ असे जे मतांचे निरनिराळे प्रकार आहेत, त्यांचा विचार केला असतां तीं सर्व मतें अज्ञानमूलकच ठरतात. केवल चैतन्यरूप आत्मा सगळ्या भेदाचा छेद करणारा आहे. ९२ आत्मा 'परिज्ञानमय' म्ह० ज्ञानस्वरूप आहे. हेंच मूळ श्लोकांतील शुद्ध पद आहे. त्याच्यायोगें सर्व अज्ञानमूलक भेदाचें निरसन होतें व आत्मा शुद्ध, बुद्ध व चित्स्वरूप आहे, हें सिद्ध होतें. ९३ रात्रीला नक्षत्रासह लोपवून सूर्य जसा प्रकट होतो, तसा भेदासह सर्व कार्यांचा लोप करून ज्ञानरूपी किरणानें हा ज्ञानसूर्य व्यक्त होतो. ९४ त्यावेळीं त्रिगुणांसह माया लीन होते, भेदासह सगळे वाद बुडून जातात, अज्ञान समूळ खुंटतें आणि चहूंकडे सच्चिदानंद भरून रहातो. ९५ आत्मा सच्चिदानंदपूर्ण असल्यामुळें त्याच्या पुढें सगळें अज्ञान फोल ठरतें. अज्ञानाचा नाश करण्याचें खरें साधन विवेक आहे. इतर सांख्यतत्त्वज्ञानादि शास्त्रें व्यर्थ आहेत. ९६ त्याचेंच निरूपण पुढल्या श्लोकाच्या अर्ध्या चरणानें साध्य-साधनविभागपूर्वक श्रीकृष्ण करीत आहे. ३९७.

अज्ञान मुळीं सर्वथा मिथ्या आहे. विषयांचें भान अज्ञानजन्य आहे. हें पाहून लोक भ्रमांत पडले आणि त्यांना आत्मस्वरूपाचें विस्मरण झालें. ९८ मी हृदयस्थ परमात्मा सन्निध असतांहि त्यामजपासून त्यांची बुद्धि विमुख होते. त्यायोगें विषयासक्ति उत्पन्न होऊन स्त्री, पुत्र, गृह इत्यादिकांची उपाधि त्यांस आवडते.

तेणें जीवासी जन्ममरण। अनिवार जाण देहाभिमानें ॥ ४०० ॥ तो नासावया देहाभिमान। वैराग्ययुक्त ज्ञान ध्यान। मीचि बोलिलों साधन। समूळ अज्ञानच्छेदक ॥ १ ॥ जंववरी अंगीं देहाभिमान। तंव अवश्य पाहिजे साधन। निःशेष निरसल्या अज्ञान। वृथा साधन मीही मानीं ॥ २ ॥ म्हणशी तें कोण पां अज्ञान। जें शुद्धासी लावी जीवपण। त्या जीवाअंगीं जन्ममरण। अनिवार जाण वाढवी ॥ ३ ॥ स्वस्वरूप विसरोनि जाण। देहीं स्फुरे जें मीपण। अत्यंत दृढतर अज्ञान। तो देहाभिमान उद्धवा ॥ ४ ॥ गौण नांव त्याचें अज्ञान। येऱ्हवीं मुख्यत्वें देहाभिमान। हें ऐकोनि देवाचें वचन। दचकलें मन उद्धवाचें ॥ ५ ॥ तेचि अर्थींचा प्रश्न। देवासी पुसे आपण। कोण्या युक्तीं देहाभिमान। जन्ममरण भोगवी ॥ ६ ॥

उद्धव उवाच– त्वत्तः परावृत्तधियः स्वकृतैः कर्मभिः प्रभो।
उच्चावचान् यथा देहान् गृह्णन्ति विसृजन्ति च ॥ ३४ ॥
तन्ममाख्याहि गोविन्द दुर्विभाव्यमनात्मभिः। न ह्येतत्प्रायशो लोके विद्वांसः सन्ति वञ्चिताः ॥ ३५ ॥

सर्वत्र सदा संमुख गगन। त्यासी कदा न घडे विमुखपण। तेवीं आत्मा सबाह्य परिपूर्ण। वृत्ति विमुख जाण होय कैसी ॥ ७ ॥ जैं जाळीं बांधवे गगन। तैं अक्रिया लागे कर्मबंधन। वंध्यागर्भ सटवे जाण। तैसें जन्ममरण मुक्तासी ॥ ८ ॥ आत्म्यावेगळें कांहीं। रितें तंव उरलें नाहीं। तरी ये देहींचा ते देहीं। गमनसिद्धी पाहीं कैसेनि ॥ ९ ॥ पृथ्वी रुसोनि वोसरां राहे। आकाश पळोनि पऱ्हां

---

९९ आत्मस्वरूपाचें विस्मरण झालें कीं, विषयांचें तीव्र ध्यान वाढतें. त्यायोगें अनिवार देहाभिमान उत्पन्न होऊन जीवाला जन्म-मरण प्राप्त होतें. ४०० त्या देहाभिमानाचा नाश होण्यासाठीं अज्ञानाचें समूळ छेद करणारें वैराग्ययुक्त ज्ञान-ध्यानादि साधन मीं सांगितलें. १ जोंवर देहाभिमान आहे, तोंवर साधन अवश्य पाहिजे. अज्ञान पूर्णपणें नाहींसें झालें म्हणजे साधनें व्यर्थ आहेत, असें मीहि मानितों. २ तें अज्ञान कोणतें ! असें जर विचारशील तर मूळच्या शुद्धस्वरूप आत्म्याला 'जीवपणा' देणारें आणि त्या जीवाला अनिवार जन्म-मरणाचें दुःख भोगावयास लावणारें ३ व आत्मस्वरूपाला विसरून देहाभिमान जागृत करणारें तेंच अत्यंत दृढ अज्ञान होय. उद्धवा ! वास्तविक तो देहाभिमानच आहे; ४ पण त्याचें गौण नांव अज्ञान आहे. एरवीं देहाभिमानच मुख्य होय. हें श्रीकृष्णाचें भाषण ऐकून उद्धव मनांत दचकला ५ आणि त्यानें त्याविषयींच देवाला असा प्रश्न केला कीं, हा देहाभिमान कोणत्या प्रकारें जन्म-मरण भोगावयास लावितो ! ४०६.

—उद्धव त्याविषयींच प्रश्न करितो—

उ० उ०–उद्धव म्हणाला, प्रभो त्वत्तः परावृत्तधियः स्वकृतैः कर्मभिः उच्चावचान् देहान् यथा गृह्णन्ति विसृजन्ति च तत् मम आख्याहि–हे व्यापका ! तुझ्यापासून ज्यांची बुद्धि परावृत्त झाली आहे असे लोक स्वतः केलेल्या कर्मांनीं उच्च-नीच देहांचें ग्रहण कसे करितात व त्याग कसा करितात तें मला सांग. गोविन्द अनात्मभिः दुर्विभाव्यं–हे गोविंदा ! अनात्मज्ञाना हें तत्त्व कळणें शक्य नाहीं. [व्यापक आत्मा एका देहापासून दुसऱ्या देहाला कसा प्राप्त होतो ! अकर्त्याचीं कर्मे कशीं संभवतात ! नित्य आत्म्याला जन्म-मरणादि विकार कसे होतात, असा याचा भावार्थ.] लोके प्रायशः एतत् विद्वांसः न सन्ति हि वञ्चिताः–या लोकीं प्रायः हें जाणणारे विद्यमान नाहींत; कारण ते मायेनें मोहित झाले आहेत. ३४–३५.

आकाश ज्याप्रमाणें सदा सर्वदा आपल्या समोर असतें, ते कधींहि विमुख होत नाहीं, त्याप्रमाणें आत्मा अंतर्बाह्य परिपूर्ण भरलेला आहे. त्याच्यापासून वृत्ति विमुख कशी होणार ! ७ आकाशाला जर जाळ्यानें बांधितां येईल तर अकर्त्याला कर्मबंधन लागेल. वंध्या स्त्रीचें गर्भपतन होण्यासारखेंच मुक्ताचें जन्म-मरण आहे. ८ आत्म्यावांचून जर एक रेसभरहि जागा रिकामी नाहीं, तर या देहांतून त्या देहांत जाणें तरी कशानें घडणार. ! ९ पृथ्वी रुसली व तिनें जर आश्रय देण्याचें नाकारिलें, किंवा आकाश पळून दूर पलीकडे जाऊन बसलें, तर दुसऱ्या देहांत गमन

जाये । तैं देहींचा देहांतरा पाहें । आत्मा लाहे संसरण ।। ४१० ।। सात समुद्र गिळी मुंगी । तैं आत्मा उंचनीच योनी भोगी । हे अतर्क्य तर्केना मागी । भुलले योगी ये अर्थीं ।। ११ ।।

अभिनव हे तुझी गती । सर्वथा न कळे श्रीपती । मायामोहित जे चित्तीं । त्यां तुझी स्थिति नेणवे ।। १२ ।। तूं आत्मा अद्वितीय अविनाश । तेथ उत्पत्ति स्थिति विनाश । नाथिला दाविसी भवभास । हा अतर्क्य विलास तर्केना ।। १३ ।। येथ वेदाची युक्ती ठेली । उपनिषदें वेडावलीं । पुराणें मुकीं झालीं । अतियत्नें लक्षिली न वचेचि मागी ।। १४ ।। तुझे केवळ कृपेवीण । तुझें इत्थंभूत नव्हे ज्ञान । ऐसे जड मूढ हरिकृपाहीन । त्यांसी भवबंधन तुटेना ।। १५ ।। तुझे योगमायेची अतर्क्यता । ब्रह्मा भुलविला वत्सें नेतां । शिवू भुलविला मोहनी देखतां । इतरांची कथा ते कोण ।। १६ ।। प्रपंचीं अथवा परमार्थीं । तुझेनि चालती इंद्रियवृत्ती । यालागीं गोविंदनामाची ख्याती । त्रिजगतीं वाखाणिली ।। १७ ।। सादर कृपापूर्वक आपण । माझा सांगावा अतर्क्य प्रश्न । देहीं देहांतरा संचरण । जीवासी जन्ममरण तें कैसें ।। १८ ।। एकोनि उद्धवाचा प्रश्न । हांसिन्नला मधुसूदन । हें अवघें मायिक जाण । कल्पनाविंदान मनोमय ।। १९ ।।

श्रीभगवानुवाच—मनः कर्ममयं नृणामिन्द्रियैः पंचभिर्युतम् ।
लोकाल्लोकं प्रयात्यन्य आत्मा तदनुवर्तते ।। ३६ ।।

अकरा इंद्रियें पंच महाभूतें । हें सोळा कळांचें लिंगदेह येथें । मुख्यत्वें प्राधान्य मनाचें तेथें । नाना विषयांतें कल्पक ।। ४२० ।। येथ लिंगदेह तेंचि मन । मनाअधीन इंद्रियें जाण । मनाचेनि

करून आत्म्याला जन्म-मरण प्राप्त होईल. ४१० मुंगी जर सात समुद्र गिळून टाकील, तरच आत्म्याला उच्च-नीच योनी भोगाव्या लागतील. हें खरोखर अतर्क्य आहे. याचा विचार करीत असतां योगी देखील भ्रांत होतात. ४११.

हे श्रीपते ! तुझी ही विलक्षण गति सर्वथा कळत नाहीं. ज्यांचें चित्त मायेनें मोहित झालें आहे, त्यांस तुझें **स्वरूप** जाणतां येत नाहीं. १२ तूं आत्मा अद्वितीय, अविनाशी असून उत्पत्ति-स्थिति-लय हा मिथ्याच भ्रम दाख**वितोस.** या तुझ्या अतर्क्य लीलेची कोणालाच कल्पना करितां येत नाहीं. १३ त्यांत वेदाची मति कुंठित झाली. **उपनिषदें** वेडीं झालीं. पुराणें मुकीं झालीं. त्यांनीं पराकाष्ठेचा प्रयत्न केला, पण त्यांना कांहीं तुझा थांग लागला नाहीं. १४ तुझ्या कृपेवांचून तुझें पूर्ण ज्ञान होणें केव्हांहि शक्य नाहीं. म्हणून ज्यांवर हरीची कृपा नाहीं, असे जे जड **मूढ** राहिले आहेत त्यांचा हा भवबंध तुटत नाहीं. १५ तुझ्या योगमायेचा प्रभाव अतर्क्य आहे. तिनें ब्रह्मदेवाला वत्सें चोरून नेत असतां भुलविलें आहे. शिवाला मोहिनी दिसतांच मोहित केलें मग इतरांची काय कथा ! १६ प्रपंचांत किंवा परमार्थांत तुझ्यामुळेंच इंद्रियांची वृत्ति प्रवृत्त होत असते. म्हणून गोविंदनामाची कीर्ति त्रैलोक्यांत गात असतात. 'गो' म्हणजे इंद्रियें. त्यांना 'विंद' वागविणारा तूं इंद्रियवृत्तींचा चालक आहेस; म्हणून तुला गोविंद म्हणतात. १७ यास्तव 'जीव एका देहांतून दुसऱ्या देहांत कसा जातो व जीवाला जन्म-मरण कसें प्राप्त होतें !' या माझ्या अतर्क्य प्रश्नाचें उत्तर कृपा करून सांगावें. १८ हा उद्धवाचा प्रश्न ऐकून मधुसूदन हंसला आणि म्हणाला कीं, हें सर्व मायिक कल्पनेनें निर्मिलेलें, केवल मनोमय आहे, असें समज. ४१९.

—लिंगशरीराच्या अभ्यासानें हें सर्व संभवते, असें उत्तर—

श्रीभ० उ०—भगवान् म्हणाले, नृणां कर्ममयं मनः पंचभिः इंद्रियैः युतं लोकात् लोकं प्रयाति—मनुष्यांचें कर्मांनीं संस्कृत झालेलें मन श्रोत्रादि पांच इंद्रियांसह एका देहापासून दुसऱ्या देहास प्राप्त होतें. [ज्ञानेंद्रियें प्रधान असल्यामुळें 'पंचभिः' या पदानें त्यांचाच जरी येथें निर्देश केलेला असला तरी तो इतर इंद्रियांच्या उपलक्षणार्थ आहे, असें समजावें.] **अन्यः आत्मा तत् अनुवर्तते**— त्याहून अगदीं विलक्षण असलेला आत्मा अहंकाराच्या द्वारां त्याच्या मागोमाग जातो. ३६.

ज्ञानेंद्रियपंचक, कर्मेंद्रियपंचक व मन मिळून अकरा इंद्रियें आणि आकाशादि पंचमहाभूतें असा हा सोळा कलांचा लिंगदेह आहे. त्यांत मुख्यत्वेंकरून नानाविषयांची कल्पना करणाऱ्या मनाचें प्राधान्य असतें, ४२० असा

देहासी गमन । तेथ देहाभिमान मनासवें ॥ २१ ॥ मन ज्यातें सोडूनि जाये । तेथ अभिमान उभा न राहे । मनोयोगें अभिमान पाहें । देहाचा वाहे खटाटोप ॥ २२ ॥ जेथ विषयासक्त मन । करी शुभाशुभ कर्माचरण । तेव्हां होऊनि कर्माअधीन । देही करी गमन देहांतरा ॥ २३ ॥ आत्मा यासी अलिप्त भिन्न । परी देहासवें दावी गमन । हें अतिअतर्क्य विंदान । ऐक लक्षण तयाचें ॥ २४ ॥ घट जेथ जेथ हिंडों बैसे । आकाश त्यासवें जात दिसे । परी ढळणें नाहीं आकाशें । आत्म्याचें तैसें गमन येथें ॥ २५ ॥ घटामाजीं भरिजे अमृत । अथवा घालिजे खातमूत । आकाश दोहींसीं अलिप्त । तेवीं सुखदुःखातीत देहस्थ आत्मा ॥ २६ ॥ घट घायें कीजे शतचूर । परी आकाशीं न निघे चीर । तेवीं नश्वरीं अनश्वर । जाण साचार निजात्मा ॥ २७ ॥ घट फुटोनि जेथ नाशे । तेथ आकाश आकाशीं सहज असे । नवा घट जेथ उपजो बैसे । तों तेथ आकाशें व्यापिजे ॥ २८ ॥ तेवीं देहाचें नश्वरपण । आत्मा अखंडत्वें परिपूर्ण । आत्म्यासी देहांतरगमन । जन्ममरण असेना ॥ २९ ॥ देहींचें देहांतरगमन । वासनायोगें करी मन । तें मनोगमनाचें लक्षण । ऐक संपूर्ण सांगेन ॥ ४३० ॥

ध्यायन्मनोऽनुविषयान् दृष्टान्वानुऽश्रुतानथ । उद्यत्सीदत् कर्मतन्त्रं स्मृतिस्तदनुशाम्यती ॥ ३७ ॥

श्रुतदृष्टविषयांचें ध्यान । निरंतर वाढवी मन । तीव्र धारण दारुण । अन्य स्फुरण स्फुरेना ॥ ३१ ॥ आवडल्या विषयांचें ध्यान । अंतकाळीं ठसावे जाण । तेव्हां तदाकार होय मन । सर्वभावें

जो लिंगदेह तेंच मन होय. सर्व इंद्रियें मनाच्या अधीन असतात. मनामुळेंच देहाला गति आहे आणि देहाभिमानहि मनाबरोबरच असतो. (असंग आत्मा मनाहून भिन्न आहे. लिंग देहच अभिमानानें 'मी करितों, जातों' असें मानीत असतो.) २१ मन ज्याला सोडून जातें त्याच्यापाशीं अभिमान उभाहि रहात नाहीं. मनामुळेंच अभिमान ही देहाची यातायात करीत असतो. २२ मन जेव्हां विषयासक्त असतें तेव्हां शुभ-अशुभ कर्में करितें; त्यामुळें जीव कर्माधीन होऊन दुसऱ्या देहाला प्राप्त होतो. २३ आत्मा याहून अगदीं अलिप्त व भिन्न असतांहि तो देहाबरोबर जात असल्याप्रमाणें दाखवितो. हा अत्यंत आश्चर्यकारक प्रकार आहे. त्याचेंहि लक्षण सांगतों, ऐक. २४ मातीचा घट जेथें जेथें हिंडवावा किंवा ठेवावा तेथें तेथें त्याच्या बरोबर घटकाश जात असलेलें दिसतें. परंतु वास्तविक आकाश आपल्या स्थानापासून रेंसभरहि जसें हलत नसतें, त्याचप्रमाणें आत्म्याचें गमन समजावें. २५ घटामध्यें अमृत भरलें किंवा दुर्गंधयुक्त घाण भरली तरी त्यांतील आकाश त्या दोहोंपासूनहि जसें अलिप्त असतें; तसा देहांत रहाणारा आत्मा सुख-दुःखांपासून अलिप्त असतो. २६ घटाचे एका घावानें शेकडों तुकडे केले तरी आकाशाला जशी एक बारीकशी भेगहि पडत नाहीं, त्याप्रमाणें या नाश पावणाऱ्या देहांत अविनाशी आत्मा असतो, हें निश्चित जाणावें. २७ घट फुटून त्याचा जरी नाश झाला तरी त्यांतील आकाश जसें आकाशांतच स्थित असतें आणि नवीन घट उत्पन्न झाला असतां त्याला व्यापितें, २८ त्याप्रमाणें हा देह नश्वर आहे व आत्मा अखंडत्वानें परिपूर्ण आहे. आत्म्याला एका देहांतून दुसऱ्या देहांत गमन व जन्म-मरण नाहीं. २९ मनच वासनांच्या योगानें देहधारी जीवाला दुसऱ्या देहांत घेऊन जातें. तें मन कसें प्रवेश करितें, त्याचें लक्षण सांगतों, ऐक. ४३०.

—'अहोपण मनाचा तरी पूर्व देहापासून वियोग व देहान्तराशीं संयोग कसा होतो !' अशी आशंका घेऊन स्मृतीचा वियोग व योग यांच्या योगानें ते होतात हें सांगण्यासाठीं त्यांचें कारण सांगतात—

कर्मतंत्रं मनः अनुदृष्टान् अथ वा अनुश्रुतान् विषयान् ध्यायत् उद्यत् सीदत् भवति—कर्माधीन असलेलें मन कर्मानें संपादन केलेल्या ऐहिक किंवा वेदोक्त पारलौकिक विषयांचें ध्यान करणारें असें होत्साते, ध्यान केलेल्या विषयांमध्यें आविर्भूत होतें व पूर्वविषयांमध्यें लीन होतें. **तदनु स्मृतिः शाम्यति**—त्यानंतर त्याची स्मृति म्ह॰ पूर्वापर अनुसंधान नाश पावतें. ३७.

मन पाहिलेल्या किंवा ऐकलेल्या विषयांचें सतत ध्यान करीत असतें. तो मनाचा ध्यास इतका दृढ असतो कीं, त्यामुळें त्याला दुसऱ्या कशाचीहि स्फूर्ति होत नाहीं. ३१ आवडल्या विषयांचेंच ध्यान मनावर ठसल्यामुळें मन मरण-

आपण तन्निष्ठा ॥ ३२ ॥ तेव्हां भोगक्षयें जाण । मागल्या देहाचा अभिमान । सहजेंचि विसरे मन । पुढील ध्यान एकाग्रतां ॥ ३३ ॥ विषयवासनारूढ मन । निजकर्मतंत्रें जाण । देहांतरीं करी गमन । तेथ सप्राण संचरे ॥ ३४ ॥ मागील सांडिल्या देहातें । सर्वथा स्मरेना चित्तें । पुढें धरिलें आणिकातें । हेंही मनातें स्मरेना ॥ ३५ ॥

विषयाभिनिवेशेन नात्मानं यत्स्मरेत्पुनः । जन्तोर्वै कस्यचिद्धेतोर्मृत्युरत्यन्तविस्मृतिः ॥ ३८ ॥
जन्म त्वात्मतया पुंसः सर्वभावेन भूरिद । विषयस्वीकृतिं प्राहुर्यथा स्वप्नमनोरथः ॥ ३९ ॥

विषयाभिनिवेशें मन । ज्या स्वरूपाचें करी ध्यान । तद्रूप होय आपण । पूर्वदेहाचें स्मरण विसरोनियां ॥ ३६ ॥ तेंचि विस्मरण कैसें । निजबालत्व प्रौढवयसें । निःशेष नाठवे मानसें । पूर्वदेह तैसें विसरोनि जाये ॥ ३७ ॥ ऐसें अत्यंत विस्मरण । त्या नांव देहाचें मरण । त्या विसरासवें जाण । चेतना सप्राण निघोनि जाये ॥ ३८ ॥ जेव्हां चेतना जाय सप्राण । तेव्हां देहासी ये प्रेतपण । त्या नांव उद्धवा मरण । जन्मकथन तें ऐक ॥ ३९ ॥ स्नेहें द्वेषें अथवा भयें । अंतकाळीं जें ध्यान राहे । पुरुष तद्रूपचि होये । जन्मही लाहे तैसेंचि ॥ ४४० ॥ भरत करितां अनुष्ठान । अंतीं लागलें मृगाचें ध्यान । तो मृगचि झाला आपण । ध्यानानुरूपें मन जन्म पावे ॥ ४१ ॥ भयास्तव भृंगाचें ध्यान । कीटकी करितां जाण । ते तद्रूप होय आपण । ध्यानानुरूपें मन जन्म पावे ॥ ४२ ॥ द्वेषें ध्यातां श्रीकृष्णासी । तद्रूपता झाली पौंड्रकासी । जैसें दृढ ध्यान मानसीं । ते गति पुरुषासी त्रिशुद्धी ॥ ४३ ॥ वाढवूनियां संभ्रम । अंतकाळीं

समयीं तदाकार बनतें. त्याचें सर्व चित्त त्याकडेच लागून रहातें. ३२ त्यावेळीं प्रारब्धभोगाचा क्षय होतांच मन पहिल्या देहाचा अभिमान विसरतें आणि पुढील देहाचें एकाग्रतेनें ध्यान करितें. ३३ असें तें विषयवासनारूढ झालेलें मन आपल्या पूर्वकर्मानुसार दुसऱ्या देहांत प्राणांसह संचार करितें. ३४ सोडिलेल्या पूर्व देहाचें त्याला मुळींच स्मरण रहात नाहीं आणि मीं हा नवा देह धारण केला आहे, हेंहि मनाला आठवत नाहीं. ४३५.

—'मग पुढें काय होते' तें सांगतात—

विषयाभिनिवेशेन आत्मानं पुनः न स्मरेत् इति यत् अत्यंतविस्मृतिः कस्यचित् हेतोः एकस्य जंतोः वै मृत्युः—मन कर्मानें संपादन केलेल्या देवादि देहावरील अत्यंत अभिनिवेशानें पूर्वदेहाला स्मरत नाहीं. अर्थात् यातनादेहाभिनिवेशानें भय-शोकादिकांमुळें किंवा देवादिदेहाभिनिवेशानें हर्ष-काम इत्यादिकांमुळें पूर्वदेहाचें अत्यंत विस्मरण होणें म्ह० त्यावरील अहंकाराची निवृत्ति होणें, हाच शरीराभिमानी जीवाचा मृत्यु आहे. देहाप्रमाणें नाश होणें हा मृत्यु नव्हे. ३८. **भूरिद**—हे विपुल दान करणाऱ्या उद्धवा ! **यथा तु स्वप्नमनोरथः**—जसे स्वप्न व मनोरथ, त्याप्रमाणेंच, **पुंसः सर्वभावेन आत्मतया विषयस्वीकृतिं जन्म प्राहुः**—पुरुषानें केवळ तादात्म्याभिमानानें शरीराचें आत्मत्वानें ग्रहण करणें हाच त्याचा जन्म आहे. देहाप्रमाणें उत्पत्ति होणें हा जन्म नव्हे. ३९.

विषयलोलुप झालेलें जें मन विषयाचें चिंतन करीत असतें, तें पूर्व देहाला विसरून तद्रूप बनतें. ३६ तें कसें विसरतें ! (असें जर म्हणशील, तर ऐक.) मनुष्याला आपलें बालपण प्रौढवयांत जसें पूर्णपणें आठवत नाहीं, तसें हें मन पूर्वदेहाला विसरतें. ३७ असें जें अत्यंत विस्मरण त्यालाच देहाचें मरण असें म्हणतात. त्या विस्मृतीबरोबर चेतना प्राणासह निघून जाते. ३८ देहांतून जेव्हां प्राणासह चेतना निघून जाते, तेव्हां हें शरीर अचेतन—प्रेत बनतें. उद्धवा ! यालाच मरण म्हणतात. आतां जन्माचा प्रकार ऐक. ३८ जीव मरणकाळीं स्नेहानें, द्वेषानें किंवा भयानें ज्याचें चिंतन करीत असतो, तो तद्रूप होऊन त्याला जन्महि तसाच मिळतो. ४४० जडभरतानें अंतकाळीं स्नेहानें मृगाचें चिंतन केल्यामुळें त्याला मृगाचा जन्म प्राप्त झाला. (ही जडभरताची कथा भागवत स्कंद ५ अ. ८।९ यांत सविस्तर आहे.) त्याच्या ध्यानाप्रमाणें त्याला जन्म मिळाला. ४१ भीतीनें कुंभारणीचें ध्यान करणारी अळी तद्रूप होते, हें प्रसिद्धच आहे. चिंतनाप्रमाणें मन जन्म घेत असतें. ४२ पौंड्रकानें द्वेषानें श्रीकृष्णाचा ध्यास केला असतां तोहि तद्रूप झाला. यावरून मनाला ज्या विषयाचा दृढ ध्यास लागून राहिलेला असतो, तशा प्रकारचा जन्म त्याला

आवडे सप्रेम। जेथें ध्यान ठसावे मनोरम। तेंचि जन्म पुरुषासी ॥ ४४ ॥ मग तेणें ध्यानानुभवें। जैसा कांहीं आकारू संभवे। तेथ देहाभिमान पावे। 'हें मी आघवें' म्हणोनी ॥ ४५ ॥ येथ मन आणि अभिमान। स्वरूप एक कार्यें भिन्न। हें चित्तचतुष्टयलक्षण। जाणती सज्ञान एकात्मता ॥ ४६ ॥ दैवयोगें त्या देहाचें। बरवें वोखटें घडे साचें। तैं अभिमान घेऊनि नाचे। जन्म पुरुषाचें या नांव ॥ ४७ ॥ परी हें देह नव्हे आन। हेंही स्मरेना तें मन। पूर्वील जो देहाभिमान। तोचि येथ जाण आरोपी ॥ ४८ ॥ येचि अर्थींचा दृष्टान्त। स्वयें सांगताहे श्रीकृष्णनाथ। जेवीं स्वप्न आणि मनोरथ। विसरवित निजदेहा ॥ ४९ ॥ स्वगृहीं दरिद्री निद्रित। तो स्वप्नीं होय अमरनाथ। मग उर्वशीप्रमुख अप्सरांत। असे मिरवत ऐरावतीं ॥ ४५० ॥ तें दरिद्रदेह माझें गेलें। हें अमरदेह प्राप्त झालें। ऐसें स्वप्नीं नाहीं आठवलें। तैसें जन्म झालें जनासी ॥ ५१ ॥ मजूर राउळींचे घृत नेतां। तो तुरंगीं चढे मनोरथा। मन नाचूं लागे उल्हासतां। स्वकल्पिता कल्पना ॥ ५२ ॥ सबळ वारूचें उड्डाण। म्हणूनि उडूं जातां आपण। पडोनि घृतकुंभ होय भग्न। पुसती जन काय झालें ॥ ५३ ॥ बळें उडाला माझा घोडा। परी स्मरेना तो फुटला घडा। बंदीं पडला रोकडा। नेणे बापुडा मनोरथें ॥ ५४ ॥ येथवरी तीव्र जें विस्मरण। त्या नांव देहाचें मरण। अतिउद्यत जें मनाचें ध्यान। तेंचि जन्म प्राण्यासी ॥ ५५ ॥ एवं आत्म्यासी जन्ममरण। तें केवळ भ्रमाचें लक्षण। तेचि अर्थीचें निरूपण। स्वयें श्रीकृष्ण सांगत ॥ ५६ ॥

खात्रीनें मिळतो. ४३ प्रपंचाचा पसारा वाढवून ज्या विषयांवर प्रेम जडलेलें असतें, त्यांचेंच दृढ ध्यान अंतकाळीं मनावर ठसतें व तदनुरूप जन्म मिळतो. ४४ त्या चिंतनाच्या सामर्थ्यानें जसा आकार प्राप्त होतो, तसाच त्याच्या ठिकाणीं देहाभिमान उत्पन्न होतो आणि हा सगळा देह-इंद्रियसंघात मीच आहें, असें तो म्हणूं लागतो. ४५ येथें मन व अभिमान यांचें स्वरूप वस्तुतः एकच असतें; पण त्यांचीं कार्यें मात्र भिन्न आहेत. हें चित्तचतुष्टयलक्षण जाणणाऱ्या विद्वानांना ठाऊक आहे. ४६ दैवयोगानें त्या देहाचें कांहीं बरें वाईट झालें, तर प्राप्त झालेल्या देहावरच अभिमान ठेवून नाचणें यालाच 'पुरुषाचा जन्म' असें म्हणतात. ४७ हा पूर्वीचा देह नव्हे, दुसरा आहे, याचें त्या मनाला भान नसतें त्यामुळें तें पूर्व देहावरील अभिमान यावर आरोपितें. ४८ या विषयींच श्रीकृष्ण स्वतः एक दृष्टान्त सांगत आहे. स्वप्नांत किंवा मनोराज्यांत जसें आपल्या देहाचें भान नसतें, ४९ त्याप्रमाणें एखादा दरिद्री मनुष्य आपल्या घरीं निजलेला असतो, तो स्वप्नांत स्वतःला इंद्रपद मिळालेलें पहातो व उर्वशीइत्यादि सर्व अप्सरांबरोबर ऐरावतावरून मिरवत असतो. ४५० त्या वेळीं त्याला जसें 'माझा पूर्वीचा दरिद्री देह गेला व मला इंद्रपद मिळालें' हें स्मरण होत नाहीं, त्याचप्रमाणें लोकांना दुसरा जन्म मिळाला असतां पूर्वीच्या जन्माचें स्मरण रहात नाहीं. ५१ एखादा मजूर देवळांतील तुपाची घागर डोकीवर घेऊन चालला असतां तो मनोराज्य करीत असतो कीं, मी घोड्यावर बसलों आहें. त्याच्या काल्पनिक मनोराज्यानें मन अत्यंत उल्हसित होतें ५२ व 'घोडा काय वेगानें धांवत आहे' असें समजून त्या नादांत तो स्वतःच उडी मारितो. तेव्हां डोकीवरील तुपाचा घट पडून त्याचे तुकडे होतात. तेव्हां 'हें काय झालें' असें लोक म्हणूं लागतात. ५३ परंतु त्याला त्याचें कांहींच स्मरण नसतें. 'माझा घोडा अंनावर होऊन उधळला' या मनोराज्यांतच तो बिचारा गुंग असतो. डोकीवरून घट पडून तो फुटला व त्यासाठीं आपल्याला बंदींत टाकिलें आहे याचें त्याला भानहि नसतें. ५४ येथपर्यंतचें जें दृढ विस्मरण त्यालाच देहाचें मरण म्हणतात व मनाचें जें अत्यंत उत्कट ध्यान तोच प्राण्याचा जन्म होय. ५५ याप्रमाणें 'आत्म्याला जन्ममरण आहे' असें मानणें हें केवल भ्रमाचें लक्षण आहे. त्याचेंच अधिक निरूपण स्वतः श्रीकृष्ण करीत आहे. ४५६.

स्वप्नं मनोरथं चेत्थं प्राक्तनं न स्मरत्यसौ । तत्र पूर्वमिवात्मानमपूर्वं चानुपश्यति ॥ ४० ॥

स्वप्न देखत्या पुरुषासी । विसरोनि निजदेहासी । स्वप्नींच्या देहगेहांसी । साभिमानेंसीं वाढवी ॥ ५७ ॥ जागृतिदेहो राहिला तेथें । स्वप्नदेहो पावलों येथें । एवं पूर्व अपूर्व दोहींतें । न स्मरे चित्तें पुरुष जैसा ॥ ५८ ॥ जागृति आणि देखिलें स्वप्न । या दोहीं देहांसी देखतां भिन्न । तेवीं जन्म आणि मरण । जीवासी जाण असेना ॥ ५९ ॥ एवं देहांसी जन्म नाश । आत्मा नित्यमुक्त अविनाश । स्वप्न-मनोरथविलास । तैसा बहुवस संसार ॥ ४६० ॥ देहासी जन्म स्थिति मरण । यांसी मनचि गा कारण । मनःकल्पित संसार जाण । तेंचि श्रीकृष्ण सांगत ॥ ६१ ॥

इन्द्रियायनसृष्ट्येदं त्रैविध्यं भाति वस्तुनि । बहिरन्तर्भिदाहेतुर्जनोऽसज्जनकृद्यथा ॥ ४१ ॥

मनें कल्पिली सकळ सृष्टी । मनःकृत इंद्रियकामाठी । मनें वाढविली त्रिपुटी । कर्मकसवटी विभागें ॥ ६२ ॥ अधिदैव अध्यात्म अधिभूत । हें त्रैविध्य मनःकृत । वस्तु अखंडचि तेथ । त्रिधा भासत कल्पना ॥ ६३ ॥ जैसें भांडें कुंभार करी । तेथ नभ दिसे तदाकारीं । गगन सर्वथा अविकारी । तें दिसे विकारीं भांडयोगें ॥ ६४ ॥ तेवीं आत्मा अविकारी नित्य शुद्ध । तेथ मनःकल्पित त्रिविध । नाना-परींच्या त्रिपुटी विविध । वाढविला भेद तो ऐक ॥ ६५ ॥ कार्य कर्म आणि कर्ता । ध्येय ध्यान आणि

—वरील दृष्टान्ताचेंच विवरण—

असौ तत्र प्राक्तनं स्वप्नं मनोरथं च न स्मरति—हा जीव वर्तमान स्वप्नादिकांमध्यें पूर्वींचें स्वप्न व मनोरथ यांस आठवीत नाहीं. वर्तमान स्वप्नादिकांत त्याला मागील स्वप्नादिकांचें स्मरण होत नाहीं. **इत्थं पूर्वं आत्मानं अपूर्वं इव च अनुपश्यति**—याप्रमाणें पूर्वसिद्ध असलेल्याहि आत्म्याला तो जणुंकाय अपूर्व—आज नवीनच उत्पन्न झाल्याप्रमाणें पहातो. ४०

स्वप्न पहाणारा पुरुष आपल्या खऱ्या देहाला विसरून स्वप्नांतील मिथ्या देह व गृहादिक यांवर अभिमान ठेवितो. ५७ परंतु हा जागृतींतील देह नसून स्वप्नांतील देह आहे, असें पूर्वींच्या किंवा विद्यमान देहाचें मनुष्याला जसें स्मरण रहात नाहीं, ५८ आणि जागृति व स्वप्न या दोन्ही देहांना पहाणारा जसा भिन्न, त्याप्रमाणें जीवाला जन्म-मरण नाहीं. ५९ अशा प्रकारें जन्म व नाश देहाला आहेत. आत्मा नित्यमुक्त अविनाशी आहे आणि हा संसार स्वप्न व मनोरथ यांतील विलासांसारखा आहे. ४६० देहाची उत्पत्ति, स्थिति व लय याला मनच कारण आहे. हा संसार मनःकल्पित आहे, असें आतां श्रीकृष्ण सांगत आहे. ४६१.

—आतां याचा उपसंहार करितात—

इन्द्रियायनसृष्ट्या इदं त्रैविध्यं वस्तुनि असत् एव भाति—इंद्रियांचें अयन म्ह० मन, त्याच्या देहान्तराभिनिवेशानें जी उत्पत्ति तिच्या योगानें आत्म्यामध्यें, त्याच्या अभिमानानें हें उत्तमत्व-मध्यमत्व व नीचत्व खोटेंच भासतें. **बहिरन्त-र्भिदाहेतुः**— आणि अशा प्रकारचा आत्मा बाह्य व आभ्यंतर या भेदाचा हेतु होतो. [अर्थात् बाह्य विषय व आंतर सुखादि यांना पहातो, असा याचा भावार्थ.] **यथा जनः असज्जनकृत्**—ज्याप्रमाणें जीव स्वप्नांत अनेक मिथ्या देहांना निर्माण करून त्यांना पहाणारा होत्साता बहुरूप भासतो, त्याप्रमाणें. [किंवा हें त्रिविध म्हणजे अध्यात्मादिरूप, असज्जनकृत् म्ह० दुष्ट पुत्राला उत्पन्न करणारा, जनः म्ह० पिता स्वतः सम असूनहि पुत्राभिमानामुळें त्याच्या शत्रु-मित्रादिकांमध्यें जसा सर्वदा भेदहेतु होतो, त्याप्रमाणें.] ४१.

मनानें ही सगळी सृष्टि कल्पिली आहे. मनामुळेंच इंद्रियांचा सर्व व्यापार होतो. आणि कर्म-निश्चयाच्या विभागाप्रमाणें मनानेंच ही त्रिपुटी वाढविली आहे. ६२ अधिदैव, अध्यात्म व अधिभूत हीं तीनहि मनानें केलेलीं आहेत. आत्मवस्तु वास्तविक अखंड असतां ती कल्पनेनें तीन प्रकारची भासते. ६३ कुंभार मातीचा घट बनवितो; पण त्यांतील आकाश त्या घटाच्या पोकळीच्या आकाराचें भासतें. वास्तविक आकाश निर्विकार असून तें घटाच्या योगानें जसें तदाकार दिसतें, ६४ त्याप्रमाणें विकाररहित आत्मा नित्य शुद्ध असून मन त्याला तीन प्रकारचे कल्पितें आणि त्या नानाप्रकारच्या त्रिपुटीनें भेद वाढतो. तो कसा तें सांगतों, ऐक. ६५ कार्य-कर्म-

ध्याता । ज्ञेय ज्ञान आणि ज्ञाता । या मनःकल्पिता त्रिविध ॥ ६६ ॥ अहं कोऽहं सोऽहं भेद । त्वंपद तत्पद असिपद । सद् चिद् आणि आनंद । हेही संबंध मायिक ॥ ६७ ॥ असंताचिये निवृत्ती । संतत्व प्रतिपादी वेदोक्ती । जडाचिये समाप्ती । चिदत्व बोलती वस्तूसी ॥ ६८ ॥ करितां दुःखाचा छेद । वस्तूसीं म्हणती परमानंद । एवं सच्चिदानंद । जाण प्रसिद्ध मायिक ॥ ६९ ॥ असंत मिथ्या मायिक पाहीं । तैसें तत्त्व कोण ठेवी ठायीं । जडासीचि ठाव नाहीं । तेथ चिदत्व कायी संपादे ॥ ४७० ॥ जेथ नाहीं दुःखसंबंध । तेथ कोण म्हणे आनंद । एवं वस्तूच्या ठायीं सच्चिदानंद । मायिक संबंध या हेतू ॥ ७१ ॥ जेथ जें भासे संसारभान । त्रिगुणत्रिपुटीविंदान । तें सर्व मायिक मनःकृत जाण । आत्मा तो भिन्न गुणातीत ॥ ७२ ॥ आत्मा नित्य मुक्त शुद्ध बुद्ध । तेथ भासे जो त्रिविध भेद । तो मनःकृत गुणसंबंध । जाण प्रसिद्ध मायिक ॥ ७३ ॥ पुरुष श्रोत्रिय सदाचार । त्याची स्त्री करी व्यभिचार । तेणें दोषी म्हणती भ्रतार । तैसा भेदप्रकार आत्म्यासी ॥ ७४ ॥ जेवीं स्वप्नामाजीं नर । एकला होय संसार । तो निद्रायोगें चमत्कार । तैसा भेदप्रकार मायिक ब्रह्मीं ॥ ७५ ॥ जडाजड देहभेद । परिच्छिन्नत्वें जीवभेद । हा स्वप्नप्राय मायिक बोध । आत्मा नित्य शुद्ध अद्वितीय ॥ ७६ ॥ ऐसे मायाविभेदनिष्ठ जन । त्यांसी वैराग्य-सिद्ध्यर्थ जाण । काळकृत जन्म मरण । तेंचि निरूपण हरि बोले ॥ ७७ ॥

नित्यदा ह्यङ्ग भूतानि भवन्ति न भवन्ति च । कालेनालक्ष्यवेगेन सूक्ष्मत्वात्तन्न दृश्यते ॥४२ ॥

कर्ता; ध्येय-ध्यान-ध्याता; ज्ञेय-ज्ञान-ज्ञाता; या मनःकल्पित त्रिपुटी आहेत. ६६ अहं म्ह० मी, कोहं म्ह० मी कोण! सोहं म्ह० तो मी, असा हा भेद, किंवा त्वं म्ह० जीव, तत् म्ह० ब्रह्म, असि म्ह० आहेस; किंवा सत्, चित् आनंद हेहि संबंध मायिक आहेत. ६७ मिथ्या मायेचा निरास करण्यासाठीं वेदवाणी सत्चें प्रतिपादन करिते. जडाची निवृत्ति करण्यासाठीं आत्मवस्तूला चित्त्व म्हणजे आत्मा चैतन्य आहे, असें म्हणतात. ६८ दुःखाचें निरसन करण्यासाठीं परब्रह्म परमानंदरूप आहे, असें म्हणतात. याप्रमाणें ' सच्चिदानंद ' हें नांव वास्तविक मायिक म्ह० मिथ्याच आहे. ६९ असत् मिथ्या असल्यामुळें मायिक आहे. जें असत् मिथ्या मायिक आहे, तेथें तत्त्व कोठून रहाणार! जडत्वच जर मुळीं नाहीं, तर तेथें चैतन्य तरी कसें सिद्ध होणार! ४७० जेथें सुख-दुःखाचा संबंधच नाहीं, तेथें आनंद असें म्हणणार कोण! यास्तव आत्मवस्तूला सत्-चित्-आनंद म्हणणें केवल मायिक आहे. ७१ तेथें जें संसाराचें भान होतें, ती त्रिगुणाच्या त्रिपुटीची लीला आहे. तें सर्व मनानें कल्पिलेलें मायिक असतें. आत्मा या तीन गुणांहून अगदीं भिन्न असतो. ७२ आत्मा वास्तविक नित्य, मुक्त, शुद्ध, बुद्ध आहे. त्याच्या ठिकाणीं जो त्रिविध भेद भासतो, तो गुणाच्या संबंधानें मनानें केलेला मायिक असतो, असें निश्चित जाणावें. ७३ एखादा सदाचारसंपन्न धार्मिक ब्राह्मण असला व त्याच्या स्त्रीनें व्यभिचार केला तर त्यामुळें तो ब्राह्मण दोषी झाला म्हणतात. त्याप्रमाणें या आत्म्याच्या भेदाचा प्रकार आहे. (आत्मा वास्तविक अलिप्त असून गुणांचें दोष त्यावर आरोपिले जातात.) ७४ स्वप्नांत जसा एखादा मनुष्य सगळा संसार एकटाच होतो, निद्रेमुळें तो चमत्कार होतो, तसाच ब्रह्मांतील भेदाचा प्रकार मायिक आहे. ७५ जड, अजड हा देहांतील भेद व परिच्छिन्नपणानें जीवाचा भेद; हा सर्व स्वप्नवत् मिथ्या भास आहे. आत्मा नित्य, शुद्ध व अद्वितीय आहे. ७६ अशा या मायानिर्मित भेदांत गुंतलेले जे लोक आहेत त्यांना विरक्ति यावी म्हणून काळानें जन्म मरण लावून दिलें आहे. त्याच अर्थाचें निरूपण हरि करीत आहे. ४७७.

याप्रमाणें लोकप्रसिद्ध जन्म-मृत्यु सांगून उद्धवानें न विचारिलेलेहि सूक्ष्म जन्म-मृत्यु वैराग्यासाठीं सांगतात—

अंग—उद्धवा, **नित्यदा भूतानि न भवन्ति न भवन्ति च**—प्रतिक्षणीं शरीरें उत्पन्न होतात व नाश पावतात, **अलक्ष्यवेगेन कालेन सूक्ष्मत्वात् तत् न लक्ष्यते**—ज्याचा वेग कोणालाहि कळण्यासारखा नाहीं, अशा कालाच्या **योगानें शरीरांचा हा** प्रतिक्षणीं उत्पत्ति-विनाश होतो. पण तो काल अतिशय सूक्ष्म असल्यामुळें त्याच्या योगानें होणारे हे भवन-अभवनरूप **विकार** अविवेक्यांना कळत नाहींत. ४२.

म्हणे ऐक बापा उद्धवा । स्थावरजंगमादि देहभावा । काळाचिया काळप्रभावा । लागला नीच नवा जन्ममृत्यू ॥ ७८ ॥ अतिसूक्ष्म काळगतींसीं । काळग्रासीतसे जगासी । या अंगींच्या जन्ममृत्यूंसी । नेणवे जीवासी मायामोहें ॥ ७९ ॥ निजमाता बाळवयासीं । प्रकटावयवीं लाडवी पुत्रासी । तेचि माता प्रौढ-वयसेंसी । होय त्या पुत्रासी सलज्ज ॥ ४८० ॥ ते बाल्यावस्था काळें नेली । हे प्रौढवयसा नवी आली । यालागीं माता सलज्ज झाली । हे काळें केली घडामोडी ॥ ८१ ॥ ऐसा नित्य नाश नित्य जन्म । भूतांसीं करी काळ सूक्ष्म । या जन्ममृत्यूंचें वर्म । नेणती संभ्रम भ्रांत प्राणी ॥ ८२ ॥ जो अवस्थाभाग काळें नेला । त्यासवें तो देहचि गेला । पुढें वयसा नवी पावला । तो काळें आणिला नवा देहो ॥ ८३ ॥ ऐसा संभव आणि असंभवो । नीच नवा काळकृत पहा हो । यालागी त्रिविकारीं देहो । स्वयें स्वयमेवो देखिजे ॥ ८४ ॥ अतर्क्य काळाची काळगती । भूतें जन्ममृत्यु पावती । ते अलक्ष्य गतीचे अर्थीं । दृष्टांत श्रीपति दावीत ॥ ८५ ॥

यथाऽर्चिषां स्रोतसां च फलानां वा वनस्पतेः । तथैव सर्वभूतानां वयोऽवस्थादयः कृताः ॥ ४३ ॥

नित्य नूतन दीपज्वाळा । होतां जातां न दिसती डोळां । सवेग वाहतां जळकल्लोळा । यमुनाजळा न देखिजे ॥ ८६ ॥ फळ न सांडितां वृक्षदेंठ । कडवट तुरट आंबट । तेंचि गोड होय चोखट । ऐशा अतर्क्य अदृष्ट काळसत्ता ॥ ८७ ॥ तोचि काळ देहासरिसा । नित्य नूतन लागला कैसा । बाल्य तारुण्य वृद्धवयसा । देहदशा पालटी ॥ ८८ ॥ मूढ कुशळ अशक्तता । अवस्था नाशीत ये अवस्था । तेथ ‘ मी

अरे बाबा उद्धवा ! ऐक. स्थावरजंगमादि जेवढे देहभाव आहेत त्यांना कालाच्या प्रभावानें नित्य जन्म-मृत्यु लागलेलाच आहे. ७८ अतिसूक्ष्म कालगतीनें काळ जगाला ग्रासीत असतो; परंतु जीव माया-मोहामुळें या स्वाभाविक जन्म-मरणाला जाणत नाहीं. ७९ माता आपलें बालक जोंवर लहान असतें तोंवर त्याला अंगावर घेऊन उघडें-नागवें खेळवितें; परंतु तोच पुत्र मोठा होऊन प्रौढ झाला म्हणजे माता त्याला उघडा पाहण्यासहि लाजते. ४८० त्याची बाल्यावस्था कालानें नेली व ही नवी प्रौढ अवस्था प्राप्त झाली म्हणून मातेलाहि स्पर्श करण्यास लाज वाटूं लागली. एवढी घडामोड काळानें केली. ८१ असा हा सूक्ष्म काल प्राण्याचा जन्म व नाश नित्य करीत असतो, भ्रमानें भ्रांत झालेले लोक या जन्म-मृत्यूचें वर्म जाणत नाहींत. ८२ कालानें आयुष्यांतील जो भाग नेला त्या बरोबर देहहिं गेला व पुढें नवीन वाढल्या वयाबरोबर नवा देह प्राप्त झाला. ८३ असा हा कालकृत जन्म-नाश नित्य नवाच असतो. म्हणून हा देह तीन प्रकारच्या विकारांनीं युक्त आहे हें आपलें आपणच पहावें. ८४ कालाची ही गति अतर्क्य आहे. त्यामुळें प्राण्यांना जन्म-मरण प्राप्त होतें. त्या अतर्क्य गतीविषयींच श्रीकृष्ण दृष्टान्त देऊन सांगत आहे. ४८५.

—‘ अहोपण जन्म—मरण जर सद्रूप असतील तर त्यांच्या अज्ञानाचे अतिसूक्ष्म काल हें कारण होईल; पण त्यांचें सत्त्वच कसें सिद्ध होतें ! ’ उत्तर—

यथा अर्चिषां स्रोतसां च वनस्पतेः फलानां वा तथा एव सर्वभूतानां वयोऽवस्थादयः कृताः—ज्याप्रमाणें ज्योतींच्या परिणामादिकांवरून, प्रवाहाच्या गमनादिकांवरून व वृक्षांच्या फलांच्या रूपादिकांवरून कालानें होणाऱ्या अवस्थादिकांचें ज्ञान होतें त्याप्रमाणेंच सर्व भूतांचें वय, अवस्था, तेज, बल, काम, कौशल इत्यादि अवस्था कालामुळें झालेल्या आहेत, असें अनुमान होतें. [भूतांचीं शरीरें प्रतिक्षणीं उत्पत्ति-विनाशशील आहेत. कारण त्यांना अवस्थाभेदवत्त्व आहे. म्ह० त्यांच्या भिन्न-भिन्न अवस्था प्रतीत होतात. दीपाची ज्योति, नदीचा प्रवाह इत्यादिकांप्रमाणें, असें अनुमान करावें.] ४३.

दिव्याची ज्योत प्रतिक्षणीं नवीन होते व जाते; पण ती आपल्या डोळ्यांना एकच दिसत नाहीं; किंवा जोरानें वहात असलेल्या यमुनेच्या प्रवाहांतील जल क्षणोक्षणीं नवें नवें येऊन जात आहे, हें लक्षांत येत नाहीं; ८६ किंवा वृक्षाचें फल देंठाला न सोडतां कडू, तुरट, आंबट किंवा अत्यंत मधुर होत असतें. अशी ही काळाची सत्ता अतर्क्य व अदृष्ट आहे. ८७ तोच काल देहाबरोबर नित्य नवा कसा उत्पन्न होतो ! (उत्तर) तो देहाची बाल्य, तारुण्य व वृद्धत्व अशा अवस्था बदलत असतो. ८८ मूढ, चतुर, अशक्त या अवस्था नाश पावत असतात, तेव्हां ‘ पूर्वींचा

तोची ' हें तत्त्वतां । स्फुरे सर्वथा कैसेनी ॥ ८९ ॥ ऐसें कल्पील तुझें मन । ते अर्थीचें निरूपण । अखंड स्फूर्तीचें कारण । स्वयें श्रीकृष्ण सांगत ॥ ४९० ॥

सोयं दीपोऽर्चिषां यद्वत् स्रोतसां तदिदं जलम् । सोऽयं पुमानिति नृणां मृषा गीर्धीर्मृषायुषाम् ॥ ४४ ॥

दीपज्वाळा होती जाती । अग्नि जैसा पूर्वस्थिती । यालागीं तोचि दीपू म्हणती । ऐशा युक्ती उद्धवा ॥ ९१ ॥ प्रवाह वाहती कल्लोळ । परी अखंड एकचि जळ । यालागीं म्हणती सकळ । तेंचि जळ या हेतू ॥ ९२ ॥ तेवीं देहीं वयसा होती जाती । आत्मा अखंड अनुस्यूती । तोचि मी हे स्फुरे स्फूर्ती । या उपपत्ती उद्धवा ॥ ९३ ॥ म्हणसी मीपणें अहंकार रूढ । तोही अज्ञानत्वें जडमूढ । त्यासी प्रकाशक आत्मा दृढ । मीपणें अखंड वस्तुत्वें स्फुरे ॥ ९४ ॥ येथ देहासीचि जन्ममरण । आत्मा अखंडत्वें परिपूर्ण । येथ देहात्मबुद्धीचें जें मीपण । ते वाचा जाण अतिमिथ्या ॥ ९५ ॥ विषयांची विषयसिद्धी । देहीं जे कांहीं देहबुद्धी । तेही मिथ्या जाण त्रिशुद्धी । भवबंधीं स्थापक ॥ ९६ ॥ कर्मभूमीं नरदेहाऐसें । निधान लाधलें अनायासें । तेथींचेनिही आयुष्यें । जे विषयविलासें विगुंतले ॥ ९७ ॥ तो अमृत विकूनि कांजी प्याला । रत्नें देऊनि कोंडा घेतला । पर्वत फोडूनि टोळ धरिला । गज विकिला इटेसाठीं ॥ ९८ ॥ डोळे फोडोनि काजळ ल्याला । नाक कापूनि शिमगा खेळला । तैसा नरदेहा नाडला । नाश केला आयुष्याचा ॥ ९९ ॥ वेंचितां धन लक्षकोटी । आयुष्यलक्षणाची नव्हे भेटी । तेंही वेंचिलें विषयासाठीं । हतायु करंटीं अतिमूढें ॥ ५०० ॥ मुख्य देहोचि कल्पनिक

तोच मी ' हें तरी कशावरून मनांत येतें ! ८९ असें जर तुझें मन कल्पना करील तर त्या अखंड स्फूर्तीचें कारण सांगण्यासाठीं श्रीकृष्ण आतां त्याचेंच निरूपण करीत आहे. ४९०.

—" तर मग ' तेंच हें शरीर ' अशी प्रत्यभिज्ञा कशी होते ? " ' तसेंच सादृश्य दिसत असल्यामुळें ती होते,' असें उत्तर—

अर्चिषां सादृश्यात् यद्वत् सः अयं दीपः-दीप ज्योतीच्या सादृश्यामुळें ज्याप्रमाणें तोच हा दीप, अशी प्रत्यभिज्ञा होते, **स्रोतसां सादृश्यात् यथा तत् इदं जलं**—प्रवाहाच्या सादृश्यामुळें ज्याप्रमाणें तेंच हें जल अशी प्रत्यभिज्ञा होते, तथा **सः अयं पुमान् इति मृषायुषां नृणां गीः च मृषा**-त्याप्रमाणें ' तो हा पुरुष ' अशी, ज्याचें आयुष्य व्यर्थ आहे, अशा अविवेकी पुरुषांची बुद्धि व भाषा मिथ्या आहे. ४४.

दिव्याची ज्योत प्रतिक्षणीं उत्पन्न होते व जाते, तरी त्यांतील अग्नि आपल्या पूर्व स्थितींत कायम असतो. यास्तव हे उद्धवा ! ' तोच हा दिवा ' असें म्हणतात. ९१ नदीच्या प्रवाहावर कितीहि जोरानें लाटा उसळत असल्या तरी त्यांतील जल अखंड एकरूपच असतें. म्हणून त्याला सगळे लोक ' तेंच हें जल ' असें म्हणतात. ९२ उद्धवा ! त्याचप्रमाणें देहालाहि अनेक अवस्था येतात व जातात; पण त्यांतील आत्मा अखंडत्वानें सर्वत्र भरलेला असतो, त्यामुळें तोच ' मी ' असा अनुभव येतो. ९३ यावर तूं जर असें म्हणशील कीं, ' मी-'पणानें अहंकार रूढ झाला आहे, तर तोहि अज्ञानत्वानें जड-मूढ आहे. त्याचा प्रकाशक आत्मा आहे. तोच नेहमीं परब्रह्म स्वरूपानें स्फुरण पावतो. ९४ परंतु जन्म-मरण देहालाच असतें; आत्मा सर्वव्यापित्वामुळें परिपूर्ण आहे. देहच मी असा जो अभिमान, तो मिथ्या होय. ९५ विषयांची कार्यसिद्धि व देहावर ' मीपणा ' ठेवणें या दोन्ही गोष्टी भवबंधांत टाकणाऱ्या व मिथ्या आहेत. ९६ या मृत्युलोकांत मनुष्याला जन्मासारखा ठेवा अनायासें लाभला असतां त्यांतील आयुष्य जे विषयोपभोगांत घालवितात ९७ त्यांनीं अमृत विकून पेज घेतली, रत्नें देऊन कोंडा घेतला, पर्वत फोडून टोळ पडकला, हत्ती देऊन विट घेतली, ९८ डोळे फोडून काजळ घातलें, नाक कापून शिमगा केला व मनुष्यजन्म फुकट घालवून आयुष्याचा नाश केला, असें समजावें. ९९ कोट्यवधि धन खर्च केलें तरीहि पळभर आयुष्य मिळत नाहीं, असें अमूल्य आयुष्य ते आत्मघातकी अभागी जन मूर्खपणानें विषयांसाठीं खर्च करितात. ५०० देहच मुख्य काल्पनिक

जाण। तेथील काल्पनिक अभिमान। तें हें देहबुद्धीचें मीपण। लावी दृढ बंधन जगासी ॥ १ ॥ तें सांडितां देहाचें मीपण। कैंचें जन्म कैंचें मरण। तेव्हां संसारूचि नाहीं जाण। भवबंधन मग कैंचें ॥ २ ॥ जैसा मिथ्या बागुलाचा भेवो। बाळकें सत्य मानिला पहा हो। तैसा मृषा काल्पनिक देहो। सत्यत्वें पहा हो मानिला ॥ ३ ॥ मिथ्या देहो आणि देहबुद्धी। त्यासी पुढे कैंसी जन्मसिद्धी। मिथ्याभूतांसी नव्हे वृद्धी। तेविखींची विधि हरि बोले ॥ ४ ॥

मा स्वस्य कर्मबीजेन जायते सोऽप्ययं पुमान्। म्रियते वाऽमरो भ्रान्त्या यथाग्निर्दारुसंयुतः ॥ ४५ ॥

देहात्मवादें देहाभिमान। जनीं वासनाबीज गहन। तेणें स्वसंकल्पें आपण। मानी जन्ममरण नसतेंचि ॥ ५ ॥ तेणें देहाभिमानें आपण। अहं कर्म कर्ता क्रियाचरण। निष्कर्मा कर्मबंधन। अमरा जन्ममरण आरोपी ॥ ६ ॥ थिल्लराचेनि जाहलेपणें। त्यांत सूर्याचे जन्म मानणें। थिल्लरनाशें सूर्याचें जिणें। नासलें म्हणे बाळक ॥ ७ ॥ तेवीं अजन्म्यासी जन्मकर्म। मानिती तो मायिक भ्रम। येचिविषयीं पुरुषोत्तम। दृष्टांत सुगम सांगत ॥ ८ ॥ जैसा अग्नि अजन्मा अव्यक्त। त्यासी काष्ठीं जन्मला म्हणत। दिसे काष्ठाकारें आकारवंत। काष्ठनाशें मानीत नाश त्यासी ॥ ९ ॥ येथ देहासींच जन्मनाश। आत्मा नित्य अविनाश। देहअवस्था नवविलास। स्वयें हृषीकेश सांगत ॥ ५१० ॥

आहे. तेव्हां त्या देहावरील अभिमानहि काल्पनिकच होय. तो हा देहाभिमानाचा 'मीपणा' जगाचें दृढ बंधन लांवितें. १ तो देहावरील अभिमान एकदां सोडला कीं, मग जन्म कोठचा आणि मरण कोठचें! संसारच जेथें नाहीं तेथें भवबंधन तरी कोठचें! २ लहान बालकानें बागुलबुवाची भीति जशी खरी मानावी, तसा हा मिथ्या काल्पनिक देह लोक सत्य मानितात. ३ देह व देहाभिमान हीं जर मिथ्या आहेत, तर त्यांस जन्म कसा संभवतो! कारण मिथ्या पदार्थाची वाढ केव्हांहि होत नसते! याविषयींचें स्पष्टीकरण हरि आतां करीत आहे. १०४.

— "अहंपण, देहादि अध्यासवान् पुरुषालाच **कर्म**, जन्म व मरण आहे, दुसऱ्या कोणालाहि नाहीं, **ही व्यवस्था संभवत नाहीं.** कारण घटाचें पुरुषभेदानें सत्त्वहि आहे आणि असत्त्वहि आहे." अशी आशंका घेऊन भगवान् 'अज्ञालाहि **वस्तुतः** त्यांचा अभाव आहे' असें सांगून तिचें **समाधान** सांगतात—

यथा दारुसंयुतः **अग्निः**—ज्याप्रमाणें महाभूततेजोरूप अग्नि कल्पपर्यंत एकरूपानें स्थित असला तरी काष्ठांचा संयोग व **वियोग** यांच्या योगानें जन्म व नाश यांस प्राप्त होतो, त्याप्रमाणें, **स्वस्य कर्मबीजेन सः अपि पुमान् न एव जायते म्रियते**—आपल्या **कर्मरूप** बीजानें तोहि पुरुष वस्तुतः उत्पन्न होत नाहीं व मरत नाहीं तर, **अयं भ्रान्त्या जायते इव अमरः अपि म्रियते इव**—हा अज असूनहि भ्रांतीनें जणुंकाय उत्पन्न होतो व अमर असूनहि जणुंकाय मरतो. ४५.

'देहच मी आत्मा' अशा कल्पनेमुळें देहाभिमान उत्पन्न होतो. त्यामुळें गूढ वासनाबीज उद्भवतें आणि आपल्या संकल्पानेंच मिथ्या जन्म-मरण खरें मानलें जातें. ५ त्या देहाभिमानामुळेंच हा मी कर्म, कर्ता, कर्माचरण, निष्कर्मालाहि कर्मबंधन आणि अमराच्या ठिकाणीं जन्म-मरण आरोपितो. ६ लहान बालक जसें डबक्यांत पाणी सांचलें म्हणजे त्यांतील सूर्यप्रतिबिंब पाहून सूर्य उत्पन्न झाला, असें म्हणतें आणि पाणी संपलें म्हणजे सूर्यच गेला असें समजतें, ७ त्याचप्रमाणें अज आत्म्याला जन्मकर्म मानणें हा केवल मिथ्या भ्रम आहे. याविषयीं श्रीकृष्ण एक सोपा दृष्टान्त सांगत आहे. ८ अग्नि अजन्मा असून अव्यक्त आहे. तो लांकडांत व्यक्त झाला म्हणजे तो जन्मला असें समजतात. लांकडाच्या आकाराप्रमाणें तो आकारानें युक्त दिसतो. लांकडें जळून गेलीं असतां अग्नि विझाला असें म्हणतात. ९ त्याप्रमाणेंच देहाला जन्म व नाश आहे. आत्मा नित्य अविनाशी आहे. आतां देहाच्या नऊ अवस्था श्रीकृष्ण सांगत आहे. ५१०.

निषेकगर्भजन्मानि बाल्यकौमारयौवनम् । वयोमध्यं जरा मृत्युरित्यवस्थास्तनोर्नव ॥ ४६ ॥

देहींच्या अवस्था त्या नव । ऐक तयांचाही स्वभाव । भिन्नविभागवैभव । यथागौरव सांगेन ॥ ११ ॥ पितृदेहीं पावोनि शुक्रत्व । तेथूनि जननीजठर प्राप्त । त्या नांव निषेक बोलिजेत । देहींची हे येथ प्रथमावस्था ॥ १२ ॥ जननीजठरीं रुधिरयुक्त । मुसावोनि खोटी होत । क्षणक्षणां वृद्धि प्राप्त । गर्भ ते येथ दुजी अवस्था ॥ १३ ॥ प्रसूतिवाताच्या आघातीं । उदराबाहेर उत्पत्ति । त्या नांव जन्म बोलती । जाण निश्चितीं तिजी अवस्था ॥ १४ ॥ अतिशयें आवडे स्तनपान । मुख्यत्वें माताचि प्रधान । रुदनाचें बळ संपूर्ण । ते चौथी जाण बाल्यावस्था ॥ १५ ॥ मळमूत्रीं लोळे अज्ञान । गूढेंद्रिय विवेकशून्य । गोड गोजिरें कलभाषण । पंचहायन बाल्यावस्था ॥ १६ ॥ इंद्रियीं चेतना वाढत । परी पोटीं नाहीं विषयस्वार्थ । खेळावरी आसक्त चित्त । ते पांचवी येथ कुमारावस्था ॥ १७ ॥ याउपरी तरुणपण । इंद्रियसामर्थ्य संपूर्ण । मी शहाणा मी सज्ञान । देहीं देहाभिमान मुसमुशी ॥ १८ ॥ तेथ स्त्रीकाम आवडे चित्तीं । धनकामाची अतिप्रीती । देहगेहांची आसक्ती । नामरूपांची ख्याती लौकिकीं मिरवी ॥ १९ ॥ श्रीमदें गर्वित मानस । स्त्रीपुत्रांचा अतिउल्हास । तृष्णा दुर्धर अतिसोस । कामक्रोधांचा बहुवस वळसा भोंवे ॥ ५२० ॥ न साहे नोकिलेपण । 'तूं' म्हणतां टाकी प्राण । ते सहावी अवस्था जाण । तरुणपण अनर्थ ॥ २१ ॥ पंधरापासोनि पंचवीस । पूर्ण तरुणपणाचा पैस । तेथ नानाविकारी मानस । नांदवी सावकाश देहाभिमान ॥ २२ ॥ चाळिसांपासोनि साठीवरी । देहीं उत्तरवयसा पुरी । झरडी पडों लागे शरीरीं । इंद्रियशक्ति करी ग्राशन काळ ॥ २३ ॥ क्षीणपणाचा

—वर ज्या अवस्थांचा प्रसिद्ध असल्याप्रमाणेंच उल्लेख केला आहे, त्यांचा विस्तार करितात—

निषेकगर्भजन्मानि–उदरांतील गर्भरूप प्रवेश, गर्भाशयांतील वाढ, जन्म, **बाल्य-कौमार-यौवनं**–पचम वर्षांपर्यंत बाल्य, पुढें सोळा वर्षांपर्यंत कौमार, पन्नास वर्षे पर्यंत तारुण्य, **वयोमध्यं**–पन्नासपासून साठ वर्षांपर्यंत वयोमध्य, **जरा-मृत्युः**–साठ-वर्षांपुढें जरा व पुढें मृत्यु, **इति तनोः नव अवस्था**–अशा शरीराच्या नऊ अवस्था आहेत. ४६.

देहाच्या एकंदर नऊ अवस्था आहेत, त्यांचाहि प्रकार ऐक. त्या प्रत्येकीचे भिन्न-भिन्न विभागहि यथायोग्य सांगतों, ते ऐक. ११ पितृशरीरांत वीर्यरूपाला प्राप्त होऊन मातृदेहांत प्रवेश करणें याला निषेक असें म्हणतात. ही देहाची पहिली अवस्था आहे. १२ नंतर मातेच्या शरीरांत रक्त गोठून त्याचा पिंड बनून तो प्रतिक्षणीं वाढत जाणारा गर्भ होतो. ही दुसरी अवस्था. १३ नंतर प्रसूतिवाताच्या योगानें गर्भाशयांतून बाहेर पडणें, यालाच जन्म म्हणतात. ही तिसरी अवस्था- १४ स्तनपानाची अत्यंत आवड, माताच प्रेमाचें स्थान व रुदनाचें पूर्ण बळ, असें जें बाल्य ती देहाची चवथी अवस्था होय. १५ केवळ अज्ञानानें मल-मूत्रांत लोळणें, विवेकशून्य–मूढ असणें, ज्या अवस्थेंत इंद्रियशक्ति गूढ असते, विवेक नसतो, भाषण मधुर व बोबडें असतें, अशी ही देहाची पंचवार्षिक बाल्यावस्था जाणावी. १६ इंद्रियांची शक्ति वाढली तरी विषयासक्ति नसणें, खेळांतच चित्त गुंतलेलें असणें ही पांचवी कुमारावस्था जाणावी. १७ याच्या पुढील तारुण्यांत इंद्रियें पूर्णपणें प्रबल होतात आणि 'मी शहाणा, मी ज्ञानी' असा देहाभिमान देहामध्यें मुसमुसूं लागतो. १८ त्या वयांत स्त्रीची आवड उत्पन्न होते; धनलोभ सुटतो; देह-गृह इत्यादिकांवरील आसक्ति वाढते; लौकिकांत नाम-रूपाची, कीर्ति मिरविण्याची हौस वाटते; १९ द्रव्यमदानें मन गर्वानें युक्त होतें, स्त्री-पुत्रांवर अत्यंत प्रेम जडतें; आशा-तृष्णा वाढते; काम-क्रोधांचा फेरा फिरूं लागतो; ५२० अपमान असह्य होतो; कोणी नुस्तें 'तूं' म्हटलें कीं, प्राण घ्यावासा वाटतो. ही तारुण्याची अनर्थावह सहावी अवस्था होय. २१ पंधराव्या वर्षांपासून पंचवीस वर्षेपर्यंत तरुणपणाची वाढ होत असते. त्या अवधींत देहाभिमान मनामध्यें नाना प्रकारचे विकार उत्पन्न करीत असतो. २२ पुढें चाळीसपासून साठ वर्षांपर्यंत देहाच्या उत्तरवयाला आरंभ होऊन अंगावर सुरकुत्या पड-तात व शरीर क्षीण होत जातें. त्याच्या इंद्रियांचें सामर्थ्य काळ नाहींसें करितो. २३ जेव्हां काळ क्षीणता आणण्यास आरंभ

सुमुहूर्त । काळ आरंभ करी जेथ । ते हे उत्तरावस्था येथ । जाण निश्चित सातवी ॥ २४ ॥ तिची हातधरणी जरा । कांपवीतसे सुभटां नरां । भोग न साहे शरीरा । इंद्रियव्यापाराहारासी ॥ २५ ॥ अस्तव्यस्त केला शरीरवेश । दांताळी पाडिली वोस । भेणें पालटे केश । धाकें सीस कांपत ॥ २६ ॥ शरीर जरा करी क्षीण । तरी विषयावस्था अतिगहन । चिंता अनिवार दारुण । तृष्णा अपूर्ण सर्वदा ॥ २७ ॥ तेज सांडूनि जाय नयना । टाळी पडोनि ठाती काना । मुखीं लागे चोरपान्हां । तरी देहाभिमाना वाढवी ॥ २८ ॥ जरा पावलिया निजसंधी । अनिवार येती आधिव्याधी । महामोहें व्यापिजे बुद्धी । विवेक त्रिशुद्धी बुडाला ॥ २९ ॥ पायां पडे वेंगडी । आधार टेंकण लांकुडी । वाचा लफलफी जडत्वें गाढी । हाले होंटाची जोडी उंदिरप्राय ॥ ५३० ॥ डोळां चिपडीं तोंड भरे । नाकींची लोळी वोंठीं उतरे । मुखींचे लाळेचिया धारें । थिबथिबिजे उरें चिकटोनि ॥ ३१ ॥ चुंबन मागेना तोंडाप्रती । ती थुंका म्हणोनि दूर पळती । उसंत नाहीं खोकल्याहातीं । श्वास कास उठती अनिवार ॥ ३२ ॥ शरीरीं थरकंप उठी । तरी देहाभिमान दृढ पोटीं । अवघ्यांतें म्हणे धाकुटीं । सांगे जुनाट गोष्टी मोठमोठ्या ॥ ३३ ॥ अधोवातार्चें वावधान । अनिवार सुटे जाण । जीवें जितां विटंबण । हे जरा जाण आठवी अवस्था ॥ ३४ ॥ जेवीं सुईमागें दोरा जाण । तेवीं जरेसवें असे मरण । जरा शरीर पाडी क्षीण । तंव वाजे निशाण मृत्यूचें ॥ ३५ ॥ देहींच्या तुटल्या नाडी । वाचा हों लागे बोबडी । तरी देहाची धरी गोडी । अधिक आवडी स्त्रीपुत्रांची ॥ ३६ ॥ मजमागें हें अनाथें । कोण सांभाळील यातें । पोटासि धरोनि त्यांतें । रडे बहुतें आक्रोशें ॥ ३७ ॥ द्रव्यलोभ अतिकठिण । अंतीं न वेंची आपण । दूरी करूनि इतर जन । सांगे उणखूण ठेव्याची ॥ ३८ ॥ नवल वासनाविंदान । विसरोनि देहाचें स्मरण । सर्वस्वें जे धरिजे

करितो तेव्हां ती सातवी उत्तरावस्था होय, असें जाणावें. २४ तिची मैत्रीण जरा शूर पुरुषांनाहि कांपविते. इंद्रियांचें व्यापार शिथिल करिते. त्यामुळें शरीराला सुखोपभोगहि घेतां येत नाहींत. २५ शरीराची रचना अव्यवस्थित होते. दांतांच्या जागीं खिंडी पडतात. भीतीनें केस पांढरे होतात. मस्तक कांपूं लागतें. २६ जरेनें सगळें शरीर क्षीण होतें. इतकें जरी झालें तरी त्याची विषयेच्छा दांडगी असते. अनिवार भयंकर चिंता लागून रहाते, तृष्णा सर्वदा अपुरीच रहाते. २७ नेत्रांतील तेज नाहींसें होतें. कानांत दट्टे बसून ऐकूं येईनासें होतें. तोंडांतून लाळ गळूं लागतें. तरीहि देहाभिमान वाढतच असतो. २८ जरेचा अम्मल बसला कीं, अनेक मानसिक व शारीरिक दुःखें उपजतात. महामोहानें बुद्धि व्यापून जाते. विवेक खरोखर बुडून जातो. २९ चालतांना पायांत पाय गुंतून ते अडखळूं लागतात. तो आधाराला काठी घेऊन ती टेकीत चालतो. जीभ जड झाल्यामुळें बोलतांना शब्द स्पष्ट उमटत नाहीं. दोन्ही ओठांची जोडी उंदरासारखी हालत असते. ५३० डोळ्यांत चिपडें येतात. तोंडांतून लाळ गळते. नाकांतून येणारा शेंबूड ओंठावरून वहात असतो. तोंडांतील गळणाऱ्या लाळीनें सगळें तोंड भिजून चिकट होतें. तो चुंबन मागूं लागला असतां त्याची स्त्री व पुत्र ‘घाण’ म्हणून त्याच्यापासून दूर पळतात. खोकल्याची ढांस सुरू झाली कीं, ती श्वास घेण्यापुरतीहि थांबत नाहीं. दम चढतो. ३२ देहाला कंप सुटतो. इतकें झालें तरी मनांतील दृढ देहाभिमान असतोच. सगळ्या लोकांना तो ‘ कालचीं पोरें ’ म्हणतो आणि मोठमोठ्या जुनाट गोष्टी सांगतो. ३३ अपानवायूचें वाद्य सतत वाजत असतें. याप्रमाणें जिवंतपणींच जीवाची विटंबना करणारी जरा म्ह० वृद्धपणा ही देहाची आठवी अवस्था जाणावी. ३४ सुईच्या मागें जसा दोरा असतो तसा जरेच्या मागें मृत्यु उभाच असतो. जरा शरीराला जेव्हां दुर्बल करिते तेव्हां तो मृत्यूचा नगाराच वाजूं लागतो. ३५ शरीरांतील नाड्या आंखडत गेल्या म्हणजे जीभ बोबडी पडते. तरीहि त्याला देहाची गोडी असतेच. त्याची स्त्रीपुत्रांवरील प्रीति अधिकच वाढते. ३६ त्यांना पोटाशीं धरून ‘ माझ्या मागें हीं अनाथ होतील, यांचा संभाळ कोण करील ’ असें म्हणून तो मोठ्यानें आक्रोश करून रडतो. ३७ त्याचा द्रव्यलोभ तर फार कठिण. मरणाच्या वेळींहि तो त्यांतील एक दमडीहि खर्च करीत नाहीं. इतर परक्या माणसांना दूर करून तो हळूच आपल्या ठेवींच्या खाणाखुणा सांगतो. ३८ वासनेचा चमत्कार तर

आठवण । तेंचि आपण दृढ होय ।। ३९ ।। या देहाची निःशेष आठवण । ते नाठवणें सर्वेचि जाण । चेतनासहित जाय प्राण । या नांव मरण देहाचें ।। ५४० ।। एवं गर्भादि मरणांता । या देहींच्या नव अवस्था । येथ आत्म्याची अलिप्तता । स्वभावतां देहासी ।। ४१ ।। देह अवस्था विकारवंता । आत्मा अलिप्त अविकारता । म्हणसी देहविकारा जडता । यासी विकारता घडे केवीं ।। ४२ ।। सूर्य थापटूनि जन । कदा नुठवी आपण । तो प्रकाशतांचि जाण । सहजें जन चेवती ।। ४३ ।। त्या जनांची कर्मकर्तव्यता । सूर्याअंगीं न लगे सर्वथा । तेवीं प्रकाशोनि विकारता । अलिप्त तत्त्वतां निजात्मा ।। ४४ ।। झालिया सूर्यकिरण प्राप्त । जेवीं अग्नि स्रवे सूर्यकांत । तेणें याग कां दाघ होत । त्या कर्मातीत सूर्य जैसा ।।४५ ।। तेवीं चित्प्रकाशें मन । शुभाशुभ कर्में करी जाण । त्या मनोविकारा चिद्घन । अलिप्त जाण निजात्मा ।। ४६ ।। येथ मनःकृत विकार पूर्ण । मनःकृत कर्माकर्म जाण । मनःकृत जन्ममरण । स्वर्गनरकगमन मनःकृत ।। ४७।। मनःकृत लक्ष्यालक्ष्य । मनःकृत बंधमोक्ष । तेंचि निरूपण प्रत्यक्ष । श्रीकृष्ण अधोक्षज सांगत ।। ४८ ।।

एता मनोरथमयीर्ह्यन्यस्योच्चावचास्तनूः । गुणसङ्गादुपादत्ते क्वचित्कश्चिज्जहाति च ।। ४७ ।।

संसारविकाराचें भान । अभिमानयुक्त करी मन । स्वर्गनरक गमनागमन । देहाभिमान भोगवी ।। ४९ ।। आत्मा याहूनि सहजें भिन्न । चिन्मात्रैक चिद्घन । तेथ आतळों न शके मन । शुद्धीं अभिमान असेना ।। ५५० ।। मन अभिमान प्रसवे माया । अभिमानें गुण आणिले आया । गुणीं मायिक केली काया । विकारसामग्रियासमवेत ।। ५१ ।। जैशी देहापाशीं छाया । तैशी स्वरूपीं मिथ्या माया । जेथ

फारच विलक्षण आहे. देहाला विसरून सर्वस्वानें ज्यावर आसक्ति ठेवितो, तेंच तो स्वतः होतो. ३९ ज्या देहाची पूर्ण आठवण होती त्याचेंच एकाएकीं विस्मरण होतें. त्यावेळीं चेतनेसह प्राण निघून जातो. यालाच देहाचें मरण असें म्हणतात. ५४० याप्रमाणें गर्भापासून मरणापर्यंत देहाच्या निषेक, गर्भ, जन्म, बाल्य, कौमार, यौवन, तारुण्य, जरा व मृत्यु अशा नऊ अवस्था आहेत. या देहापासून आत्मा स्वभावतःच अलिप्त आहे. ४१ देहाच्या अवस्था विकारवानाला आहेत आणि आत्मा निर्विकार असल्यामुळें त्यापासून अलिप्त आहे. तेव्हां जड असलेल्या देहाला विकारत्व कसें संभवतें, असें जर म्हणशील तर सांगतों. ४२ सूर्य उगवला म्हणजे तो कांहीं लोकांना थापटून जागें करीत नाहीं, तर तो प्रकाशतांच लोक सहजच उठतात. ४३ त्या लोकांचें कर्म व व्यवहार सूर्याला कधीं लागत नाहींत. त्याचप्रमाणें विकारी पदार्थ प्रकाशित करून हा आत्मा स्वतः अलिप्तच रहातो. ४४ सूर्यकिरणाचा संयोग होतांच सूर्यकांत मण्यांतून अग्नि उत्पन्न होतो आणि त्या अग्नीनें यज्ञ व दहन हीं दोन्हीं कार्यें होतात, परंतु सूर्य जसा त्या कर्मांपासून अलिप्त असतो, ४५ त्याप्रमाणें चैतन्याच्या प्रकाशानें मन शुभ-अशुभ कर्में करितें. परंतु चैतन्यरूपी सूर्य या मनोविकारांपासून अलिप्तच असतो. ४६ मनाचे हे सर्व विकार आहेत. कर्म-अकर्म, जन्म-मरण स्वर्ग-नरकगमन, ४७ लक्ष्य-अलक्ष्य, बंध-मोक्ष हीं सर्व मनानें कल्पिलेलीं आहेत. याचेंच निरूपण अधोक्षज श्रीकृष्ण करीत आहे. ५४८

—देहसंबंधामुळें जन्म-मरणादि होतात, या उपपादित अर्थाचा उपसंहार करितात—

अन्यस्य एताः **मनोरथमयीः हि उच्चावचाः तनूः**—जीव देहाच्या ह्या केवळ मनोरथमात्र उच्च नीच अवस्था, **गुणसंगात् उपादत्ते**—प्रकृतीच्या अविवेकामुळें स्वीकारितो. **कश्चित् क्वचित् जिहासति च**—पण कोणी एखादाच जीव परमेश्वराच्या अनुग्रहानें ' अवस्थावान् देहाचा द्रष्टा जो आत्मा तो अवस्थावान् नाहीं ' अशा विवेकज्ञानानें त्यांचा त्याग करितो.

अभिमानयुक्त मन संसारविकाराचें भान उत्पन्न करितें. स्वर्ग व नरक यांत जाणेंयेणेंहि देहाभिमानामुळेंच तें भोगवितें. ४९ आत्मा यांहून स्वभावतःच भिन्न आहे. केवळ ज्ञानरूप, चिदात्म्यामध्यें मन प्रवेश करूं शकत नाहीं. शुद्ध तत्त्वांत अभिमान राहूं शकत नाहीं. ५५० मायाच मन व अभिमान यांना उत्पन्न करिते आणि अभिमान गुणांना व्यक्त करितो, ते गुणच मायात्मक विकाराच्या सामग्रीसह देह उपजवितात. ५१ देहाबरोबर जशी त्याची

जन्ममरणेंसीं काया । रिघावया ठावो नाहीं ॥ ५२ ॥ आत्मा शुद्ध काया मलिन । काया जड आत्मा चिद्घन । अज अव्यय आत्मा परिपूर्ण । जन्ममरण देहासी ॥ ५३ ॥ तिनी गुण तिनी अवस्था । कार्य कर्म अहंकर्ता । हें देहाभिमानाचें माथां । आत्मा सर्वथा अलिप्त ॥ ५४ ॥ यापरी विकारांहून । आत्मा चिद्रूपें सहज भिन्न । म्हणशी जीवास देहाभिमान । तेंही कथन अवधारीं ॥ ५५ ॥ जीव अलिप्त मायागुणीं । ऐक सांगेन ते काहाणी । स्फटिक ठेविजे जैशा वर्णीं । तद्रूपपणीं तो भासे ॥ ५६ ॥ हो कां तद्रूपपणेंही दिसतां । स्फटिक अलिप्त निजशुद्धता । तेवीं सत्त्वादि गुणीं क्रीडतां । जीव तत्त्वतां अलिप्त ॥ ५७ ॥ स्फटिक काजळीं दिसे काळा । परी तो काळेपणावेगळा । तेवीं तमोगुणें जीवू मैळा । दिसोनि निराळा तमेंसीं ॥ ५८ ॥ स्फटिक आरक्तीं आरक्तकिळा । दिसोन आरक्ततेवेगळा । तेवीं रजोगुणीं राजसलीळा । भोगूनि वेगळा जीवात्मा ॥ ५९ ॥ स्फटिक श्वेतवर्णीं दिसे श्वेत । परी तो श्वेतपणा अलिप्त । तेवीं सत्त्वीं दिजे ज्ञानवंत । गुणज्ञानातीत जीवात्मा ॥ ५६० ॥ त्रिगुण गुणेंसीं अलिप्तता । दाविली जीवशिवांची तत्त्वतां । देहीं असोनि निःसंगता । ऐक आतां सांगेन ॥ ६१ ॥ जेवीं घटामाजील जीवन । घटीं चंद्रबिंब आणी जाण । तेवीं शुद्धासी जीवपण । देहाभिमान देहीं देखे ॥ ६२ ॥ घटनिश्चळत्वें बिंब निश्चळ । घटचंचलत्वें तें चंचळ । तेवीं देहाच्या अवस्था सकळ । मानी केवळ जीवात्मा ॥ ६३ ॥ घटीं कालविल्या अंजन । तरी तें काळें होय जीवन । परी बिंबप्रतिबिंबां जाण । काळेपण लागेना ॥ ६४ ॥ तेवीं देहाची सुखदुःखकथा । कां पापपुण्यादि जे वार्ता । नाहीं जीवशिवांच्या माथां । देह अहंता ते भोगी ॥ ६५ ॥ ये घटींचें जळ ते घटीं भरित । चंद्रबिंब असे त्याहीआंत । तेवीं या देहींचा

छाया असते, तशी आत्मस्वरूपांत मिथ्या माया आहे. अशा स्वरूपांत जन्म-मरणासह देहाचा प्रवेश कसा होणार! ५२ आत्मा शुद्ध आहे व देह मलिन आहे. देह जड आहे व आत्मा चैतन्यस्वरूप आहे. आत्मा अज, अव्यय व परिपूर्ण आहे आणि देहाला जन्म-मरण आहे. ५३ सत्त्वादि तीन गुण; जाग्रदादि तीन अवस्था; कार्य, कर्म, अहंकार हे सर्व देहाभिमानाचे विकार आहेत. आत्मा या सर्वांहून अलिप्त आहे. ५४ याप्रमाणें आत्मा ज्ञानस्वरूपामुळें (या विकारांहून) सहजच भिन्न आहे. तूं जर म्हणशील कीं, जीवाला देहाभिमान आहे, तर त्याविषयींहि सांगतों, ऐक. ५५ जीव मायेच्या गुणापासून अलिप्त आहे. त्याचा प्रकार सांगतों, पहा. स्फटिक ज्या रंगावर ठेवावा, त्या रंगाचा भासतो; ५६ पण तो जरी तद्रूप दिसला तरी वास्तविक तो त्याहून अलिप्त असून त्याचा स्वच्छपणा जसा कायमच असतो, त्याप्रमाणें सत्त्वादि गुणांत जीव जरी वावरत असला तरी वस्तुतः तो त्यापासून अलिप्तच असतो. ५७ स्फटिक काजळावर ठेविला असतां काळा दिसतो, पण तो काळ्या रंगाहून जसा भिन्न असतो. तसा हा जीव तमोगुणाच्या संगतीनें मलिन दिसला तरी तमोगुणाहून भिन्नच असतो. ५८ तांबड्या रंगावर ठेविलेल्या स्फटिकाची प्रभा तांबडी दिसूं लागते; पण तो जसा तांबडेपणाहून वेगळा असतो, त्याप्रमाणें रजोगुणाशीं संयुक्त होऊन जीव राजस विलास भोगीत असला तरी जीवात्मा त्यापासून भिन्नच असतो. ५९ स्फटिक पांढऱ्या रंगाबरोबर पांढरा दिसतो; पण त्या रंगापासून जसा अलिप्त असतो, तसा सत्त्वगुणानें युक्त असलेला जीव ज्ञानवान् दिसतो; पण वस्तुतः जीवात्मा गुणाहून व ज्ञानाहून वेगळाच असतो. ५६० याप्रमाणें जीवात्मा तीन गुणांपासून अलिप्त कसा असतो, हें दाखविलें. आतां देहांत राहून जीव मुक्त कसा असतो तें सांगतों, ऐक. ६१ घटांतील जल जसें चंद्राचें प्रतिबिंब घटांत आणितें, त्याप्रमाणें शुद्ध आत्म्याला देहाभिमानामुळें देहांत जीवपणा प्राप्त होतो. ६२ घट स्थिर असला तर त्यांतील प्रतिबिंबहि स्थिर असतें. घट हलतांच त्यांतील बिंबहि चंचल होतें. त्याप्रमाणें या देहाच्या सर्व अवस्था जीवाच्याच आहेत, असें भासतें. ६३ घटांतील जलांत काजळ मिसळलें असतां सर्व जल काळें होतें, पण त्यांतील बिंबाला किंवा प्रतिबिंबाला कांहीं तो काळेपणा जसा लागत नाहीं, ६४ त्याप्रमाणें देहांतील सुख-दुःखादि अवस्था व पाप-पुण्यादि कर्म जीवाच्या किंवा आत्म्याच्या शिरीं येत नाहीं. अहंकारामुळें देह तें सर्व भोगितो. ६५ एका घटांतील जल दुसऱ्या घटांत ओतलें, तरी त्यांतील प्रतिबिंब जसें कायम असतें, त्याप्रमाणें एका देहांतून दुसऱ्या देहांत जीव प्रवेश करितो. म्हणूनच त्याला जीवात्मा

त्या देहीं जात । जीवात्मा म्हणत या हेतू ।। ६६ ।। चंद्र गगनीं अलिप्त असे । तो मिथ्या प्रतिबिंबें घटीं भासे । तेवीं वस्तु वस्तुत्वें सावकाशें । जीवू हें पिसें देहात्मता ।। ६७ ।। त्रिगुणगुणीं गुणातीत । देही देहसंगा अलिप्त । जीव शिव दोनी येथ । तुज म्यां साद्यंत दाखविले ।। ६८ ।। हें नेणोनियां समस्त । देहात्मवादें जाहले भ्रांत । स्वर्गनरकादि आवर्त । योनी भोगवीत अभिमान ।। ६९ ।। द्विजदेह आरंभूनि येथ । परमेष्ठिदेहपर्यंत । स्वर्गसुख देहें समस्त । भोगवी निश्चित पुण्याभिमान ।। ५७० ।। याहूनियां अधोमुख येथ । द्विजत्वाहूनि खालते जात । नाना दुःखयोनी भोगवित । जाण निश्चित पापाभिमान ।। ७१ ।। येथ पापपुण्यकर्माचरण । तें वाढविताहे जन्ममरण । यांत विरळा सभाग्य जाण । जन्ममरणच्छेदक ।। ७२ ।। ज्यांसी निष्काम पुण्याचिया कोडी । जिहीं स्वधर्म जोडिला जोडी । ज्यांसी भूतदया गाढी । ज्यांची आवडी द्विजभजनीं ।। ७३ ।। जे अहिंसेसि अधिवास । ज्यांचें अद्वैतपर मानस । जे सारासारराजहंस । जन्ममरणांचा त्रास घेतला जिहीं ।। ७४ ।। जे उपनिषदर्थचातक । जे जीवजनकाचे शोधक । जे निजात्मतत्त्वसाधक । जे विश्वासुक भावार्थी ।। ७५ ।। ज्यांसी संतचरणीं सद्भावो । जे गुरुवचनीं विकले पहा हो । त्यांसी देहीं विदेहभावो । मत्कृपें पहा वो पावती ।। ७६ ।। तेंही निजबोधें देहाची बेडी । तोडूनि जन्ममरणांची कोडी । उभवूनि सायुज्याची गुडी । परापरथडी पावले ।। ७७ ।। त्यांसी संसाराचे आवर्त । सर्वथा गेले न लगत । जेवीं बुडण्याचा संकेत । मृगजळाआंत असेना ।। ७८ ।। ऐसे प्राप्त पुरुष येथ । संसारीं नाहीं गा बहुत । हिंडतां अवघ्या जगांत । एखादा कदाचित देखिजे ।। ७९ ।। असो देखिल्याही त्यातें । कोण आहे ओळखतें । उद्धवा जाण निश्चितें । आत्मा येथें दिसेना ।। ५८० ।। जरी निकट भेटला ज्ञाता । त्याचा देह देखिजे

म्हणतात. ६६ वास्तविक आकाशांत चंद्र अलिप्तच असतो; परंतु त्याचें मिथ्या प्रतिबिंब घटांत जसें भासत असतें, त्याप्रमाणें आत्मतत्त्व परब्रह्मस्वरूपानें स्थिर असून, देहात्मसंयोगामुळें हें जीवाचें वेड त्याला लागलेलें असतें. ६७ याप्रमाणें देहधारी जीव या तीन गुणांच्या पलीकडे व देहसंगापासून अलिप्त आहे. अशा प्रकारें मीं तुला जीव व शिव यांचें सविस्तर वर्णन सांगितलें. ६८ हें न कळल्यामुळें लोक देहात्मवादानें भ्रांत झाले आहेत. हा अभिमान त्यांस स्वर्ग नरकादि योनींत ये-जा करावयास लावितो. ६९ पुण्याभिमान द्विजाच्या जन्मापासून आरंभ करून ब्रह्मदेवाच्या देहापर्यंत सर्व प्रकारचें स्वर्गसुख निश्चयानें भोगवितो. ५७० पापाचा अभिमान द्विजाच्या पेक्षां खालच्या योनींत जन्म घेत घेत अधोगतीला नेऊन अत्यंत दुःख भोगवितो. ७१ पाप व पुण्याचें कर्माचरणच जन्म-मरण वाढवीत असतें. यांत जन्ममरणांचा छेद करणारा भाग्यवान् फारच विरळा सांपडतो. ७२ ज्यांनीं निष्काम पुण्यकर्मांच्या राशी पाडल्या आहेत, ज्यांनीं स्वधर्म जोडला आहे, ज्यांच्या अंतःकरणांत दृढ भूतदया भरलेली आहे, ज्यांना ब्राह्मणांच्या सेवेची आवड आहे, ७३ जें अहिंसेचें माहेरघर आहे, ज्यांचें मन अद्वैतयुक्त आहे, जे असारापासून साराला वेगळे करणारे राजहंसच, ज्यांनीं जन्म-मरणाची दहशत घेतली आहे, ७४ जे उपनिषदांचा सिद्धांत चातकासारखे उत्सुकतेनें ग्रहण करणारे, जीवाच्या उत्पादकाला शोधणारे, आत्मत्त्वसाधणारे, भावार्थी, ७५ श्रद्धावान् संतचरणावर सद्भाव ठेवणारे, गुरुवचनाला वाहून घेणारे असतात, ते या देहांत असतांनाच माझ्या कृपेनें विदेहभावाला प्राप्त होतात. ७६ त्या आत्मबोधामुळें देहाचें बंधन सोडून, जन्म-मरणाची गुंतागुंत सोडवून, सायुज्यमुक्तीचा ध्वज उभारून परब्रह्मरूप परतीराला पोंचतात. ७७ मृगजलाच्या प्रवाहांत जसें बुडण्याचें भय नसतें, तसे संसाराचे भोंवरे त्यांना स्पर्श न करितांच निघून जातात. ७८ असे मुक्त पुरुष या संसारांत मुळींच सांपडत नाहींत असें नाहीं, सगळें जगत् पालथें घातलें तर क्वचित् एखादा मुक्त आढळतो. ७९ (सु. गी. ७-३ पृ. १४६) पण असा एखादा मनुष्य जरी दिसला तरी त्याला ओळखणार कोण ! ५८० उद्धवा ! जरी एखादा ज्ञानी जवळच भेटला तरी त्याचा देह प्रपंचांत वागत असलेला दिसतो, आंतील आत्मा

वर्ततां। परी भीतरील निजात्मता। न दिसे सर्वथा कोणासी॥ ८१॥ आत्मा गेला आला म्हणती। शेखीं येणेंजाणें न देखती। तेच विषयींची उपपत्ती। स्वयें श्रीपति सांगत॥ ८२॥

आत्मनः पितृपुत्राभ्यामनुमेयौ भावाप्ययौ। न भवाप्ययवस्तूनामभिज्ञोऽद्वयलक्षणः॥ ४८॥

म्हणती पित्याचा आत्मा गेला। यालागीं पितृदेह नासला। परी पैल तो आत्मा गेला। ऐसा नाहीं देखिला कोणींही॥ ८३॥ म्हणती पुत्रजन्में आत्म्यासी जन्म। करितां पुत्राचें जातककर्म। देखिजे देहाचा संभ्रम। आत्मा दुर्गम दिसेना॥ ८४॥ येथ आत्म्यासी येणेंजाणें। सर्वथा नाहीं पूर्णपणें। देहासीचि जन्ममरणें। येणेंजाणें दृष्टांतें॥ ८५॥ प्रत्यक्ष देहासी जन्मनाश। आत्मा साक्षित्वें अविनाश। येचि अर्थीं विशद विलास। स्वयें हृषीकेश सांगत॥ ८६॥

तरोर्बीजविपाकाभ्यां यो विद्वान् जन्मसंयमौ। तरोर्विलक्षणो द्रष्टा एवं द्रष्टा तनोः पृथक्॥ ४९॥

बीजपरिपाकें वाढले वृक्षीं। पर्वत त्या वृक्षाचा साक्षी। तो पर्वत वृक्षच्छेदनें नव्हे दुःखी। तेवीं द्रष्टा साक्षी देहाचा॥ ८७॥ द्रष्टा साक्षी देहमात्रासी। ते देहधर्म न लगती द्रष्टयासी। तो देहीं असोनि विदेहवासी। भवबंध त्यासी स्पर्शेना॥ ८८॥ हा अर्थ नेणोनि अविवेकी। अतिबद्ध जाहाले ये लोकीं। तोचि अर्थ पांच श्लोकीं। श्रीकृष्ण स्वमुखीं सांगत॥ ८९॥

कोणालाहि सर्वथा दिसत नाहीं. ८१ आत्मा गेला-आला असें म्हणतात; पण शेवटीं त्याचें येणें-जाणें कोणी पहात नाहीं. पुढील श्लोकांत श्रीकृष्ण याविषयींचीच युक्ति स्वतः सांगत आहे. ५८२.

—'अहोपण, त्यावेळीं मूर्च्छित झाल्यामुळें जन्म-मरणवान् देह प्रतीतीला येत नाहीं!' उत्तर—

आत्मनः पितृ-पुत्राभ्यां भवाप्ययौ अनुमेयौ–आपल्या पितृ-पुत्रांवरून जन्म व नाश यांचें अनुमान करावें. (पित्याचें और्ध्वदेहिक करणाराला त्याच्या नाशाचा प्रत्यय येतो व पुत्राचें जातकर्म करीत असतांना जन्माचा प्रत्यय येतो. त्यावरून आपल्या देहाच्याहि उत्पत्ति-नाशांचें अनुमान करावें.) **भवाप्ययौ वस्तूनां अभिज्ञः अद्वयलक्षणः न**–याप्रमाणें प्रत्यय येत असल्यामुळें उत्पत्ति-नाशांनीं युक्त असलेल्या देहांचा द्रष्टा उत्पत्ति व नाश या धर्मांनीं युक्त नसतो. ४८.

पित्याचा आत्मा गेला म्हणून त्याचा देह नष्ट झाला असें म्हणतात. परंतु आत्मा देहांतून निघून पलीकडे गेलेला कोणीहि पाहिला नाहीं. ८३ किंवा पुत्र जन्मला असतां आत्म्याचा जन्म झाला असें म्हणतात. परंतु पुत्राचे पुत्रावण करीत असतां देहाचाच विलास दिसतो. त्यावेळीं दुर्गम आत्मा दिसत नाहीं. ८४ यावरून आत्म्याला जाणें-येणें केव्हांहि नाहीं. जन्म-मरण हे देहाचे धर्म आहेत. त्यास अदृष्टाप्रमाणें जाणें-येणें प्राप्त होतें. ८५ देहाचा जन्म-नाश प्रत्यक्ष होत असतो. आत्मा साक्षिरूपानें अविनाशी आहे. याचेंच स्पष्ट लक्षण स्वतः श्रीकृष्ण पुढें सांगत आहे. ५८६.

—हीच गोष्ट दृष्टान्तानें स्पष्ट करितात—

तरोः बीजविपाकाभ्यां जन्मसंयमौ यः विद्वान् द्रष्टा (सः) तरोः विलक्षणः–तरूच्या बीजापासून त्याचा जन्म व विपाकापासून त्याचा नाश यांना जाणणारा जो द्रष्टा तो तरूहून विलक्षण असतो, **एवं तनोः द्रष्टा पृथक्**–त्याचप्रमाणें शरीराचा द्रष्टा शरीराहून पृथक् आहे. (येथील तरुशब्द केवळ उद्भिज्ज पदार्थांचाच उपलक्षक नसून ज्यांच्या फलाचा परिपाक झाला असतां नाश होतो त्या व्रीह्यादिकांचाहि उपलक्षक आहे, किंवा येथें तरूचा जो अंत्य परिणाम त्यालाच विपाक समजावें) ४९.

पर्वतावरील बीजाची उत्पत्ति व वाढ झाल्यामुळें मोठा वृक्ष होतो. पर्वत त्या वृक्षाचा साक्षी असतो. तो वृक्ष तोडिला असतां पर्वत जसा त्यामुळें दुःखी होत नाहीं, त्याप्रमाणें आत्मा देहाचा द्रष्टा–साक्षी आहे. ८७ तो ज्या देहाचा केवळ साक्षी आहे, त्या देहाचे धर्म आत्म्याला स्पर्शहि करीत नाहींत. तो देहांत राहून विदेही असतो. संसाराचें बंधन त्याला स्पर्शहि करीत नाहीं. ८८ पण हा अर्थ न जाणतां अविवेकी लोक या जगांत अत्यंत बद्ध कसे होतात, या विषयींच पुढील पांच श्लोकांनीं श्रीकृष्ण स्वमुखानें सांगत आहे. ५८९.

प्रकृतेरेवमात्मानमविविच्याबुधः पुमान् । तत्त्वेन स्पर्शसंमूढः संसारं प्रतिपद्यते ॥ ५० ॥

कर्माकर्मकर्तेपण । आत्म्यासी सर्वथा नाहीं जाण । येचि अर्थीचें निरूपण । मागां संपूर्ण सांगीतलें ॥ ५९० ॥ आत्मा नातळे तिन्ही गुण । देही देहातीत जाण । प्रकृतीहून पुरुष भिन्न । हें निजात्मज्ञान जो नेणे ॥ ९१ ॥ तोचि संसाराचा आपण । घरजांवई झाला जाण । देहाभिमानासी संपूर्ण । एकात्मपण मांडिलें ॥ ९२ ॥ विषयभोग तोचि पुरुषार्थ । ऐसें मानूनियां निश्चित । शुभाशुभ कर्मी येथ । भोगवीत नाना योनी ॥ ९३ ॥ विषयभोग अभिमानें जाण । पुढती जन्म पुढती मरण । नाना योनीं आवर्तन । देहाभिमान भोगवी ॥ ९४ ॥ ते नाना योनी गर्भदुःख । देहाभिमानें भोगिती मूर्ख । तेंचि नाना तत्त्वाचें रूपक । यदुनायक सांगत ॥ ९५ ॥

सत्त्वसङ्गादृषीन् देवान् रजसा सुरमानुषान् । तमसा भूततिर्यक्त्वं भ्रामितो याति कर्मभिः ॥ ५१ ॥

देहाभिमानाचिये स्थिती । त्रिगुण गुणांचीं कर्मे होती । तेणें त्रिविध संसारप्राप्ती । ऐक निश्चितीं उद्धवा ॥ ९६ ॥ न करितां कृष्णार्पण । सात्त्विक कर्म कीजे आपण । तेणें क्षोभे सत्त्वगुण । उत्तम देह जाण उपजवी ॥ ९७ ॥ सत्वाच्या अतिउत्कर्षगती । देवऋषि ब्रह्मऋषि होती । सत्वाच्या समसाम्यस्थितीं । कल्पायु जन्मती आजानुबाहो ॥ ९८ ॥ सत्वगुणें क्रियायुक्त । स्वर्गीं देव होती स्वर्गस्थ । भोगक्षयें अधःपात । या योनीं जनित सत्वगुणें ॥ ९९ ॥ आश्रयूनि राजस जन । करितां राजस कर्माचरण ।

—अविवेक्याच्याच संसाराचा अधिक विस्तार पुढील पांच श्लोकांनीं करितात—

अबुधः पुमान् एवं तत्त्वेन आत्मानं प्रकृतेः अविविच्य स्पर्शसंमूढः सन् संसारं प्रतिपद्यते—अविवेकी पुरुष याप्रमाणें तत्त्वतः आत्म्याला प्रकृतीहून पृथक् न करितां विषयांमध्यें आसक्त होऊन संसारास प्राप्त होतो. ५०.

आत्म्याला कर्म-अकर्म-कर्तेपणा सर्वथा नाहीं, या विषयींचें निरूपण मागें मीं सविस्तर केलें आहे. ५९० आत्मा सत्त्वादि तीन्ही गुणांनीं बद्ध होत नाहीं, देहांत राहणारा आत्मा देहाच्या पलीकडे आहे, प्रकृतीहून पुरुष भिन्न आहे, अशा प्रकारचें स्वस्वरूप जो जाणत नाहीं, ९१ तो आपण होऊनच संसाराचा घरजांवई झाला, असें समजावें. त्याचें देहाभिमानाशीं पूर्णपणें ऐक्य झालें आहे, ९२ असें जाणावें. विषयोपभोग हाच पुरुषार्थ आहे, असें निश्चित समजून व शुभ-अशुभ कर्मे करून, नानाप्रकारच्या योनी भोगाव्या लागतात. ९३ विषयोपभोगाच्या अभिमानानें पुनः पुनः जन्म-मरण प्राप्त होतें. देहाभिमान नानाप्रकारच्या योनींत भ्रमण करावयास लावितो. ९४ मूर्ख लोक देहाभिमानानें नानाप्रकारच्या योनींत गर्भवासाचें दुःख भोगीत असतात. त्या अनेक प्रकारच्या योनींचें रूपक आतां यदुश्रेष्ठ श्रीकृष्ण सांगत आहे. ५९५.

—गुणभेदानें त्रिविध संसार व त्या तीन प्रकारांतील तारतम्यानें प्रत्येकीं दोन प्रकार सांगतात—

कर्मभिः भ्रामितः सत्त्वसङ्गात् ऋषीन् देवान् रजसा असुरमानुषान् तमसा भूततिर्यक्त्वं याति—कर्माकडून भ्रमण करविला जाणारा आत्मा सत्त्वगुणांतील आसक्तीमुळें ऋषि व देव यांस प्राप्त होतो, रजोगुणासक्तीमुळें असुर व मानुष यांस प्राप्त होतो व तमोगुणामुळें भूत व तिर्यक्योनी यांस प्राप्त होतो. ५१.

हे उद्धवा ! देहाभिमानामुळें सत्त्व-रजादि तीन गुणांचीं कर्मे होतात. त्यामुळें तीन प्रकारच्या संसाराची प्राप्ति होते. ९६ कोणतेंहि सात्त्विक कर्म कृष्णार्पण केल्यावांचून आचरिलें असतां सत्त्वगुण क्षुब्ध होतो आणि उत्तम देह उपजवितो. ९७ सत्त्वगुणाचा अतिशय उत्कर्ष झाला असतां देवर्षि किंवा ब्रह्मर्षि होतात. सत्त्व समान असल्यास, कल्पापर्यंत जगणारा दीर्घायुषी शूर-वीराचा देह प्राप्त होतो. ९८ सत्त्वगुणयुक्त कर्म करणारे स्वर्गांतील स्वर्गस्थ देव होतात आणि तेथील पुण्यभोग संपतांच त्यांचा अधःपात होतो व ते पुनः मनुष्यलोकीं जन्म घेऊन सत्त्वगुणानें युक्त होतात. ९९ राजसजनांचा आश्रय करून राजस कर्माचरण केलें असतां रजोगुण क्षुब्ध होतो. त्यामुळें कोणता जन्म प्राप्त होतो,

तेणें क्षोभला रजोगुण । योनि कोण उपजवी ॥ ६०० ॥ राजस कर्म ब्रह्मीं अर्पिती । ते दैत्यही भगवद्भक्त होतीं । जे रजकउत्कर्षें भोग वांछिती । ते असुर होती महायोद्धे ॥ १ ॥ रजोगुणें स्वकर्माचरण । तेणें कर्में जन्मती ब्राह्मण । रजतारतम्यें जाण । चारी वर्ण जन्मती ॥ २ ॥ तमसाचे संगतीं जाण । करितां तमिष्ठ कर्माचरण । तेणें क्षोभला जो तमोगुण । तो नीच योनि दारुण उपजवी ॥ ३ ॥ भूत प्रेत पिशाचक । तिर्यग्योनि असंख्य । वृक्षा पर्वत पाषाण देख । या योनि अनेक भोगवी ॥ ४ ॥ ॥ आशंका ॥ कर्म त्रिगुणात्मक साचार । परी कर्मफळभोक्ता ईश्वर । हा वेदशास्त्रें विचार । केला निर्धार तुम्हींही ॥ ५ ॥ देहसाक्षित्वें आत्मा निराळा । ऐसा गत श्लोकीं केला निर्वाळा । जैं कर्मफळभोक्ता कर्मावेगळा । तैं कर्मफळा केवीं भोगी ॥ ६ ॥ ऐसें आशंकेचें अंतर । जाणोनियां शार्ङ्गधर । तेचि अर्थींचें उत्तर । विशद साचार सांगत ॥ ७ ॥

नृत्यतो गायतः पश्यन् यथैवानुकरोति तान् । एवं बुद्धिगुणान्पश्यन्ननीहोऽप्यनुकार्यते ॥ ५२ ॥

कलाकुशल सभानायक । त्यापुढें रंग होतां कौतुक । गात्या नाचत्याचे तालथाक । स्वयें देख अनुकरे ॥ ८ ॥ तेंचि अनुकार म्हणसी कैसें । प्रकृति केवळ जडांशें । जाणपण आत्म्यासी असे । येणें विन्यासें भोक्ता म्हणती ॥ ९ ॥ सभेसी बैसल्या निश्चळा । रंगींच्या अनुकरे थाकताळा । तेवीं प्रकृति पुरुष वेगळा । तो प्रकृतीची लीळा अनुकरे ॥ ६१० ॥ ॥ आशंका ॥ प्रकृतिच्छंदें अनुकारता । गुणकर्मांचा फळभोक्ता । आत्मा झाला जैं तत्त्वतां । तैं नित्यमुक्तता भंगली ॥ ११ ॥ जो करी कर्मफळस्वादन । त्यासी लागे कर्मबंधन । कर्मास्तव जन्ममरण । आत्म्यासी जाण लागलें ॥ १२ ॥

तें ऐक. ६०० आपलें राजस कर्म जे ब्रह्मार्पण करितात, ते दैत्य जरी असले तरी भगवद्भक्त होतात आणि रजोगुणाच्या बुद्धीनें जे विषयोपभोगाची इच्छा करितात ते महायोद्धे असुर होतात. १ रजोगुणयुक्त स्वकर्माचरण केलें असतां त्या कर्मानें ब्राह्मणांचा जन्म प्राप्त होतो. रजोगुणाची साम्यावस्था असल्यास त्यापासून चारहि वर्ण उत्पन्न होतात. २ तामस लोकांच्या संगतीनें तामस कर्म आचरिलें असतां तमोगुण क्षुब्ध होतो व त्यापासून नीच दुःखयुक्त जन्म प्राप्त होतो. ३ भूत, प्रेत, पिशाच, असंख्य पशु-पक्षी, वृक्ष, पाषाण, पर्वत इत्यादि अनेक प्रकारचे जन्म भोगावे लागतात. ४ (आशंका–) कर्म खरोखर त्रिगुणात्मक आहे; पण कर्मफलाचा भोक्ता ईश्वर आहे, असा वेद-शास्त्रांच्या आधारें तूंच निश्चय केला आहेस. ५ देहाचा साक्षीभूत आत्मा वेगळाच आहे. असा मागच्या श्लोकांतच तूं निर्णय सांगितलास. तेव्हां कर्माचें फल भोगणारा जर कर्माहून वेगळा आहे, तर मग तो कर्माचें फळ कसें भोगितो! ६ या शंकेचा आशय जाणून श्रीकृष्ण त्याचें उत्तर स्पष्ट करून सांगत आहे. ६०७.

—अहोपण, अकर्ता आत्मा कर्माकडून भ्रमण कसा करविला जातो? उत्तर—

नृत्यतः गायतः पश्यन् यथा एव तान् अनुकरोति—नृत्य करणाऱ्या व गायन करणाऱ्या लोकांना पहाणारा जसें त्यांचेंच अनुकरण करितो (म्ह० त्यांचा स्वर, ताल इत्यादि गति व शृंगार, करुण इत्यादि रस यांचें मनांत अनुवर्तन करवितो), एवं बुद्धि-गुणान् पश्यन् अनीहः अपि अनुकार्यते—त्याचप्रमाणें बुद्धि-गुणांना पहाणारा आत्मा निर्विकार जरी असला तरी गुणांकडून बलात्कारानें जणूंकाय त्याचें अनुकरण करविला जातो. [या दृष्टान्तानें दृश्याचे धर्म द्रष्ट्यामध्यें स्फुरतात] ५२.

सभापति जर कला जाणणारा तज्ज्ञ असला तर त्याच्यापुढें होणाऱ्या नृत्य, गायनांतील मर्म त्याला कळतें आणि तो स्वतः त्या गायकाचा व नृत्य करणाऱ्याचा ताल धरितो ८ त्याचप्रमाणें प्रकृति केवल जड आहे; पण आत्मा जाणता असल्यामुळें त्याला भोक्ता म्हणतात. ९ सभेंत स्वस्थ बसलेला तज्ज्ञ पुरुष नृत्य-गायनांतील ताल-सुराप्रमाणें आपल्या मांडीवर ताल धरितो. त्याप्रमाणें हा पुरुष प्रकृतीहून भिन्न असूनहि तिच्या लीलेचें अनुकरण करीत असलेला दिसतो. ६१० (आशंका–) 'तर मग प्रकृतीच्या छंदानें वागणारा आत्मा गुण-कर्मांचा फलभोक्ता झाल्यास त्याच्या नित्यमुक्ततेचा भंग होईल! ११ कारण जो कर्मफल चाखतो, तो कर्मांनीं बद्ध होतो. तेव्हां त्या कर्मामुळें आत्म्याला जन्म-मरण प्राप्त होईल! १२ तर मग आत्मा नित्यमुक्त, निर्विकार आहे या सगळ्या बात दूर राहूना

नित्यमुक्त अविकारी । या गोष्टी राहिल्या दूरी । आत्मा जाहला संसारीं । गुणविकारीं अतिबद्ध ॥ १३ ॥ उद्धवा तूं ऐसऐशी । आशंका झणीं धरिशी । आत्मा अलिप्त गुणकर्मांसी । दृष्टांतेंसी हरि सांगे ॥ १४॥

यथाऽम्भसा प्रचलता तरवोऽपि चला इव । चक्षुषा भ्राम्यमाणेन दृश्यते भ्रमतीव भूः ॥ ५३ ॥

जेवीं गंगातीरींचा तरू । जळीं वाहतां देखे नरू । तेवीं मायागुणअनुकारू । भासे विकारू आत्मत्वीं ॥ १५ ॥ ज्याचे डोळां भवंडी सबळ । तो भंवतां देखे भूमंडळ । तेवीं मायिक विकारमेळ । मिथ्या केवळ आत्म्यासी ॥ १६ ॥ जो अश्वारूढ होऊनि पाहे । जळीं प्रवाहासंमुख राहे । तो देखे मी जळीं प्रवाहें । ऐसा मिथ्या होय अनुभवू ॥ १७ ॥ तेवीं आत्मा नित्य निर्विकार । तेथ मायावी गुणसंभार । कल्पनायोगें साचार । मानिती नर मनोमय ॥ १८ ॥ आब्रह्मस्तंभपर्यंत । नाना योनि विकारवंत । कर्म क्रिया फळभोग येथ । जाण निश्चित मनोजन्य ॥ १९ ॥ ऐसें सांगतां हरि सांवळा । तेणें उल्हास उद्धवजिवाळा । तया आनंदाच्या कल्लोळां । उद्धवचि लीला पोखित ॥ ६२० ॥ निववावया उद्धवाचा ताप । स्वयें सांगे तो विश्वतोमुख । जेणें उद्धवा बहु हरुख । तेंचि श्रीकृष्ण देख सांगतसे ॥ ६२१ ॥

यथा मनोरथधियो विषयानुभवो मृषा । स्वप्नदृष्टाश्च दाशार्ह तथा संसार आत्मनः ॥ ५४ ॥

गुणविकारानें अत्यंत बद्ध झालेला आत्मा संसारी होईल!' १३ हे उद्धवा! तूं अशी भलती-सलती शंका घेऊं नकोस. कारण आत्मा गुण-कर्मांपासून अत्यंत अलिप्त आहे. याविषयींच हरि आतां दृष्टान्त देऊन सांगत आहे. ६१४.

—उपाधीचे धर्म उपहितामध्यें भासतात याविषयीं दृष्टान्त सांगतात—

यथा प्रचलता अम्भसा तरवः अपि चलाः इव—वेगानें धांवणाऱ्या जलाच्या योगानें तीरावरील वृक्षहि जणूंकाय धांवत असल्याप्रमाणें जसे दिसतात, किंवा जलामध्यें प्रतिबिंबित झालेले वृक्ष जणूंकाय चंचल असल्याप्रमाणें भासतात. (विषयांचें ग्रहण करणाऱ्या मनानें कल्पिलेलेच लावण्यादि गुण विषयांमध्यें भासतात, पण ते वस्तुतः नसतात, यास्तव संसार मनोमूलकच आहे. अशा अभिप्रायानें ग्राहकाचे गुण ग्राह्यामध्यें प्रतीत होतात, याविषयीं दृष्टान्त सांगतात—) **भ्राम्यमाणेन चक्षुषा भूः भ्रमति इव दृश्यते**—त्याप्रमाणें भ्रमण करणाऱ्या चक्षूंनीं जणूंकाय भूमीहि फिरत आहे असें दिसतें. ५३.

ज्याप्रमाणें मनुष्य गंगेच्या तीरावरील वृक्ष जलांत वहात आहे असें पहातो, त्याप्रमाणें मायेच्या गुणांचा आत्म्यालाहि विकार झाल्यासारखा भासतो. १५ ज्याला घेरी येते, त्याला सगळी पृथ्वीच फिरत असल्याचा भास होतो, त्याप्रमाणें हा मायेच्या विकारांचा संघात आत्म्यावर मिथ्याच आरोपिला जातो. १६ घोड्यावर बसलेला एखादा स्वार नदीप्रवाहाच्या समोर उभा राहिला कीं, त्याला 'आपण त्या प्रवाहांत वाहून चाललों आहों' असा भास होतो. १७ त्याप्रमाणें आत्मा नित्य निर्विकार असून मायेचे गुण त्यावर कल्पिले जातात आणि लोक ती मनोमय कल्पना खरीच समजतात. १८ ब्रह्मदेवापासून क्षुद्र कीटकापर्यंतच्या असंख्य योनी विकारानेंच उत्पन्न झालेल्या आहेत. त्यांतील कर्म, क्रिया, फलभोग हे सर्व मनःकल्पित आहेत. १९ याप्रमाणें सांवळ्या कृष्णाचें वचन ऐकून उद्धवाच्या मनाला अत्यंत संतोष झाला व त्या आनंदाच्या भरांत उद्धव देहभान विसरला. ६२० उद्धवाच्या मनाचा ताप निःशेष घालविण्यासाठीं सर्वज्ञ श्रीकृष्णानें उपदेश केला व ज्यायोगें उद्धवाला हर्ष होईल, तेंच श्रीकृष्णानें सांगितलें. ६२१.

—भोगाच्या मिथ्यात्वाविषयींहि दोन दृष्टान्त सांगतात—

दाशार्ह यथा मनोरथधियः स्वप्नदृष्टाः च धियः मृषा तथा आत्मनः विषयानुभवः संसारः (मृषा)—हे यादवा! ज्याप्रमाणें या प्रसिद्ध मनोरथबुद्धि व स्वप्नामध्यें अनुभविलेल्या बुद्धि मिथ्या असतात; तसाच हा आत्म्याचा विषयानुभवरूप संसार मिथ्या आहे. ५४.

आत्मा नित्यमुक्त अविकारी । तो संकल्पें कीजे विकारी । असंसारी परी संसारी । मनोविकारीं मानिजे ॥ २२ ॥ ऐसें दुजयावीण कांहीं । वार्ता सांगतां नाहीं । एक श्रोता दुसरा वक्ता पाहीं । यालागीं येही उपाये ॥ २३ ॥ जेवीं एकटा क्रमेना पंथ । मी राजा करी मनोरथ । परचक्र कल्पूनि तेथ । होय उद्यत युद्धासी ॥ २४ ॥ तो युद्धआवेश कडकडाट । तेणें सत्राणें उडे उद्भट । अडखळूनि आदळे पोट । म्हणे मी घायवट पडिलों कीं ॥ २५ ॥ मिथ्या भ्रमें पडला भुली । चालतां चालतां मृगजळीं । उतरावया पैलतीरीं । बुडी वहिली देतसे ॥ २६ ॥ गंधर्वनगरीं प्रचंड । माड्या सोपे उद्दंड । क्षणांमाजीं विरस चंड । वितंड करी निर्वाळा ॥ २८ ॥ तेवीं संसार हा काल्पनिक । तेथील सुख आणि दुःख । मिथ्या केवळ मायिक । जाण निष्टंक निजभक्तां ॥ २८ ॥ दाशार्हवंशीं जन्मलासी । तूं उत्तम दशा पावलासी । यालागीं ह्मणे हृषीकेशी । उद्धवासी दाशार्ह ॥ २९ ॥ जेवीं कां स्वप्नभोग जाण । स्वप्नीं सत्य मानी आपण । तेवीं संसार हा दीर्घ स्वप्न । मायिक जाण मिथ्यात्वें ॥ ६३० ॥ जागा झालिया स्वप्न वृथा । निरहंकारीं संसार मिथ्या । हे ब्रह्मज्ञानाची मुख्य कथा । जाण तत्त्वतां उद्धवा ॥ ३१ ॥ संसार तो कल्पनामात्र । आत्मा निर्विकार चिन्मात्र । जेवीं मृगजळ भरी भास्कर । तेवीं संसार करी आत्मा ॥ ३२ ॥ उद्धवा तूं ह्मणशी आतां । ऐकतां तुझे मुखींची कथा । संसार मिथ्यां तत्त्वतां । तरी साधनावस्था कां सोसावी ॥ ३३ ॥ जेवीं वंध्यापुत्राचें लग्न । करावया कोणी न करी यत्न । कां मृगजळीं बांधोनि धरण । पाट जाण कोणी काढीना ॥ ३४ ॥ तेवीं मिथ्या संसारबंधन । तेथ श्रवण मनन चिंतन । विवेक वैराग्य ज्ञान ध्यान । वृथा कां जन सोशिती ॥ ३५ ॥ उद्धवा बागुलाचें भय

वस्तुतः आत्मा नित्यमुक्त निर्विकार असतां संकल्पामुळें तो विकारी भासतो. तो असंसारी असून मनोविकारांनींच त्याला संसारी केलें आहे. २२ ज्याप्रमाणें एकटाच मनुष्य दुसरें कोणी ऐकण्यास असल्यावांचून गप्पा-गोष्टी सांगत नाहीं; एक ऐकणारा व एक बोलणारा अशा दोन व्यक्ति पाहिजे असतात, तरच त्यांचा उपयोग, २३ किंवा एखादा मनुष्य एकटाच रस्त्यानें चालला असतां कांहीं केल्या वाट संपत नाहीं, म्हणून तो 'मी राजा आहे' असा मनोरथ करूं लागतो. नंतर आपल्यावर परचक्र आलें आहे असें समजून तो युद्धाला तयार होतो. २४ त्या कल्पनेच्या भरारींत मोठ्या आवेशानें उड्या मारूं लागतो व पाय अडखळून पडतो, तो पोटावरच आदळतो. तरीहि तो भानावर न येतां 'मी जखमी होऊन पडलों आहें' २५ अशीच कल्पना करीत असतो, अशा प्रकारें तो मिथ्या भ्रमानें भ्रांतीत पडतो. चालतां चालतां पुढें मृगजल दिसतांच त्या प्रवाहाच्या पैलतीरीं जाण्यासाठीं तत्काळ त्यांत उडी टाकितो. २६ किंवा आकाशांत मेघांचें गंधर्वनगर उत्पन्न होतांच त्यांत मोठमोठ्या इमारती, शिखरें दिसूं लागतात. परंतु एकदां सोसाट्याच्या वारा सुटला कीं, क्षणार्धांत सर्व उडून जातें. २७ त्याप्रमाणें हा संसार काल्पनिक आहे. त्यांतील सुख आणि दुःख हीं दोन्हीं माझ्या निस्सीम भक्तांना केवळ मायिकच आहेत. २८ हे उद्धवा ! तूं यदुवंशांतील प्रमुख दाशार्ह कुळांत जन्मून उत्तम स्थितीला प्राप्त झाला आहेस. (म्हणून मूळ श्लोकांत श्रीकृष्णानें उद्धवाला 'दाशार्ह' असें संबोधिलें आहे.) २९ ज्याप्रमाणें स्वप्नांतील भोग आपण स्वप्नांत खराच समजतों, त्याप्रमाणें संसार हें एक दीर्घ स्वप्नच आहे. तो मायिक असल्यामुळें मिथ्या आहे. ६३० झोंपेंतून उठल्यानंतर स्वप्न जसें मिथ्या ठरतें, तसा निरहंकार अवस्थेंत संसार मिथ्या. उद्धवा ! हीच ब्रह्मज्ञानाची मुख्य खूण आहे, हें निश्चित जाण. ३१ हा संसार काल्पनिक आहे आणि आत्मा निर्विकार, चिद्रूप आहे. सूर्य जसा मृगजल निर्माण करितो तसा आत्मा संसार करितो. ३२ हे उद्धवा ! यावर तूं कदाचित् असें म्हणशील कीं, तुझ्या मुखानें ही कथा ऐकून संसार वास्तविक मिथ्याच आहे, असा निश्चय झाल्यावर मग साधनांची दगदग तरी कां सोसावी ! ३३ कारण वांझ स्त्रीच्या पुत्राचें लग्न करण्याचा प्रयत्न कोणी जसा करीत नाहीं ३४ किंवा मृगजलाला धरण बांधून त्याचा पाट काढण्याचा कोणी उद्योग करीत नाहीं, त्याप्रमाणें संसारबंधन मिथ्या आहे हें कळल्यानंतर श्रवण, मनन, चिंतन, विवेक, वैराग्य, ज्ञान, ध्यान या सर्व साधनांचे कष्ट लोक व्यर्थ कां सोसतात ! ३५ तर हे उद्धवा ! बागुलबुवाचें

खोटें । परी बाळकासी सत्य वाटे । तेवीं मिथ्या संसारकचाटें । जीवीं प्रकटे बद्धता ॥ ३६ ॥ तेंचि अर्थींचा दृष्टांत । स्वयें श्रीकृष्ण सांगत । मिथ्या सांसारिक येथ । भ्रमें बाधीत भ्रांतासी ॥ ३७ ॥

अर्थे ह्यविद्यमानेऽपि संसृतिर्न निवर्तते । ध्यायतो विषयानस्य स्वप्नेऽनर्थागमो यथा ॥ ५५ ॥

विचारें पाहतां मिथ्या स्वप्न । तेथील विषयसेवन । सुखदुःखें बाधिती गहन । ऐक लक्षण तयाचें ॥ ३८ ॥ स्वप्नीं पुत्रलाभ राजसन्मान । तेणें सुखें ओसंडे आपण । कां झालिया धनहरण । तेणें दुःखें दारुण आक्रंदे ॥ ३९ ॥ त्यासी जागें न करितां । स्वप्नसुखदुःख बाधकता । निवर्तेना सर्वथा । जाण तत्त्वतां उद्धवा ॥ ६४० ॥ तेवीं विषयासक्त जन । ज्यांसी अखंड विषयध्यान । ज्यांचें विषयीं सदा मन । देहाभिमान गोंवीत ॥ ४१ ॥ तयांसी देखावया उपावो । जयां विषयासक्ति होय वावो । येचि अर्थींचा दृष्टांत पहा हो । स्वयें सांगे देवो उद्धवासी ॥ ४२ ॥ न करितां श्रवण मनन । न साधितां विवेकज्ञान न धरितां वैराग्यपूर्ण । भवभय जाण तुटेना ॥ ४३ ॥ संसार मिथ्या तोंडें म्हणतां । न तुटे सुखदुःखभयव्यथा । जन्ममरणादि अवस्था । अहंममता सुटेना ॥ ४४ ॥ ऐसे जे अज्ञान जन । तिंहीं अवश्य करावें साधन । विवेकें वैराग्य धरितां पूर्ण । भवबंधन निवारे ॥ ४५ ॥ यालागीं उद्धवा जाण । सकळ साधनांचें कारण । जेणें हाता चढे ब्रह्मज्ञान । तें वैराग्य पूर्ण साधावें ॥ ४६ ॥ ऐक विरक्तीची मागी । जैशी धडधडीत आगी । तैसें वैराग्य व्हावें अंगीं । तैं प्राप्तीलागीं अधिकारू ॥ ४७ ॥ ऐसे मुमुक्षु जे पुरते । परम कृपेचोनि हातें । सद्गुरु थापटोनि ज्यांतें । करी अद्वैतें जागृत ॥ ८४ ॥ ज्यासी देहादिभेदपुष्टी ।

भय वास्तविक खोटें असतें; पण अज्ञ बालक तें जसें खरें मानितो; त्याप्रमाणें मिथ्या संसारांतील संकटानेंच जीव बद्ध होतात. ३६ याविषयीं श्रीकृष्ण स्वतः दृष्टान्त देऊन मिथ्या संसारदुःख भ्रांत लोकांना केवल भ्रमानेंच बाधत असतें, असें सांगत आहे. ६३७.

—'अहोपण, तो जर असा मिथ्या आहे, तर त्याच्या निवृत्तीसाठीं इतके श्रम कशाला?' उत्तर—

अर्थे अविद्यमाने अपि हि संसृतिः न निवर्तते—याप्रमाणें विषय जरी वस्तुतः विद्यमान नसले तरी संसाराची निवृत्ति होत नाहीं. यथा विषयान् ध्यायतः अस्य स्वप्ने अनर्थागमः—ज्याप्रमाणें विषयांचें ध्यान करणाऱ्या या आत्म्याला स्वप्नांत अनर्थप्राप्ति होते. [त्याप्रमाणें विषय नसले तरी संसार निवृत्त होत नाहीं.] ५५.

विचारपूर्वक पाहिलें असतां स्वप्न मिथ्याच असते; पण त्या स्वप्नांतील विषयोपभोग पराकाष्ठेचें सुख-दुःख भोगवितो. त्याचें लक्षण सांगतों, ऐक. ३८ स्वप्नांत पुत्रलाभ झाला किंवा राजसत्कार अनुभविला तर तो मनुष्य त्यावेळीं आनंदानें देहभान विसरतो; किंवा द्रव्यनाश झाला तर त्या दुःखानें तो भयंकर आक्रोश करूं लागतो. ३९ उद्धवा ! त्या माणसाला जर जागें केलें नाहीं, तर त्याच्या त्या स्वप्नांतील सुख-दुःखाच्या बाधेचें निवारण मुळींच होत नाहीं. उद्धवा ! हें जसें निश्चित आहे. ६४० तसेंच विषयासक्त लोक निरंतर विषयाचेंच चिंतन करीत असतात. ज्यांचें मन सर्वदा देहाभिमानामुळें विषयांत गुंतलेलें असतें ४१ त्यांची विषयासक्ति ज्यायोगें नाहींशी होईल तो उपाय श्रीकृष्ण उद्धवाला दृष्टान्त देऊन सांगत आहे. ४२ श्रवण व मनन न करितां, विवेकज्ञान न साधितां, पूर्ण वैराग्य न धरितां, संसाराचें भय केव्हांहि जात नाहीं.४३ 'संसार मिथ्या आहे' असें नुस्तें तोंडानें बोलून कांहीं सुख, दुःख व भय यांची व्यथा नाहींशी होत नाहीं, जन्म-मरणादि अवस्थांचें निवारण होत नाहीं; किंवा देहावरील अहं-ममता सुटत नाहीं. ४४ यास्तव जे अज्ञानी लोक असतात, त्यांनीं अवश्य साधन आचरावें. कारण विवेकानें पूर्ण वैराग्य बाणलें असतां भवबंध सहजच तुटतो. ४५ यास्तव हे उद्धवा ! ज्यायोगें ब्रह्मज्ञान सहज हातीं येतें तें सगळ्या साधनांतील श्रेष्ठ वैराग्य पूर्णपणें साधावें. ४६ आतां विरक्तीचा मार्ग सांगतों, तो ऐक. ज्वालांचा भडका उठून आग जशी धडाडते तशी कडकडीत विरक्ति अंगीं आणावी. तेव्हांच ब्रह्मज्ञानाचा अधिकार प्राप्त होतो. ४७ जे पूर्ण मुमुक्षु असतात, त्यांस सद्गुरु कृपारूपी वरद हस्तानें थोपटून अद्वैतानें जागृत करितो. ४८

मिथ्या माया गुणत्रिपुटी । ब्रह्मानंदें कोंदली सृष्टी । स्वप्नवत् दृष्टीं संसारू ॥ ४९ ॥ येव्हडी ही परम प्राप्ती । वैराग्यविवेकें चढे हातीं । तेंचि वैराग्य उद्धवाप्रती । स्वयें श्रीपति सांगत ॥ ६५० ॥

तस्मादुद्धव मा भुङ्क्ष्व विषयानसदिन्द्रियैः । आत्माग्रहणनिर्भातं पश्य वैकल्पिक भ्रमम् ॥ ५६ ॥

विषयांची जे आसक्ती । ते बाधक परमार्थप्राप्ती । विषय सांडीं सांडीं निश्चितीं । परतोनि हातीं नातळें ॥ ५१ ॥ आसक्त वृत्ति इंद्रिययोग । अतिलोलुप्यें विषयभोग । तोचि मुख्यत्वें भवरोग । यालागीं त्याग करावा ॥ ५२ ॥ विखें रांधिलें परमान्न । तें ग्रासमात्र हरी प्राण । विष एकदा मारक जाण । विषय पुनःपुनः मारक ॥ ५३ ॥ म्हणसी प्रारब्धें भोग येती । ते त्यागिलें केवीं जाती । विषयत्यागाची युक्ती । वैराग्यस्थिति घडे केवीं ॥ ५४ ॥ प्रारब्धें विषयभोग येती । ते साधका दुःखरूप होती । वणवा मृगें आहाळती । तैशी स्थिति भोगणें ॥ ५५ ॥ व्याघ्रमुखीं सांपडे गाये । तैसा भोगी चरफडीत जाये । ऐसेनि अनुतापें पाहें । वैराग्य होये अनिवार ॥ ५६ ॥ वैराग्य जाहालिया धडफुडें । सद्गुरुकृपा हाता चढे । तेणें गुरुकृपाउजियेडें । संसार उडे द्वंद्वेंसीं ॥ ५७ ॥ झालिया गुरुकृपा सुगम । सर्वत्र ठसावे परब्रह्म । तेथ जन्ममरण कैंचें कर्म । भवभ्रम असेना ॥ ५८ ॥ तेथ वाती लावुनि पाहतां- संसार दिसेना मागुता । जेवीं निभ्रमें पाहों जातां । न लगे हाता रज्जुसर्प ॥ ५९ ॥ भवंडीचेनि वेग- वशें । भिंगोरी नीट उभी दिसे । तेवीं भ्रमाचेनि आवेशें । संसार भासे सत्यत्वें ॥ ६६० ॥ केवळ जो निबिड भ्रम । संसार हें त्याचें नाम । येऱ्हवीं निखिल परब्रह्म । तेथ जन्मकर्म असेना ॥ ६१ ॥ ऐसें

तेव्हां देहादिकांविषयींचा अभिनिवेश व मायेच्या गुणांची त्रिपुटी हीं दोन्ही मिथ्या होतात. ब्रह्मानंदानें सृष्टि भरून जाते व त्यांना संसार स्वप्नवत् दिसूं लागतो. ४९ ज्या वैराग्यामुळें एवढी परम प्राप्ति होत असते त्या वैराग्याविषयींच श्रीपति उद्धवाला सांगत आहे. ६५०.

—यास्तव विषयभोगाविषयीं उद्यम करूं नये, असें सांगतात —

तस्मात् उद्धव—यास्तव हे उद्धवा ! **असदिन्द्रियैः विषयान् मा भुङ्क्ष्व**—मिथ्या इंद्रियांनीं विषयांचा भोग घेऊं नकोस. **वैकल्पिकं भ्रमं आत्माग्रहणनिर्भातं पश्य**—हा भेदभ्रम आत्म्याच्या अज्ञानामुळें भासत आहे, असें समज. ५६.

विषयासक्ति परमार्थप्राप्तीला बाधक आहे. यास्तव हे उद्धवा ! विषयांना पुरतेपणें सोड, सोड. त्यांना पुनः स्पर्शीहि करूं नकोस. ५१ विषयासक्त झालेली वृत्ति इंद्रियांच्या योगें विषयभोगांत अत्यंत लोलुप होते. तोच खरा भवरोग आहे. यास्तव त्यांचा त्याग करावा. ५२ विष घालून शिजविलेलें मिष्टान्न एका घासानेंच प्राणहरण करितें. विष एकदांच प्राण घेतें, पण विषय पुनः पुनः जन्म-मरण भोगवितात. ५३ यावर तूं कदाचित् असें म्हणशील कीं, प्रारब्धानुसार सुख-दुःख भोगावें लागतें. तें त्याग केल्यानें कसें जाणार ! वैराग्यानें विषयत्यागाचा उपाय कसा सांपडणार ! ५४ (तर त्याचें उत्तर ऐक—) प्रारब्धानें जे विषयभोग प्राप्त होतात, ते साधकाला दुःखरूप होतात. वणव्यांत सांपडलेलीं श्वापदें जशीं होरपळून निघतात तशी विषय भोगिते वेळीं या साधकाची स्थिति होते. ५५ वाघाच्या तोंडांत गाय जशी सांपडावी, तसा साधक चडफडत ते विषय भोगीत असतो. अशा पश्चात्तापामुळें त्याच्या मनांत अनिवार वैराग्य उपजतें. ५६ तीव्र वैराग्य प्राप्त झालें असतां सद्गुरूची कृपा हस्तगत होते. आणि सद्गुरू- कृपेच्या प्रकाशानें सुख दुःखादि द्वंद्वांसह संसाररूपी अंधकार तत्काळ नाहींसा होतो. ५७ एकदां सद्गुरुकृपा सुलभ झाली कीं, सर्वत्र परब्रह्मच दिसूं लागतें. तेथें जन्म-मरण कोठचें व कर्म तरी कोठचें ! संसारभ्रम मुळीं उरतच नाहीं. ५८ ज्याप्रमाणें भ्रमरहित चित्तानें पाहिलें असतां रज्जूवर सर्प दिसत नाहीं त्याप्रमाणें दिवा लावून शोधिलें, तरी पुनः संसार दृष्टीस पडत नाहीं. ५९ भिंगरी वेगानें फिरूं लागली असतां ती सरळ उभी असल्याप्रमाणें भासते, त्याप्रमाणें भ्रमाच्या भरांत संसार भासतो, ६६० निव्वळ भ्रम हाच खरोखर संसार आहे. एरवीं सर्वत्र परब्रह्मच भरलेलें आहे. त्याला जन्म-कर्म कांहीं नाहीं. ६१ असें ब्रह्मज्ञान झाल्यावरहि, कुंभारानें घट काढून घेतला तरी चक्र

जरी झालें ब्रह्मज्ञान । तरी प्रारब्ध भोगावें गा जाण । जेवीं कुलाल भांडें ने आपण । परी चक्रभ्रमण राहेना ॥ ६२ ॥ वृक्ष समूळ उपडल्या जाण । उपडितां न वचे सार्द्रपण । तेवीं होतांचि ब्रह्मज्ञान । प्रारब्ध जाण सोडीना ॥ ६३ ॥ त्या प्रारब्धाचिये गती । विषयभोग जरी येती । तेथ उपावो न करावा निवृत्ती । निजशांतीं साहावें ॥ ६४ ॥ विषयभोग आलियाही जाण । निजशांति धरोनि संपूर्ण । सुखें वर्तती साधुजन । विवेकसंपन्न क्षमावंत ॥ ६५ ॥ हाता आलिया निजशांती । संसार बापुडा तो किती । तेंचि शांतीची स्थिती । स्वयें श्रीपति सांगत ॥ ६६ ॥ जें निजशांतींचें कल्याण । जेणें जीव पावे समाधान । तें अतिगोड निरूपण । दों श्लोकीं सांगत ॥ ६७ ॥

क्षिप्तोऽवमानितोऽसद्भिः प्रलब्धोऽसूयितोऽथवा । ताडितः सन्निबद्धो वा वृत्त्या वा परिहापितः ॥ ५७ ॥
निष्ठितो मूत्रितो वाऽज्ञैर्बहुधैवं प्रकम्पितः । श्रेयस्कामः कृच्छ्रगत आत्मनात्मानमुद्धरेत् ॥ ५८ ॥

देहाभिमानी तामस जन । अतिदुष्ट जे दुर्जन । तिंहीं साधूंसी करितां छळण । शांतीस्तव सज्जन क्रोधी नव्हती ॥ ६८ ॥ अल्पउपद्रवीं जाण । न येती क्रोधा सज्ञान । तैसें नव्हे अतिनिर्वाण । पीडा दारुण करितांही ॥ ६९ ॥ कायिक वाचिक मानसिक । त्रिविध पीडा देख । साधु निजशांती नेटक । जाणोनि विवेक ते साहती ॥ ६७० ॥ उजू बोलतां शुद्ध युक्ती । आक्षेपूनि हेडाविती । झिडकावूनियां निर्भर्त्सिती । अपमानिती सभेसी ॥ ७१ ॥ शब्दीं शब्दानें करूनि छळ । म्हणती दुष्ट दुर्जन दुःशीळ । अपवित्र अमंगळ । नष्ट चांडाळ हा एक ॥ ७२ ॥ ऐशा दुर्जनांच्या दुष्टोक्ती । साधु साहे निजशांतीं ।

जसें त्याची गति संपेपर्यंत फिरत रहातें, त्याप्रमाणें प्रारब्धकर्म भोगावें लागतें. ६२ वृक्ष मुळासकट जरी उपटून टाकिला तरी त्यांतील रस लगेच वाळून न जातां त्यांत, कांहीं काल ओलावा जसा रहातो, त्याप्रमाणें ब्रह्मज्ञान झालें तरी प्रारब्धकर्म सुटत नाहीं. ६३ म्हणून त्या प्रारब्धगतीच्या अनुसार विषयपभोग प्राप्त झाले असतां त्याच्या निवारणार्थ उपाय न योजितां शांतपणानें ते सहन करावे. ६४ असे विषयभोग प्राप्त झाले असतां विवेकसंपन्न, क्षमाशील साधु-संत मनांत पूर्ण शांति ठेवून सुखानें रहातात. ६५ त्यांच्या पुढें बापड्या संसाराची काम प्रतिष्ठा ! आतां श्रीहरि त्यांच्या शांतीचेंच लक्षण स्वतः सांगत आहे, ६६ जें आत्मशांतींचें कल्याण, ज्यानें जीवाला समाधान होतें, त्याचें अतिशय गोड निरूपण पुढील दोन श्लोकांनीं श्रीकृष्ण करीत आहे. ६६७.

—दुःखाच्या प्रतिकारासाठींहि उद्यम न करितां तूं केवल परमेश्वरैकनिष्ठच हो, असें पुढील दोन श्लोकांनीं सांगतात—

असद्भिः क्षिप्तः अवमानितः प्रलब्धः अथवा असूयितः ताडितः वा सन्निबद्धः वृत्त्या वा परिहापितः निष्ठितः मूत्रितः वा एवं अज्ञैः बहुधा प्रकम्पितः कृच्छ्रगतः श्रेयस्कामः आत्मना आत्मानं उद्धरेत्—असत् पुरुषांकडून आक्षेप केला गेलेला, उपहास केला गेलेला, अपमान केला गेलेला, गुणांमध्यें दोषारोप केला गेलेला, ताडन केला गेलेला, अत्यंत बांधून ठेविला गेलेला किंवा उपजीविकेच्या साधनाचा अपहार केला गेलेला, थुंकला गेलेला किंवा अमंगल पदार्थांनीं भिजविला गेलेला. सारांश मूढांकडून अशाप्रकारें अनेकधा परमेश्वरनिष्ठेपासून ढळविला गेलेल्या व त्यामुळेंच मोठ्या संकटांत पडलेल्याहि श्रेयस्काम पुरुषानें स्वतःच आपला उद्धार करावा. ५७-५८.

देहाभिमानी, तामस स्वभाव, अतिशय दुष्ट, दुर्जन लोकांनीं साधूंचा छळ केला असतां त्यायोगें ते सज्जन अत्यंत शांतवृत्तीमुळेंच क्रोधाच्या अधीन होत नाहींत. ६८ सामान्य सुज्ञ मनुष्याला थोडासा उपद्रव झाला असतां जसा क्रोध येत नाहीं, त्याप्रमाणें भयंकर पीडा दिली तरीहि ते संतापत नाहींत. ६९ कायिक, वाचिक व मानसिक अशी तीन प्रकारची पीडा साधु शांतवृत्तींतच अढळ राहून सहन करितो. ६७० त्यानें केवल युक्तीनें सरळ भाषण केलें असतांहि लोक त्यावर आक्षेप घेऊन उपहास करितात, झिडकारून निर्भत्सना करितात, शब्दछळ करून भरसभेंत अपमान करितात. ७१ पण दुष्ट, दुर्जन, दुःशील, अपवित्र, अमंगल, नष्ट, चांडाल इत्यादि ७२ दुर्जन लोकांची दुरुक्ति साधु शांत चित्तानें सहन करितो. अशाप्रकारची शांति उपजण्याचें कारण आणि विवेकाचें लक्षण सांगतों तें ऐक. (दुर्जन निंदा करूं लागला असतां साधु असें समजतो—) ७३ दुसऱ्यांचे ओंठ व जिभ हालत

ते शांतीची उपपत्ती । विवेकस्थितीं अवधारीं ।। ७३ ।। पराची जिव्हा बोठ हालती । माझ्या अंगीं ते न रुपती । यालागीं क्रोध न ये चित्तीं । निजशांति ढळेना ।। ७४ ।। सभेसी सन्मानें पूजितां । लोटूनि घातला खालता । हाणोनियां चरणघाता । नेला परता अपमानें ।। ७५ ।। सन्मानें जेथ पूजूं नेती । तेथ केवळ असे क्षिती । अपमानें जेथ लोटिती । तेथही क्षिती तेचि पैं ।। ७६ ।। येथ मान अपमान । कल्पना मनाची जाण । ऐसेनि विवेकें सज्जन । द्वेषीना जन निजशांतीं ।। ७७ ।। प्रलोभूनि नाना युक्ती । धनें ठकवूनियां निर्भर्त्सिती । धनलोभ केवळ अधःपाती । त्याची निवृत्ति जिहीं केली ।। ७८ ।। त्यांसी निंदितांचि जाण । दोषी होइजे आपण । यालागीं क्रोधा न ये मन । शांति संपूर्ण ढळेना ।। ७९ ।। शुद्ध बोलती शास्त्रार्थ । अर्थ तितुका अनर्थ । त्या अनर्था जो करी निवृत्त । त्यातें द्वेषित ते मूर्ख ।।६८०।। सद्‌गुणीं दोष आरोपिती । नानापरी निंदा करिती । तेणें हित मानिती चित्तीं । तारक निश्चितीं हे माझे ।। ८१ ।। मातेचे जे करतळ । ते वरिवरी क्षाळिती बाह्य मळ । हे जनक माझे केवळ । सबाह्य मळ सकळ जिव्हाग्रें धुती ।। ८२ ।। ऐशियांचें करितां छळण । हितास नाडिजे आपण । कोणाचे न बोले दोषगुण । तेणें शांति जाण थोरावे ।। ८३ ।। चाले जेणें जीविकास्थिती । धन धान्य क्षेत्र वृत्ती । छळें बळें हिरोनि नेती । तेणें चित्तीं क्षोभ नुपजे ।। ८४ ।। येथ लाभालाभ दैवाधीन । त्यासी देतेंघेतें तेंचि जाण । यालागीं द्वेषीना जन । शांतीचा गुण न सांडी ।। ८५ ।। वृत्ती घेऊनि उगे नसती । अन्यायी म्हणोनि बांधिती । एक तोंडावरी थुंकिती । एक माथां मुतती अतिदुष्ट ।। ८६ ।। एक ताडिती पाडिती ।

आहेत, ते कांहीं माझ्या अंगाला खुपत नाहींत, असें मानून त्याच्या मनांत क्रोध उत्पन्न होत नाहीं व त्याची शांतवृत्ति ढळत नाहीं. ७४ सभेंत मोठ्या सन्मानानें त्याचें पूजन केलें किंवा धक्की मारून घालवून दिलें, त्याला लाथा मारिल्या, अपमान करून पलीकडे ढकलून दिलें तरी तो मनांत म्हणतो कीं, ७५ जेथें माझा सन्मान झाला तेथेंहि पृथ्वीच आहे व जेथें अपमान झाला तेथेंहि पृथ्वीच आहे. ७६ मान व अपमान ही केवळ मनाची कल्पना आहे, असें समजून विवेकी सज्जन चित्त शांत ठेवितो व त्या लोकांचा द्वेष करीत नाहीं. ७७ अनेक प्रकारच्या युक्तीनें साधूला वश करून व त्याचें धन लुबाडून लोक त्याची निर्भर्त्सनाहि करितात. तेव्हां तो मनांत असें समजतो कीं, धनलोभ केवळ अधःपाताला कारण होणारा आहे; वास्तव ज्यांनीं माझें धन घेतलें ७८ 'त्यांची निंदा केली असतां आपणच दोषी होऊं ' असें मानून त्याच्या मनाची शांति यत्किंचित्‌हि ढळत नाहीं व त्याला क्रोधहि येत नाहीं. ७९ जे शुद्ध शास्त्रार्थ सांगतात, त्यांचा तो अर्थ म्हणजे अनर्थच असतो. पण हा साधु शास्त्रार्थ कांहीं न सांगतां त्या अनर्थाची निवृत्ति करीत असतो; पण मूर्ख ' त्याला कांहीं कळत नाहीं ' असें म्हणून त्याचा द्वेष करितात, ६८० त्या सज्जनाच्या सद्‌गुणावर दोषांचा आरोप करितात, नानाप्रकारची निंदा करितात, तरीहि तो त्यांत आपलें हितच मानितो व ' हे लोक माझा उद्धार करणारेच आहेत ' असें तो साधु म्हणत असतो. ८१ मातेचे हात माझ्या अंगावरील बाहेरचा मळ तेवढा काढून टाकीत होते; पण हे मात्र माझे खरे जनक आहेत; कारण ते माझ्या देहाचा व मनाचाहि मळ आपल्या जिभेनें धुवून काढितात. (दुसऱ्यानें आपल्या दोषांचा उच्चार केल्यास आपल्या पातकांचा नाश होतो ही लौकिक म्हण प्रसिद्धच आहे.) ८२ अशा पुरुषाचा छळ केला असतां आपण आपल्या हिताला मुकूं, असें समजून तो कोणाचे गुण-दोष बोलत नाहीं; त्यामुळें त्याची शांति वाढते. ८३ ज्यांवर त्याची उपजीविका चालते, तें धन, धान्य, क्षेत्र, वृत्ति यांचा कोणी छलानें किंवा जुलमानें अपहार केला तरीहि त्याच्या मनाला क्षोभ होत नाहीं. ८४ लाभ व हानि हीं दोन्हीहि दैवाच्या स्वाधीन आहेत, दैवच देणारें व घेणारें आहे, असें म्हणून तो छळणाऱ्या लोकांचा द्वेष कधींहि करीत नाहीं व आपला ' शांति' हा गुण सोडीत नाहीं. ८५ त्याच्या वृत्तीचा अपहार करूनच ते स्वस्थ बसत नाहींत, तर त्याला अपराधी म्हणून बांधून नेतात, तोंडावर थुंकतात, कोणी अत्यंत दुर्जन त्यांच्या मस्तकावर मूत्र विसर्जन करितात कोणी मारतात, ८६ कोणी खालीं पाडतात, अनेक प्रकारानें पीडा देतात; परंतु त्याच्या मनाची शांति रेसभरहि ढळत नाहीं. कारण ब्रह्मनिष्ठाचा सोबती विवेक म्ह० नित्य-अनित्य-वस्तूंचा विचार सतत

एक नानापरी गांजिती । तरी अंगींची ढळेना शांती । विवेक सांगाती सज्जना । ८७ ॥ थुंका आणि जें मूत । तें देहाचिमाजीं उपजत । देहींचें देहास लागत । क्षोभ तेथ कोण मानी ॥ ८८ ॥ थुंका आणि जें मूत । जैसें देहीं उपजे देहाचें अपत्य । देहाचें देहावरी खेळत । दुःख तेथ कोणाचें ॥ ८९ ॥ धरितां मारितां म्हणे देख । देहो तितुका पांचभौतिक । मारिता मारिजता दोनी एक । कोणाचें दुःख कोणासी ॥ ६९० ॥ ऐशी सविवेकें ज्यासी शांती । चारी मुक्ती त्याच्या दासी होती । त्याचा अंकिला मी श्रीपती । यावरी प्राप्ती ते कायी ॥ ९१ ॥ तेथ केवळ जो मोक्षार्थी । तेणें सर्वस्वें पाळावी शांती । ते दुःखसागरावर्तीं । होय तारिती सुखरूप ॥ ९२ ॥ वैराग्य योग ज्ञान ध्यान । त्याचें फळ तें शांति जाण । ते शांति साधूनि संपूर्ण । आपणिया आपण उद्धरिती ॥ ९३ ॥ यालागीं उद्धवा जाण । साहोनि द्वंद्वांचें काठिण्य । शांति साधूनि संपूर्ण । ब्रह्म परिपूर्ण पावावें ॥ ९४ ॥ पूर्ण ब्रह्म पावल्यापाठीं । जन्ममरणाची खुंटे गोठी । परमानंदें पडे मिठी । भवभयाची तुटी तैं होय ॥ ९५ ॥ एकोनि श्रीकृष्णाचें बोला । उद्धव अत्यंत चाकाटला । द्वंद्वबाध जो ऐकिला । तो न वचे साहिला आम्हांसी ॥ ९६ ॥ ऐकिल्या नाहीं ये शांतीच्या गोष्टी । मा केवीं देखिजेल दृष्टीं । ऐशी शांति ज्याच्या पोटीं । तो पुरुष सृष्टीं नसेल ॥ ९७ ॥ मागें ऐकिली ना देखिली । ऐशी शांति त्वां कैंची काढिली । हें ऐकतां तुझी बोली । भयें दचकली बुद्धि माझी ॥ ९८ ॥ ऐशी शांति ज्यासी आहे । तो मागें झाला ना पुढें होये । देवो बोलिला निजनिर्वाहें । तें दुःसह होये आम्हांसी ॥ ९९ ॥ ज्या सांगीतलिया द्वंद्वासी । तो अतिदुःसह योगियांसी । केवीं साहवे आम्हांसी । तेंचि देवासी पूसत ॥ ७०० ॥

त्याच्या बरोबर असतो. ८७ तो म्हणतो कीं, थुंकी आणि मूत्र हीं दोन्हीं देहापासूनच उत्पन्न होतात. त्याचाच देहाला लेप लागला तर त्यांत रागावण्याचें काय कारण ! ८८ हीं दोन्हीं देहापासून उत्पन्न होतात. तीं जर आपल्या मुलाप्रमाणें अंगाखांद्यावर पडलीं तर त्यांत दुःख कसलें ! ८९ त्याला धरिलें, मारिलें असतां तो म्हणतो कीं, जेवढीं शरीरें तेवढीं सगळीं पांच भूतांपासून उत्पन्न झालीं आहेत. तेव्हां मारणारा व मार खाणारा दोघे एकच होत. मग कोणीं कोणाचें दुःख मानावयाचें ! ६९० अशी विवेकयुक्त शांति ज्याच्यापाशीं असते, त्याच्या चारी मुक्ति दासी होतात आणि मी श्रीहरि त्याच्या अधीन होऊन राहतों. यापेक्षां अधिक लाभ तो कोणता ! ९१ मोक्षाची इच्छा करणारानें अशी शांति धरली असतां ते दुःखरूपी समुद्राच्या भोंवऱ्यांतून सुखरूपपणें परतीराला जाऊन पोंचतात. ९२ वैराग्य, योग, ज्ञान, ध्यान यांचें फल जी शान्ति ती पूर्णपणें साधून ते आपणच आपला उद्धार करून घेतात. ९३ यास्तव हे उद्धवा ! शीतोष्णादि द्वंदांचा कठिणपणा सहन करून अढळ शान्ति मिळवून परिपूर्ण ब्रह्माला प्राप्त व्हावें. ९४ एकदां पूर्ण ब्रह्माला जाऊन मिळालें कीं, जन्म-मरणांची वार्ता खुंटते, परमानंदाची मिठी पडते व संसारभयांतून निवृत्ति होते. ९५ हें श्रीकृष्णाचें भाषण ऐकून उद्धव अत्यंत चकित झाला व म्हणाला कीं, ही जी द्वंद्वनिवृत्ति मीं ऐकिली ती आम्हांला सहन होणार नाहीं. ९६ अशा प्रकारच्या अढळ शांतीची गोष्ट कधीं ऐकलीहि नाहीं, मग दृष्टीनें पहाणार कोठून ! अशा प्रकारच्या शांतवृत्तीचा पुरुष जगांत कांहीं सांपडणार नाहीं. ९७ मागें कधीं ऐकिली नाहीं किंवा पाहिली नाहीं अशा प्रकारची ही शान्ति तूं कोठून काढिलीस ! तुझें हें वचन ऐकून माझें मन भीतीनें दचकून गेलें. ९८ अशी शान्ति ज्याच्यापाशीं आहे असा पुरुष मागें झाला नाहीं व पुढें होणार नाहीं. श्रीकृष्णानें जें आपलें ठाम मत सांगितलें तें आम्हांला दुःसह वाटत आहे. ९९ तूं जें आतां द्वंद्व सांगितलेंस, तें योग्यांनाहि अति असह्य आहे, मग आम्हांला कसें सहन होणार ! याविषयींच उद्धव देवाला प्रश्न करीत आहे. ७००.

उ० उ०–यथैवमनुबुध्येयं वद नो वदतांवर । सुदुःसहमिमं मन्य आत्मन्यसदतिक्रमम् ॥ ५९ ॥
विदुषामपि विश्वात्मन् प्रकृतिर्हि बलीयसी । ऋते त्वद्धर्मनिरताञ्छान्तांस्ते चरणालयान् ॥ ६० ॥

जे सांगों जाणती वेदशास्त्रार्थां । ते वक्ते म्हणिपती तत्त्वतां । वक्त्यांमाजीं तुझी श्रेष्ठता । मुख्य वेदांचा वक्ता तूं होसी ॥ १ ॥ शास्त्रें लाहोनि तुझी युक्ती । तुझी तुज प्रतिपादिती । ते परोक्षवादें थोंटावती । श्रुति ' नेति नेति ' परतल्या ॥ २ ॥ त्या तुझे मुखींच्या ज्ञानोक्ती । कृपेनें ऐकोनि कृपामूर्ती । श्रवणाचें भाग्य वानूं किती । जे ऐकती ते धन्य ॥ ३ ॥ ऐसऐशिया अतियुक्तीं । उद्धवें प्रार्थिला श्रीपती । हात जोडूनि परम प्रीतीं । म्हणे विनंति अवधारीं ॥ ४ ॥ स्वामी बोलती अतिअगाध । हें बोलणें परम शुद्ध । माझे बुद्धीसी नव्हे बोध । पराचे अपराध कोण साहे ॥ ५ ॥ जें साहे पराचे अपराध । तेंही कठिणत्वें अतिविरुद्ध । हा दुःसह महाबोध । कैसेनि द्वंद्व साहवे ॥ ६ ॥ उत्तमें केलिया अपराधा । कोटींमाजीं साहे एकादा । परी नीचाची विरुद्ध बाधा । कोणीही कदा न साहे ॥ ७ ॥ ज्याचें न व्हावें दर्शन । ज्यासी करूं नये नमन । त्याचे मस्तकीं वाजतां चरण । साहेल कोण गोविंदा ॥ ८ ॥ ज्याचा निःशेष जाय प्राण । तोचि साहे हें कठिण । जो होय सचेतन । त्यासी सर्वथा जाण न साहवे ॥ ९ ॥ इतरांची कायसी कथा । सज्ञान जे कां तत्त्वतां । तेही अतिक्रमू न साहती अल्पतां । मा अपमानता कोण साहे ॥ ७१० ॥ क्रोध जाहला कपिलमहामुनीसी । तेणें भस्म

उ० उ०–उद्धव म्हणाला–हे वदतांवर–हे वक्त्यांतील श्रेष्ठा ! एवं यथा अनुबुध्येयं तथा नः वद–तूं सांगितलेलें हें ज्याप्रकारें मला कळेल त्याप्रकारें सांग. हे विश्वात्मन् त्वद्धर्मनिरतान् शांतान् ते चरणालयान् ऋते विदुषां अपि–हे सर्वात्मन्, तुझ्या धर्मामध्यें अत्यंत रत असलेल्या, तुझ्या चरणांचा आश्रय केलेल्या भक्तांवांचून इतर विद्वानांनाहि, आत्मनि इमं असदतिक्रमं सुदुःसहं मन्ये–आपल्या ठिकाणीं अशाप्रकारचा जो असज्जनांचा अतिक्रम त्यांनीं केलेला अपराध तो अत्यंत दुःसह आहे, असें मी समजतों, हि प्रकृतिः बलीयसी–कारण प्रकृति अनुल्लंघनीय आहे. ५९–६०.

ज्यांना वेदाचा अर्थ सांगतां येतो, त्यांनाच खरोखर वक्ते म्हणतात. त्या वक्त्यांमध्यें तूं श्रेष्ठ आहेस. कारण तूंच वेदांचा मुख्य वक्ता आहेस. १ शास्त्रें तुझ्याच युक्तीनें तुझेंच वर्णन करितात. परंतु तींहि परोक्षवादानें कुंठित होतात आणि श्रुति तर ' नेति नेति ' म्ह० ' तें ब्रह्म नव्हे ' असें म्हणत मागें परतल्या आहेत. २ हे कृपासागरा ! अशा तुझ्या मुखांतील हें ज्ञानवचन तुझ्या कृपेनें ज्या मीं ऐकिलें त्या माझ्या कानांचें भाग्य काय वर्णावें ! ज्यांना हें ऐकावयास मिळतें, ते खरोखर धन्य होत. ३ अशा प्रकारें अत्यंत स्तुति करून उद्धवानें मोठ्या प्रेमानें हात जोडून श्रीहरीची प्रार्थना केली कीं, माझी एवढी विनंति ऐकावी. ४ हे स्वामिन् ! तुझें बोलणें अत्यंत गहन आहे व तें अक्षरशः सत्यहि आहे. परंतु माझ्या मनाला मात्र तें पटत नाहीं. कारण दुसऱ्याचा अपराध कोण सहन करणार ! ५ अत्यंत सहनशीलतेमुळेंहि दुसऱ्याचे अपराध सहन करणें मानवी स्वभावाच्या विरुद्ध आहे. तुझा हा उपदेश अत्यंत उदार असला तरी इतकी सहनशीलता अंगीं बाणणें दुष्कर आहे. द्वंद्वाला कसें सहन करितां येणार ! ६ एखाद्या श्रेष्ठ मनुष्यानें कांहीं अपराध केला तर कोट्यवधि लोकांतून एकजण तरी तो सहन करील. परंतु निंद्य माणसानें निष्कारण केलेला छळ कोणीहि सहन करणार नाहीं ७ ज्याचें कधीं मुखावलोकनहि करूं नये व ज्याला कधीं नमस्कार करूं नये, अशा मनुष्यानें जर विनाकारण मस्तकावर लाथ मारिली तर हे गोविंदा ! ती कोण सहन करील ! ८ केवल निर्जीव मृत शरीर मात्र हें सहन करील; परंतु जोंवर अंगांत थोडी तरी धुगधुगी आहे, तोंपर्यंत कोणीहि हें सहन करणार नाहीं. ९ इतरांच्या गोष्टी कशाला पाहिजेत ! जे मोठे ज्ञानी म्हटले आहेत, त्यांनाहि दुसऱ्याचा क्षुल्लक अपराध सहन होत नाहीं. ७१० कपिल महामुनीला क्रोध येतांच त्यानें सगरपुत्रांना शाप देऊन तत्काल भस्म करून टाकिलें. नारदानें शाप देऊन कुबेराच्या पुत्रांना वृक्ष केले. ११ दुर्वासाची गोष्ट तर काय सांगावी ! तें प्रकरण फारच मोठें आहे. परीक्षित राजानें शृंगी ऋषीच्या पित्याच्या गळ्यांत मृत सर्प घातला. या त्याच्या अपराधाबद्दल ऋषीच्या मनांत क्रोध उत्पन्न होऊन त्यानें राजाला

केलें सगरांसी । नारदें कुबेरपुत्रांसी । वृक्षत्वासी आणिलें ॥ ११ ॥ दुर्वासाची सांगतां गोठी । त्याची कथा आहे मोठी । कोप आला श्रृंगीचे पोटीं । मेल्या सर्पासाठीं शापिलें ॥ १२ ॥ मुख्यत्वें शांति सनकादिकांसी । द्वारीं आडकाठी केली त्यांसी । वैकुंठीं क्षोभूनि आवेशीं । जयविजयांसी शापिलें ॥ १३ ॥ सज्ञानाची ऐशी स्थिती । मा इतरांची कोण गणती । परापराधसहनशांती । दुर्लभ त्रिजगतीं गोविंदा ॥ १४ ॥ प्रकृति निजगुणीं सबळ । ते अल्पें क्षोभवी तत्काळ । साधु सज्जन केवळ । करी विकळ अशांती ॥ १५ ॥ ज्यासी तुझी पूर्ण भक्ती जडे । ज्यासी तुझी पूर्ण कृपा जोडे । जो तुझे चरणीं अखंड जोडे । त्यासीच घडे हे शांती ॥ १६ ॥ तूं विश्वात्मा त्रिजगतीं । चोरी न चले तुजप्रती । मज हीं द्वंद्वें न साहवती । तूंही श्रीपति जाणसी ॥ १७ ॥ परम पावन निजशांति । अतिनिंद्य ते अशांती । ऐसें व्याख्यान जे ज्ञाते करिती । तेही न साहती द्वंद्वांतें ॥ १८ ॥ द्वंद्वें दुःसह सर्वार्थीं । तेथें माझा पाड किती । एवं द्वंद्वसहिष्णुतेची युक्ती । मज कृपामूर्ति सांगावी ॥ १९ ॥ सकल साधनें वश्य होतीं । परी हे सहिष्णुता न ये चित्तीं । ते मी लाभे निजशांती । ऐशी कृपा निश्चितीं करावी ॥ ७२० ॥ मी शांतीचें लाभें कल्याण । ऐशी कृपा करावी परिपूर्ण । म्हणोनि धरिले श्रीचरण । उद्धवें आपण निजभावें ॥ २१ ॥ ऐकोनि उद्धवाची विनंती । संतोषला कृपामूर्ती । जेवीं चातकाचिया तृषार्तीं । गर्जोनि त्रिजगती निववी मेघ ॥ २२ ॥ तेवीं भक्तवचनासरिसा । उल्हासला कृष्ण कैसा । उद्धवाचिया निजमानसा । शांतीचा ठसा घालील ॥ २३ ॥ उद्धवप्रश्नाचें प्रत्युत्तर । उदार सुंदर गुणगंभीर । उघडोनि शांतीचें भांडार । स्वयें शार्ङ्गधर सांगेल ॥ २४ ॥ नवल सांगती ते ठेव । युक्तिचातुर्यवैभव । निजशांतीस पडे खेव । ऐसें अपूर्व सांगेल ॥ २५ ॥ श्रीकृष्णमुखींच्या ज्ञानोक्ती । ऐकतां स्वयंभ प्रकटे शांती । ते ऐकावया उद्धव चित्तीं । जाहला

तत्काळ 'तूं सर्पदंशानें मरशील' असा शाप दिला. १२ सनकादिक शांतीचे पुतळेच; पण त्यांनाहि वैकुंठाच्या प्रवेशद्वारांत आंत जाण्यास अडथळा होतांच अत्यंत संताप आला व त्या आवेशांत त्यांनीं जय व विजय या दोघांहि द्वारपालांस शाप दिला. १३ ज्ञानसंपन्न श्रेष्ठांची जर ही अवस्था मग इतर बिचाऱ्या सामान्य जनांची काय कथा! हे गोविंदा! दुसऱ्याचे अपराध सहन करण्याइतकी शांतवृत्ति त्रिभुवनांतहि पहावयास सांपडणें कठिण आहे. १४ प्रकृति आपल्या गुणांनीं इतकी प्रबल आहे कीं, ती एवढेंसें निमित्त मिळतांच मनःक्षोभ उत्पन्न करिते. जे केवल साधु-संत असतात त्यांनाहि ती शांतीपासून ढळविते. १५ ज्यांनीं तुझी पूर्ण भक्ति जोडिली आहे, ज्यांनीं तुझी पूर्ण कृपा संपादिली आहे, जे तुझ्या चरणीं निरंतर रत आहेत, अशा तुझ्या भक्तांसच ही अपूर्व शांति प्राप्त होते. १६ तूं त्रिभुवनाचा विश्वात्मा आहेस. तुझ्यापासून कांहीं चोरून ठेवून चालत नाहीं. म्हणून मी स्पष्टपणें कबूल करितो कीं, मला कांहीं हें द्वंद्व सहन करवत नाहीं, हें तूंहि श्रीहरि जाणतोसच. १७ 'ही शांति अत्यंत पवित्र आहे आणि असहनशीलताच अतिशय निंद्य आहे' असा उपदेश करणारे ज्ञानीहि स्वतः असहनशीलच असतात. (त्यांना दुसऱ्याचा यत्किंचित्‌हि अपराध खपत नाहीं.) १८ हीं द्वंद्वें अशीं सर्व प्रकारें दुःसह असतां त्यापुढें माझ्यासारख्याचा पाड काय! यास्तव हीं द्वंद्वें सहन करण्याचा उपाय हे दयाघन श्रीकृष्णा! तूं मला सांग. १९ इतर सगळीं साधनें साध्य होतात; पण सहनशीलता चित्तांत बाणत नाहीं. ती शांति मला मिळवितां येईल अशी मजवर कृपा करावी. ७२० मला या शांतीचें भाग्य लाभेल अशी मजवर पूर्ण कृपा करावी, असें म्हणून उद्धवानें मोठ्या भक्तिभावानें श्रीहरीचे चरण धरिले. २१ ही उद्धवाची विनंति ऐकून कृपेची मूर्तीच असा श्रीकृष्ण अत्यंत संतुष्ट झाला आणि मेघ जसा त्रिभुवन हालविणारी गर्जना करून आपल्या वृष्टीनें चातकाची तहान भागवितो, २२ त्याप्रमाणें श्रीकृष्ण भक्ताच्या शब्दांनीं अत्यंत आनंदित झाला. तो आतां उद्धवाच्या मनाला शांतीचा अनुभव देऊन तृप्त करील. २३ पुरुषोत्तम श्रीकृष्ण स्वतः उदार, सुंदर, व गुणगंभीर अशा शांतीचें कोठार उघडून उद्धवाच्या प्रश्नाचें उत्तर पुढील अध्यायांत सांगणार आहे. २४ ती ठेव मोठी विलक्षण आहे. युक्ति, चातुर्य, वैभव यांच्या योगें आत्मशांतीला आलिंगन देतां येईल, असे अपूर्व उपाय तो सांगेल. २५ श्रीकृष्णाच्या तोंडची ज्ञानवचनें ऐकिलीं असतां स्वतःसिद्ध शांति प्रकट होते. म्हणून

निश्चितीं सावध ॥ २६ ॥ जेवीं गजग्रहणाविखीं पंचान । साटोप धरी आपण । तेवीं शांति साधावया जाण । सावधान उद्धव ॥ २७ ॥ जळीं तळपतांचि मासा । कवडा झेलूनि ने आकाशा । तेवीं शांतीचिया आमिषा । उद्धव तैसा तळपत ॥ २८ ॥ तें भिक्षुगीतनिरूपण । पुढिले अध्यायीं श्रीकृष्ण । निजशांति बाणे संपूर्ण । तेंचि लक्षण सांगेल ॥ २९ ॥ ज्यांसी परमार्थाची चाड । तिंहीं सांडूनि साधनकवाड । शांतिसाधनीं श्रद्धा वाड । अतिदृढ राखावी ॥ ७३० ॥ श्रीकृष्ण सांगेल शांति पूर्ण । उद्धव तया अर्थीं सावधान । एका विनवी जनार्दन । श्रोतां अवधान मज द्यावें ॥ ३१ ॥ इति श्रीभागवते महापुराणे एकादशस्कंधे श्रीकृष्णोद्धवसंवादे एकाकारटीकायां द्वाविंशतितमोऽध्यायः ॥ ॥२२ ॥

इति श्रीमद्भागवते महापुराणे एकादशस्कन्धे द्वाविंशोऽध्यायः ॥ २२ ॥

अध्याय तेविसावा.

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ ॐ नमो सद्‌गुरु विश्वरूप । विश्वा सबाह्य तूं चित्स्वरूप । तुझें निर्धारितां रूप । तूं अरूप अव्यय ॥ १ ॥ चराचर जें सावेव । ते तुज अरूपाचे अवेव । जीवशिव हे तुझी माव । अद्वयवैभव पैं तुझें ॥ २ ॥ घृतपुतळी दिसे साकार । घृतपणें ते निराकार । तैसा तूं अव्यय अक्षर । जगदाकार भाससी ॥ ३ ॥ ठसावलें जें दिसे जग । निर्धारितां तुझें अंग । अंग पाहतां तूं अनंग ।

तीं ऐकण्यासाठीं उद्धव सावधान चित्त होऊन बसला. २६ सिंह जसा हत्तीला धरण्यासाठीं टपून बसलेला असतो, त्याप्रमाणें उद्धव शांतीच्या लाभासाठीं सावध होऊन बसला. २७ पाण्यांत मासा झळकतांच गण्या पक्षी जसा झडप घालून त्याला आकाशांत नेतो, तसा शांतीच्या लोभानें उद्धव उत्सुक होऊन बसला. २८ तें भिक्षु-गीताचें निरूपण श्रीकृष्ण पुढल्या अध्यायांत करणार आहे. ज्यायोगें शांति पूर्णपणें ठसेल तेंच लक्षण भगवान् सांगणार आहे. २९ ज्यांना परमार्थाची आवड असेल त्यांनीं तप, यज्ञ इत्यादि साधनांचीं द्वारें सोडून शांतिरूपी साधनावर दृढ श्रद्धा ठेवावी. ७३० श्रीकृष्ण शांतीचें पूर्णपणें वर्णन करील. त्यासाठीं उद्धव चित्त सावधान करून बसला आहे. तरी आतां श्रोत्यांनीं मजकडे लक्ष द्यावें, असें एका-जनार्दन विनवीत आहे. ७३१.

इति श्रीमद्भागवतपुराणांतील एकादशस्कंधाचा परमहंससंहितेमधला श्रीधर-एकनाथविरचित
टीकानुसार विष्णुशर्मेकृत सान्वयार्थ-भावार्थासह श्रीकृष्ण-उद्धव-संवाद
नांवाचा बाविसावा अध्याय समाप्त झाला.

हे ॐकाररूपी विश्वरूप सद्‌गुरो ! तुला नमस्कार असो. ज्ञानस्वरूप तूं या विश्वांत अंतर्बाह्य भरून राहिला आहेस. तुझ्या स्वरूपाचा विचार केला तर तूं निराकार व अव्यय आहेस. १ हे सर्व साकार चराचर प्राणी तुझ्या निर्गुणस्वरूपाचेच अवयव आहेत. जीव व शिव ही तुझी माया व अद्वयत्व हें तुझें वैभव आहे. २ तुपाची केलेली बाहुली साकार दिसते, पण तुपाच्या दृष्टीनें पाहिल्यास ती जशी निराकारच आहे; तसाच तूं अव्यय, अविनाशी असून जगदाकारानें भासतोस. ३ हा जो जगाचा ठसा उमटलेला दिसतो, त्याचा विचार केला असतां तें तुझेंच